
श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



मे १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

**वर्ष ६६ वे]** **किंमत २ रुपये** **[अंक २**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

— कार्यालय —

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

११

गुण हे अजब तुझे गाया ।। सद्‌गुरु ।। धृ० ।।
अचुक निवडुनी कार्ये करिसी।
परि लागेना अंत कुणासी ।।
अभक्तांसिही भक्त बनविसी।
ऐसी कृति तव सदया ।। गुण हे० ।।
कोणा लावी नामस्मरणा।
कोणा करणी लिंब-प्रदक्षिणा ।।
कोणा पासुनी घेई दक्षिणा।
ऐसी कृति तव सदया ।। गुण हे. ।।
कोणा लाविसि उदी मधंदा।
कुणा देवविसि द्रव्यसंपदा ।।
कोणा ठेविसि करूनी बंदा।
ऐसी कृति तव सदया ।। गुण० ।।
न कळे कोणा अगम्य शक्ती।
न कळे आम्हां प्रेमळ भक्ति ।।
द्यावी दासिस चरणासक्ति।
आस करित ही सदया ।। गुण हे० ।।

१२

किति तुझे गाऊं प्रेमेंगुण देवा।
जीविंचा विसावा माझ्या तूं बा ।।
माझ्या तूं देहाचा सर्वस्वी मालक।
अन्य ना तारक जगत्रयीं ।।
जगत्रयीं झाले तव अवतार।
प्रेमाने उदार झालासी बा ।।
झालासी संतांच्या पोंवाड्या कारण।
केले देहार्पण त्यांनी तुला ।।
त्यांनी तुजला रे भक्तीने बांधिले।
पामरें म्यां केलें काहीं नाहीं ।।

१३

येई येई बाबा सांई।
माझे अनाथाचे आई ।।
संतमिषे भेट देसी।
आम्हां प्राण्यां उद्धरिसी ।।
किती गाऊं तुझे गुण।
जीव टाकूं ओंवाळून ।।
नाना मिषें येसी घरा।
कैसे स्मरूं उपकारा ।।
घडी घडी स्मरण तुझें।
होइं सद्‌गुरू आई माझे ।।
दूर न करीं दासींसी।
शीर ठेवां पायांपाशी ।।

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला — मे १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ५ |
| २ | साईनाथांचा शरणार्थी — (२२) | — श्री. वि.बा. खेर | ७ |
| ३ | काळे महाराजांच्या आठवणी | — श्री. विनायक शेंडे | १० |
| ४ | समर्थ साई | — श्री. संजय चव्हाण | १३ |
| ५ | श्री साई वचन | — लक्ष्मण नाईक | १६ |
| ६ | श्री. साईंचे सत्यचरित्र | — मु.ब. निंबाळकर | १७ |
| ७ | दिन सोनियाचा उगवला | — वि.म. हटवार | २० |
| ८ | बाबांचे बोल व सूत्रे | | २२ |
| ९ | साईकृपा | — माधवी फडके | २६ |
| १० | साधना आणि सहज समाधी | — चकोर आजगावकर | २७ |
| ११ | हिच माझी आस देवा | — डॉ. सुमन खानविलकर | २९ |
| १२ | कबीर — आचार संहिता | — श्री. य.न. पंडित | ३० |
| १३ | हाती काम मुखी राम | — श्री. मधुसूदन करंबेळकर | ३३ |
| १४ | दत्तगुरुंचा कलियुगातील अवतार | — श्रीमती ज्योती उमडेकर | ३५ |
| १५ | माझे साईबाबा | — सौ. निवेदिता घाडीगावकर | ३७ |
| १६ | दैवत माझे साईबाबा | — कु. आशा पुरव | ३८ |
| १७ | श्रद्धा सबुरी | — श्री. गंगाधर जगताप | ३९ |
| १८ | बाबा वाटाडे झाले | — सौ. नंदिनी नाडकर | ४० |
| १९ | साई आत्मा साई परमात्मा | श्री. शू.शि. पोवळे | ४१ |
| २० | साई दरबारातील नवरले — ८ | — | ४२ |
| २१ | साई-ईश्वराचा अवतार | — सौ. सुधाताई चैतन्य | ४५ |
| २२ | साईलीला अगाध आहे | — सौ. कुमुदिनी गोखले | ४६ |
| २३ | रिक्षाचे काम पूर्ण झाले | — विनोद मोरे | ४७ |
| २४ | साईबाबांची सर्वव्यापकता | — श्री. नंदू पाटील | ४८ |
| २५ | सबका मालिक एक है | — | ४९ |
| २६ | साईकृपेचे अनुभव | — श्री. शंकर कदम | ५० |


| क्रमांक | लेख-कविता | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २७ | शुभशकून व अपशकून | — श्री. अनिल रसाळ | ५१ |
| २८ | साईमाऊली | — सौ. रेखा माहिमकर | ५३ |
| २९ | साई | — कु. सिंधु थोरात | ५३ |
| ३० | भक्तीविना भाग्योदय नाही | — श्री. बाळकृष्ण देसाई | ५४ |
| ३१ | साईबाबा कोण होते | | ५७ |
| ३२ | श्री साईनाथांचा शरणार्थी | — श्री. वि.बा. खेर | ६२ |
| ३३ | शिरडी वृत्त — फेब्रु. ८७ | — | ६४ |



**श्रीसाईलीलाच्या सभासदांस निवेदन**

श्री साईलीला मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई - ४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डर द्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा, कोणत्या कारणासाठी मनिऑर्डर करीत आहात त्याचा खुलासा मनिऑर्डरवर करावा. मनिऑर्डरवर जेथे 'संदेश के लिए स्थान आणि भेजनेवाले का नाम व पूरा पत्ता' असे नमूद केलेले असते त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

# श्री साईबाबांच्या जीवनातील महत्त्वाचा दिवस



संपादकीय

सध्या परीक्षांचे सत्र सर्वत्र चालू आहे. शालेय व महाविद्यालयीन, विश्वविद्यालयीन परीक्षा चालू आहेत. 'तुमच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस' अशा विषयावर निबंध भाषा विषयाच्या प्रश्नपत्रिकेतून विचारले जात आहेत. ते पाहून आमच्याही मनात विचार आला. अरे, आपण आतापर्यंत ज्याची भक्ती-भावाने प्रार्थना करतो, त्या आपल्या लाडक्या श्री साईनाथांच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस तरी कोणता असावा. खूप खूप विचार केला. तसे पाहू गेले तर बाबांचे सारेच जीवन रहस्यमय आहे. संशोधनालाही त्यांनी अजिबात जागाच ठेवली नाही.

श्री महाराजांना एकावेळी बागकामाचा शौक होता. काही वर्षे त्यांनी पेहलवानी जीवनात काढली. काही वर्षे त्यांनी वैद्यकी व हकीमकी केली. दवा देऊन लोकांना बरे करण्याचे कार्य त्यांनी केले. पण पुढे हे त्यांनी सारे सोडून दिले. त्यांनी या पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. पण हे सारे काही जमेला धरले तरी त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस कोणता यावर मती कुंठीत होण्याची पाळी आली. पण साईनाथ म्हणतात, "तुम्ही मजकडे पहा मी तुमच्याकडेच मग पाहीन." आणि हे अगदी अगदी खरे आहे असे आम्हाला तरी सांगावेसे वाटते.

श्री साईनाथांच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगावर आठवता आठवता आमचे लक्ष श्री साईसच्चरित्रातील अध्याय क्रमांक ४४ कडे वेधले.

श्री साईसच्चरित्र अध्याय क्रमांक ४४ मध्ये श्री साईनाथांच्या संबंधी एक विलक्षण घटना देण्यात आली आहे. त्या घटनेकडे साईभक्तांचे फारसे लक्ष जात असावे असे वाटत नाही. बाबांनी केलेला एक चमत्कार या खेरीज त्यात काही विशेष आहे असे प्रथम दर्शनी वाटत नाही. सच्चरित्रात आलेली ही घटना पुढील प्रमाणे आहे. एके दिवशी महाराज म्हाळसापतींना म्हणाले, "आम्ही तीन दिवस ब्रम्हांडी प्राण चढवितो. आमची नीट काळजी घ्या हं. सांगतो त्या जागी निशाणे लावा व मग तेथे आमची समाधी खोदा" असे म्हणून बाबांनी प्राण ब्रम्हांडी चढविला. त्यांचे सारे शरीर निश्चल झाले. मृतप्रायच झाले. भगताने बाबांचे मस्तक मांडीवर घेऊन त्यांच्या देहाचे रक्षण केले. याप्रमाणे दोन दिवस गेले. तिसरा दिवस उजाडला. बाबांच्या शरीरात प्राण येण्याचे काहीच चिन्ह दिसेना. शरीर काल्यासारखे थंडगार. भगताखेरीज बाकीच्या लोकांची खात्री झाली की, बाबा गेले. त्यांनी जगाचा निरोप घेतला. साक्षात् श्री नृसिंह सरस्वतींनी आपण दूर प्रवासास जातो असे शिष्यांना सांगून आपले अवतार कार्य संपविले त्याचप्रमाणे

ब्रम्हांडी वगैरे सांगून बाबांनी आपला कायमचा निरोप घेतला असावा. तीन दिवस होत आले अजून काहीच चिन्ह दिसत नाही. निघून गेलेला प्राण पुन्हा का परत येणार? यास्तव बाबांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या देहाचे विसर्जन करावे असे बहुतेकांचे मत पडले. पण भगत म्हाळसापती याची निष्ठा और. बाबांचे शब्द प्रमाण मानले. त्यांना लोकांचे विचार पटेनात व तो मांडी काढीना, सोडीना. .होय नाही करण्यात बाबांनी सांगितलेला क़ाल संपत आला. तिसऱ्या दिवशी रात्री दहाचा सुमार असेल. बाबांच्या शरीरात हळूहळू उष्णता येऊ लागली व भगताला आशा आली. बाबांचे हातपाय हलू लागले व थोड्याच वेळात नेत्र उघडून बाबांनी हसत हसत भगताकडे पाहिले. बाबा क्षणार्धात उठून बसले. भगताची निष्ठा फळाला आली. बाबांच्या बद्दल भगताच्या मनात किती ही निस्सिम आदर, श्रद्धा व विश्वास होता ही गोष्ट यावरून दिसून येते. सध्याच्या काळात हे गुण विशेष लोप पावू लागले आहेत.

बाबांचा हा पुनर्जन्म म्हटला पाहिजे. बाबांच्या उत्थानाची ही हकीकत. अशा प्रकारचे उत्थान येशू ख्रिस्ताचे जीवनातही आहे. क्रूसावर दिल्यानंतर तो पुन्हा सजीव झाला. अशा प्रकारच्या घटना होतात पण त्या अगदी क्वचितच होतात, हे खरे आहे.

आपल्या जीवनातील कितीतरी गोष्टींचा थांगपत्ता बाबांनी कधीच लागू दिला नाही. शिर्डीतील लोकांना बाबा प्रथम दिसले तेच मुळी पूर्वायुष्याच्या अज्ञात पटावर एक तेजःपुंज बालमूर्ती म्हणून. नंतर ते गुप्त झाले व पुन्हा काही वर्षांनी प्रगटले व शिर्डीतच आले. त्यांनी आपल्या लौकीक जन्मदिनाचा कुणालाही थांगपत्ता लागू दिला नाही. पण त्यांची जयंती जर साजरी करावयाची असेल तर ती या ब्रम्हांडी प्राण चढविला या घटनेनंतर करावयास हरकत नाही असे आम्हास वाटते.

श्री महाराजांचे साक्षात हजारो वेळा दर्शन घेतलेले आजचे विख्यात संत श्रेष्ठ श्रीराम बाबा हे तर बाबांच्या या घटनेबाबत महत् आश्चर्य प्रकट करतात! अक्षरशः तोंडात बोटच घालतात!! या काळात बाबांनी दुसऱ्या भक्तांच्या शरीरात प्रवेश केलेला होता असे त्यांचे ठाम मत आहे.

खरोखरच श्री साईनाथांच्या जीवनातील हा महत्वाचा प्रसंग म्हटला पाहिजे असे आम्हास मनोमनी वाटते. श्री साईसारखा महासंत होणे विरळाच नाही का!

## लेखक - कवींस निवेदन

श्री साईलीला मासिकाकडे साहित्य पाठविताना लेखक-कवींना पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.

सुवाच्च अक्षरात कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून लिखाण असावे, ते पाठोपाठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे.

हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.

अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, मीमांसक व वैचारिक स्वरूपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.

**का.सं.**

# श्री. साईनाथांचा शरणार्थी — (२२)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

श्री साईबाबांच्या येथे २१-२२ दिवसांच्या शिरडी येथील वास्तव्यानंतर मुंबईत विलेपार्ल्याला एकाद-दुसरा दिवस राहून मी मोतागावी गेलो; व तबियत सुधारण्यासाठी व सॉलिसिटरच्या परीक्षेच्या अभ्यासा निमित्त १९१७ च्या मार्च पर्यंत आईजवळ राहिलो. त्या कालावधीत थोड्याच दिवसात आमच्या मोहोल्ल्यात समोरच्या गल्लीत शेवटच्या घरात राहणारे रंगाचे व्यापारी देवशंकर हरजीवन गोकळी यांनी रामेश्वर मंदिरात महारूद्र केला. तो चालू असता एका संध्याकाळी तीन संन्यासी यज्ञाच्या दर्शनासाठी आले. त्या दिवसाचे यज्ञाचे काम संपल्यानंतर त्यांच्या राहण्याची व भिक्षेची सोय न झाल्याने, ते आमच्याकडे आले. त्या तिघा संन्याशांना मी गावा बाहेर दक्षिण दिशेस असलेल्या नीलकंठ महादेव मंदिरात मुक्काम करण्यास सांगितले. व एक-दोन तासात भिक्षा-भोजन तयार होईल, तेव्हा त्यांना येण्याची विनंती केली. आईच्या संमतीने मोघीबेहनने शीरापुरी, डाळभात, वगैरेचे जेवण तयार केले. व ते तीन संन्यासी आल्यानंतर, त्यांनी हस्त-पाद प्रक्षालन केल्यावर, त्यांना आदरपूर्वक पाटांवर बसवून भोजन वाढले; व सुरूवात करण्यास सांगितले. त्यावेळी त्यांतील दोघांनी रीतसर मंत्र म्हटले; परंतु मध्ये बसलेला संन्यासी म्हणाला, "बघा, माझ्या हातात लपविलेले काही नाही; पण नेहमी भिक्षा ग्रहण करण्यापूर्वी मी माझ्या शालिग्रामाला ती अर्पून नंतर मी जेवतो. हा शालिग्राम मी माझ्या मस्तकाच्या पोकळीत ठेवतो; व जेवणाच्या वेळी तोंडातून काढून त्याला नैवेद्य दाखवून नंतर मी जेवतो."

असे म्हणून त्याने तोंडावाटे शालिग्राम— 'काळ्या दगडाचा विष्णु-काढला, एका तळहातावर त्याला ठेऊन त्याच्या रीतीप्रमाणे त्याला स्नान घालून यथोचित पूजा केली व नैवेद्य दाखविला. त्या वेळा जवळ बसलेल्या दोघा संन्याशांनी शालिग्रामाला मनःपूर्वक वंदन केले. नंतर तो मधला संन्यासी मला म्हणाला, "बघ, मी आता हा शालिग्राम परत माझ्या मस्तकात त्याच्या आसनावर बसवितो." असे म्हणून त्याने शालिग्राम तोंडात ठेवला व भोजनास सुरूवात केली. हे पाहून दुसऱ्या दोघांनीही भोजनाला सुरूवात केली. त्या तिघांनी भिक्षेची याचना केली, त्या वेळीच मला वाटले होते की, बाबा आज तीन संन्याशांच्या रूपाने, म्हणजे गुरू दत्तात्रयाच्या रूपाने भिक्षेसाठी आले आहेत. आणि त्यातील एकास ब्रम्हरंध्रांत स्वतःच्या इष्टदेवतेस ठेऊन फिरविण्याची कळा असलेली पाहून वरील त्रिगुणात्मक त्रिमूर्ती संबंधीची भावना दृढ झाली. त्यांच्या सांगण्यावरून मी त्या रात्री जेवल्यावर त्यांनी प्रसन्नता दर्शविली व मोघीबेहन मला वाढत होत्या, त्यांच्याकडे बघून विचारले, "ह्या कोण, तुमच्या पत्नी का?" मी लगेच उत्तर दिले की, ती माझी बहीण आहे, पत्नी नव्हे. अशी आठवण आहे की त्यांनी मोघीबेहनना आशीर्वाद दिला.

नंतर ते आपल्या मुक्कामावर जाण्यास निघाले, तेव्हा म्हणाले, "मुक्कामाची जागा ठीक आहे; परंतु निजण्यास गाद्या मिळाल्यास फार चांगले. मी जेऊन, मोलकरीणीबरोबर गाद्या-उशा घेऊन गेलो; व मोलकरीणीला रवाना करून तेथे थोडा वेळ बसलो. तेव्हा त्यातील तिघांपैकी एकाने एक वैराग्यपर भजन म्हटले. त्यातील एक पंक्ती आठवते ती अशी: "धर्म की धजा तूटी, धर्म की धजा तूटी। जागृत हो जाव, जागृत हो जाव।।" यावरून मला नक्की वाटले की, बाबा दत्तात्रय रूपाने प्रकट होऊन मला सांगत आहेत, 'संसारात का गुंतून राहिला आहेस? धर्माचा ध्वज तुटत आहे म्हणून धर्मसंरक्षणासाठी कटिबद्ध हो व संन्यासी होऊन धर्म सांभाळ. संन्यास घेण्याची माझी तीव्र इच्छा होती; परंतु मला माझ्या वैराग्याचा पूर्ण भरवसा नव्हता. शिवाय साईमहाराजांनी या गोष्टीस नकार देऊन सॉलिसिटरचा अभ्यास करण्यास सांगितले होते, तेव्हा या संन्याशांची ही गोष्ट फक्त ऐकून घेतली.

दुसऱ्या दिवशी गाद्या मागवून घेतल्या (किंवा त्यांनी परत केल्या) व नऊच्या सुमारास तिन्ही संन्यासी भेटण्यास आले, तेव्हा म्हणाले, "भगत, तू आमची चांगली सेवा केलीस, त्याने आम्ही प्रसन्न झालो आहो. सध्या तुझी बुद्धी फार नाजुक झाली आहे. ती सुधारण्यासाठी एक कागदाचा तुकडा व थोडे कुंकु आण. आम्ही तुला, एक मंत्र लिहून देतो, तो धातूच्या घाटात घालून वापर." त्याप्रमाणे मी त्यांना कागद-कुंकु आणून दिले. तसे त्यांनी मंत्र लिहून त्या कागदाची पुडी किंवा गोळी करून मला दिली व म्हणाले, "आता आम्ही येथून नाशिकला जाणार आहोत. तुझी बुद्धी ठिकाणी यावी त्यासाठी प्रार्थना किवा साधना करू, तू फक्त दोनच रुपये आम्हाला दे."

माझ्याकडे त्यांना द्यायला पैसेच नव्हते, व आईचा तसेच मोघीबहेनचा देण्याचा विचार दिसला नाही म्हणून त्यांना नमस्कार करून रवाना केले; परंतु त्याने मला चित्तक्षोभ तर झाला. संन्याशांनी माझी अडचण ओळखली, परंतु नंतर आईला व मोघीबहेनला ते संन्यासी चांगले अधिकारी आहेत असे पटविल्यावर आईने दोन रुपये मोघीबहेनला दिले व संन्यासी अजून रस्त्यावर असतील असे म्हणून त्यांना ते देण्यास सांगितले. तिला ते संन्यासी गल्लीतच भेटले, तेव्हा तिने दोन रुपये त्यांना दिले. मी सुद्धा फिरण्यासाठी घराबाहेर पडलो; परंतु माझ्या आईला चिंता लागली की मी तिला सोडून संन्याशाबरोबर पळून जाईन म्हणून मी घरी नाही हे पाहून ती माझ्या शोधात निघाली; व जवळ जवळ सर्व गाव फिरून आली. मी घरी परतलो तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी आले; व मला पाहून ती म्हणाली, "आलास, चांगले झाले. मला धास्ती पडली की तू संन्याशाबरोबर निघून गेलास की काय! तुझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर माझे मन तुझ्याबद्दल अस्वस्थ असते. तू केव्हा घर सोडून जाशील याचं काय सांगावं!" असे जरी ती म्हणाली तरी माझी श्रद्धा फक्त साईबाबांवरच होती. म्हणून संन्याशांनी मंतरून दिलेला कागद बराच काळ तसाच राहिला असावा; कारण मी त्यासाठी धातुचा घाट बनवून घेतलाच नाही. माझी संसारासंबंधीची विरक्ततेची सुरुवात किंवा तीव्रता १९१६ साली इतक्या थराला गेली होती की, त्यामुळे माझ्या आईला व बहीण भावंडांना माझ्याविषयी चिंता वाटे. या माझ्या विरक्ततेमुळे सर्वजण दुःखी झाले होते, ही हकीकत आता मी

भगवी वस्त्रे धारण केल्यानंतर विसरू शकत नाही; म्हणून या प्रसंगाचा उल्लेख केला आहे.

त्या काळी मोतामधे त्र्यंबकलाल नांवाचे आयुर्वैदिक-होमिओपॅथिक बायोकेमिक डॉक्टर दवाखाना चालवित असत, त्यांचा परिचय झाला. धार्मिक विषयांत त्यांना रस होता, असे त्यांच्या समागमावरून वाटले. न्यायदर्शनावर त्यांची विशेष प्रीति होती. ते ज्ञानाच्या चांगल्या गोष्टी करत. त्यांच्या सांगण्यावरून न्यायदर्शन मागवून मी थोडे वाचले, केनोपनिषद पण वाचले; आणि दयानंद सरस्वतींचा 'सत्यार्थप्रकाश' पण पाहिला. सत्यार्थप्रकाशाचे तीन विभाग पाडले आहेत; 'जगत', 'जीव' व 'ईश्वर'. समजण्यास अगदी सोपे खरे; पण शंकराचार्यांच्या अद्वैताबरोबर त्याचा मेळ बसत नाही. डॉक्टर स्वतः काही मायावाद मानत असावे असे वाटले नाही. त्यावेळी नथुराम शर्मांचे उपनिषदांचे पुस्तक माझ्याजवळ होते, ते सर्व अथपासून इतिपर्यंत वाचले. परंतु त्यातील रहस्य समजले असे वाटले नाही. तरीसुद्धा याच सुमारास माझ्याजवळ असलेले 'ब्रह्मसूत्र' वाचण्यास सुरुवात केली. माझे संस्कृतचे ज्ञान बेताचेच होते. तरी सुद्धा जेवढे वाचले तेवढे नीट समजले, हे केवळ बाबांच्या कृपेचे फळ होते, असे त्यावेळी मला वाटते; आणि आता तर ते सत्यच होते अशी माझी मान्यता आहे.

एकदा सकाळी दहा अकराच्या सुमारास नित्यक्रम आटोपून झोपाळ्यावर बसलो होतो. तेथे मी साईनाथ नामोच्चार एकदाच केला, तेवढ्यात आमच्या काकांच्या घरासमोर कोणी फकीर भिक्षा मागताना पाहिला. त्यावरून मला वाटले की, (बाबांचे) नाव घेताच त्या नामात असलेल्या शक्तीने बाबांना प्रकट होण्याची, स्थूल रुप धारण करण्याची जरूरी पडते. शिरडीत बाबांनी त्यांचे नाम (मोठ्याने) उच्चारल्याबद्दल 'अरे अजून आहेच का?' अशा शब्दांत केली. त्याचे कारण हेच असावे, हे मी समजलो; व बाबांचे नाव उच्चार करण्याबाबत मी सावध राहू लागलो; व त्याचा क्वचितच उच्चार करे.

मोता येथील माझ्या दीर्घ वास्तव्यात संक्रान्तिपर्व आले. तीळाचे लाडू करून ते तांदुळ-मुगाची खिचडी व पैसे यांसह दान करण्याचा परिपाठ आमच्या कुटुंबात पहिल्यापासून होता. त्याप्रमाणे दानविधी झाल्यानंतर प्रसादाचा लाडू मला खायला देण्यात आला; पण मी तो ग्रहण केला नाही. कारण मनात अशी भावना होती की, कुठल्या तरी रुपाने बाबांनी येऊन लाडूचा स्वीकार केला तरच तो आपण खावा. संध्याकाळ पर्यंत कोणी आले नाही. वरील प्रसंगाच्या अगोदर म्हणजे मी मोताला गेल्यावर दोनचार दिवसातच अबदुल्लासारखा कोणी साधु रामेश्वराच्या धर्मशाळेत उतरला होता. मुसलमानासारखा दिसणाऱ्यास तेथे कसे राहू दिले असेल असा माझ्या मनात विचार येई. संक्रांतीच्या दिवशी संध्याकाळी मी देवदर्शनासाठी बाहेर पडलो, त्यावेळी माझ्या अनुपस्थितीत तो आमच्या घरासमोर येऊन उभा राहिला. मोघीबहेन बाहेर होती, तिच्याकडे त्याने तिळाचा लाडू मागितला. तिने भिक्षेसाठी ठेवलेले पाच लाडू त्याला दिले. ते त्याने स्वीकारले व म्हणाला, "मर्द लोक कहां है? हमें तो मर्दों की जरूरत है ॥" मी घरी परतल्यावर मोघीबहेनने ही गोष्ट मला सांगितली. त्याने माझी खात्री झाली की, स्वतः साईबाबांनी माझी प्रतिज्ञा जाणून त्यांनी ते लाडू स्वीकारले; व माझ्यासाठी असा संदेश दिला की, परमार्थासाठी हा मार्ग मुलांच्या मस्करीचा खेळ नव्हे, हे तर मर्दांचे युद्ध आहे.

साईबाबांसारख्या पूर्ण दशेला पोचलेल्या महात्म्याला शिरडीत राहून मी खूप त्रास दिला; परंतु वैराग्याच्या उणीवेमुळे जे प्राप्त करावयाचे ते नाहीच मिळविले. या विचाराने मी खिन्न होतो. त्यात बाबांची काहीच कसूर नव्हती, दोष तर माझाच होता. दृढ वैराग्य असते तर सर्व काही मिळाले असते. मला विशेष हे जाणवले की, बाबांच्या मते संन्यासासाठी लागणाऱ्या वैराग्याचा आदर्श माझ्यात तर नव्हता. मी त्यांच्या परीक्षेत नापास झालो. गुह्य बाबत आपल्या मनातच ठेवण्याच्या स्वभावाच्या अभावी, माझा संन्यास घेण्याचा विचार व त्याला बाबांनी दिलेले अनुमोदन मोघीबहेनला सांगताच वैकुंठरावने बाबांना विवेकपूर्वक पत्र लिहिल्याने, मला (१९१३ साली) अकरा महिन्याच्या माझ्या शिरडीतील वास्तव्यानंतर रजा देऊन परत पाठविण्यात आले, त्याचा पश्चात्ताप होताच. त्यातून वरील संदेश, यामुळे माझी खात्री झाली की, त्या माणसाच्या रुपाने बाबा आले आणि सांगून गेले की, आम्हाला कडकडीत वैराग्यशील माणसांचीच जरूर आहे, तुझ्यासारख्या कच्च्या घराची नव्हे! त्यानंतर हा साधु रामेश्वराच्या धर्मशाळेत किंवा मोतामधे दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी दृष्टीस पडला नाही. मोघीबहेन असे पण म्हणाली की, आमच्या घरी आलेला कुणी फकीर गावातील नव्हे तर कुणी नवाच माणूस होता. यावरून मला खात्रीपूर्वक वाटले की, तो फकीर म्हणजे बाबाच असावे. नंतर मी लाडू खाल्ला.

मी बाबांबरोबर शिरडीत असताना मला वाटले होते की, माझे वैराग्य दृढ नाही, म्हणून बाबांनी मला शिरडीत ठेवले नसावे. त्यांच्या 'कोळंब्यातील भाकरी' विषयी मी त्यांना बोललो. त्या वेळीही बाबा म्हणाले होते, पुढे पाहू! त्यांनी नवी कफनी परिधान केली व दुसऱ्यांना देत होते तेव्हा मी सुद्धा एक मागितली होती; पण त्यांनी मला दिली नाही. व मुक्तारामांची वापरत असलेली कफनी मला उतरावयाला लावली; व मला म्हणाले, "अजून कोणालाही बाबांनी बळजबरीने, त्याच्या मर्जीविरुद्ध संन्याशी केलेले नाही."

# —: काळ महाराजांच्या आठवणी :—

— **श्री. विनायक शेंडे,**
२/७९, नेहरू नगर,
कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.

आमच्या साठे आजी म्हणजे आठवणीचे रत्नभांडार आहेत. त्यांना एकदा विचारले, आजी तुम्ही साईबाबांना पाहिले होते का? त्या म्हणाल्या मी साईबाबांना ते हयात असताना पाहिलेले नाही. परंतु ज्यांचे कृपेने मला साईनाथांची कृपा झाली त्या परम पूजनीय काळ महाराजांच्या आठवणी प्रथम सांगते. "साईलीला"च्या वाचकांना त्यांचा उपयोग होईल.

माझे वडील श्री. लक्ष्मणराव काळे हे "बृहन महाराष्ट्र" चळवळीचे [illegible] सूत्रधार होते. परप्रांतात आज सर्वत्र "महाराष्ट्र भवन" आश्रय देते. पण ह्या चळवळीचा पाठपुरावा माझ्या वडिलांनी केला ते पोस्ट खात्यात अव्वल इंग्रजीत "क्लास वन" श्रेणीत काम करीत होते.

माझे वय ८८ आहे. माझे सर्व बालपण पेशावर-क्वेट्टा-डेहराडून अशा ठिकाणी झाले. सर्व शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले होते. माझे "माहेर"चे नांव द्वारका आहे. माझी विवाह १९६६ मध्ये झाला. माझे यजमान अलाहाबादला प्राध्यापक होते. सासरचे नांव सौ. इंदिरा वामनराव साठे आमचे सासर म्हणजे एक चालते बोलते "जंगम-विद्यापीठ" मोरशास्त्री साठे यांचे नाव अव्वल इंग्रजीत परवलीचा शब्द होता. श्री. चाफेकर व श्री. न.र. फाटक हे माझ्या सासऱ्याचे विद्यार्थी आमचे एकत्र कुटुंब होते.

हे सर्व सांगायचे कारण म्हणजे तरुणपणी मी थोडी चिकित्सक थोडी सुधारक होते. तेव्हा काळमहाराजांच्या आठवणी सांगते. ८० ते ९० वर्षांपूर्वी सामाजिक स्थिती व कौटुंबिक स्थिती व त्या वेळचा प्रथम सांगायला हवाच, तरच ह्या आठवणी समजून घेता येतील.

त्या काळात प्रत्येक सुवासिनी स्त्रीला "नथ" आवश्यक समजत प्रत्येक घरांत "दुध दुभत्याचे" कपाट असायचेच ह्यालाच आम्ही "विरजणाचे कपाट म्हणत असू" "नथ हरवे" हा अपशकुन समजत. ज्या वेळी नथ घालायची नसे त्यावेळी ती नथ नेहमीच विरजणाच्या कपाटांत ठेवायची अशी पद्धत होती.

सासरी पसारा मोठा होता, सासू नव्हती. आतेसासू होती त्याच सर्व व्यवहार पहात ह्या आते सासुबाई पूजनीय काळ महाराजांच्या "भक्त" होत्या. शंभर वर्षांपूर्वी "अक्कलकोट"च्या स्वामी समर्थांनी धर्मप्रचार केला. स्वामी समर्थांच्या वटवृक्षाला अनेक पारंब्या फुटल्या त्यावेळी पुण्यांत त्यांचे तीन प्रमुख शिष्य होते.

१) बीडकर महाराज २) जंगली महाराज ३) काळ महाराज, जंगली महाराजांचे टेकडीपाशी नदीचे काठावर - एका धुनी जवळ - पूजनीय काळ महाराज बसलेले असत.

पूजनीय "काळ-महराज" हे मुक्त-पुरुष होते. बाहेरून ते फारच उग्र वाटत मस्तकी जटाभार चेहरा उग्र वाटे. अंगावर फक्त लज्जा रक्षणापुरते वस्त्र (म्हणजे लंगोटी) म्हणजे - जवळ जवळ नग्न असत आणि तोंडाने शिव्यांचा भडिमार चालू असे. त्यांच्याजवळ जायची सोय नव्हती. हातात "दगड" असायचा. लोक घाबरत. मी माझ्या "आतेसासूबाई" बरोबर जात असे. मला त्यांची भिती वाटायची.

मगाशी म्हणाले ना नथ ही फार महत्त्वाची वस्तू होती. तर एकदा काय झाले मोठी गम्मत झाली माझ्या दोन नथी होत्या. एक छोटी होती. छोटी माझ्या सासूबाईंची भेट होती. मोठी होती किंमतीची. १९१६ साली त्याची किंमत रु. ५००/- ती माझ्या दिराने (भावजी) दिली होती. ह्या दोन्ही "नथा" व यजमानांनी दिलेली ५०/- पन्नास रुपये रक्कम विरजणाचे कपाटांत ठेवलेली होती.

नथ व पैसे चोरीला गेले. शोध शोध शोधल्या पण दोन्ही नथा व पैसे सापडेनात नथ हरवणे अशुभ समजत मग आते सासूबाईंना विचारले काय करायचे. त्या म्हणाल्या चल आपण काळ महाराजांचेकडे जाऊ या.

मग आम्ही दोघीजणी काळ महाराजांचे दर्शनाला गेलो. त्यांना सारे काही समजत असे. त्यांनी सासूबाईंना सर्व समजावून सांगितले. कुणी वस्तू चोरल्या ते त्यांनी सांगितले. वस्तू कुठे आहेत ते सांगितले. आम्ही दोघीजणी घरी आलो. आल्यावर आते सासूबाईंनी त्या व्यक्तीला बोलावले व वस्तू कुठे आहेत ते सर्व तिला सांगितले. व त्या व्यक्तीने माझ्या वस्तू व पैसे त्या विशेष ठिकाणाहून काढून दिल्या. माझ्या वरील संकट टळले.

त्यानंतर एकदा अशाच आम्ही दोघी काळ महाराजांच्या दर्शनास गेलो होतो. त्या दिवशी फार मोठा चमत्कार झाला. पूर्वी लहान मुलांना पोलिओ झाला तर त्यावर उपायच नसे. मूल आयुष्यभर अपंग राही. एका व्यक्तीचे मुलीला पोलिओ झाला होता सर्व उपाय केले पण मूल चालेना. त्या मुलीला घेऊन तो माणूस काळ महाराजांचे कडे आला होता. आम्ही दोघीनी दर्शन घेतले व तिथेच विसावलो त्या व्यक्तीला व अपंग मुलीला काळ महाराजांनी पाहिले मात्र ती मुलगी जेमतेम खाली उतरली होती. काळ महाराज ओरडले. ''रांडेचा काळ आला काळ आला रांडेचा रक्त ओकतो. रांडेचा काळ'' व यांनी हातात दगड घेतला व त्यांनी हातात दगड घेतला व त्या मुलीचे पायावर भिरकावला.

त्या मुलीच्या पायाला दगड लागला व ती मुलगी ओय ओय असे ओरडत पळत सुटली. अपंग मुलगी चालली नुसती चालली नाही तर पळाली कुठेच न पडता चांगली फर्लांगभर पळाली थोडक्यात ती मुलगी चांगली झाली, तिचे अपंगत्व गेले.

माझी एक मैत्रिण होती. आमचे एकत्र कुटुंब फार मोठे होते. तिचे कुटुंब फारच लहान होते. ती व तिचा नवरा फक्त मियां और बिब्बी - सिर्फ दो प्राणी तिचा नवरा साधा होता. मिळकत सुद्धा कमी होती. ही माझी मैत्रीण सर्व दृष्टीने चांगली एकच दोष. येईल त्याला मागेल ते देणे याचा मात्र विचार नाही. ही माझी मैत्रीण व मी म्हणजे - लक्ष्मीबाई व इंग्गिबाई अशा दोघी त्यांचे दर्शनास गेलो होतो.

काळ महाराज शिव्या देत बसले होते. ''काळ आला-काळ रक्त ओकतो रांडेचा काळ-आला रांडेचा. मी व लक्ष्मीबाई दोघींनी नमस्कार केला. माझ्या मनांत विचार आला येवढा थोर साधू पण शिव्या का देतो त्यांचे लक्षांत माझी (मनचा विचार) शंका आली मला म्हणाले बसा गे मुलींनो माझ्या मनातला विचार त्यांनी बोलून दाखवला म्हणाले.

मुलींनो मी शिव्या देत नाही. पुढे काळ कसा येणार ते तुम्हास सुचवितो. पुढे काळ असा येणार आहे. की सामान्य माणसांना सज्जन माणसांना उर फुटेस्तोवर - रक्त ओकीस्तोवर कष्ट होतील वाममार्गाने पैसा मिळवणारे दुर्जन मात्र संभवित ठरतील. लोक त्यांनाच सज्जन म्हणतील. त्यांचा आदर सत्कार करतील लोकांचे हाल होतील म्हणून रांडेचा काळ आला म्हणतो. लोकांना समजत नाही.

मग लक्ष्मीबाईकडे वळून म्हणाले. ''मुली तू गरीब आहेस पण तू भाग्यवान आहेस. तुझा दोष समजून सांगतो. दान करताना विचार करून दान करावे. याचा मात्र विचार करावा. मग त्यांनी शंकराचा एक फोटो माझ्या मैत्रीणीला दिला. मग म्हणाले मुलींनो भगवान शंकर हा सर्व गुरुंचा गुरु आहे. त्याची पूजा मनोभावे करा. तुम्हांला सर्व सुखे प्राप्त होतील नंतर त्यांनी त्या माझ्या मैत्रीणीला सांगितले.

पाच सुवासिनींना मंगळवारी व शुक्रवारी ''हळद-कुंकु'' लाव आणि हातावर गोड पदार्थ टेव. (उदा-खडी साखर) म्हणजे सर्व ऐश्वर्य मिळेल. लक्ष्मीचे सर्वात सोपे व्रत माझी मैत्रिण दर मंगळवार, शुक्रवार हे व्रत आचारिते पुढे तिच्या यजमानांना बढती मिळाली व तिची स्थिती सुधारली व ती श्रीमंत झाली.

काळ महाराजांनी आम्हाला आशीर्वाद दिला. नीट वागा म्हणाले. पुन्हा ओरडले - काळ आला - आला रांडेचा काळ - काळ रक्त ओकतो. रांडेचा काळ.

संत दिसती वेगळे।
परी ते स्वरुपी मिळाले॥

काळ महाराजांची कृपा होती. पुढे मी मुंबईला आले. माझे परिस्थिती फार वाईट होती. पुढे साईभक्ति कशी केली, साईबाबांनी मला दर्शन कसे दिले, त्यांची हकीकत तुम्हाला पुढच्या वेळी सांगेन. श्रद्धा, सबूरी व उदी ह्याबद्दल सांगेन त्यांची पार्श्वभूमी आज सांगितली. संतांचा आशीर्वाद कायम असतो. आपल्यावर तर असतोच पण पुत्र पौत्रांनापण मिळतो.

सेवक मानवीयांचे।
कष्टती बहुतां परी॥
सेविला देव देवांचा तेणे मी।
धन्य जाहले॥
शुभं भवतु।

# समर्थ साई

— श्री. संजय रा. चव्हाण
वरळी, मुंबई-१८.

या जागृत विश्वासाच्याही पलिकडील अज्ञात विश्वातील यांत्रिक व्यवहार पृथ्वीवरील मानव प्राण्याने कितीही प्रयत्न केले तरी आकलन होणार नाहीत. त्या विश्वातूनच, या जागृतीतील ब्रम्हांडांत, भूतलावर, जीव अवतीर्ण झाला खरा, पण, त्याच्या स्वतःच्या अस्तित्वावरही त्याचा अधिकार नाही. सर्वच काही पराधीन... स्वेच्छेने, कोठे जन्माला यायचे, ते निवडता येत नाही, यथेच्छ, हवे तसे जीवन कंठण्याच्या प्रयत्नात वेदना, दुःख सुख, या अवस्थेवरही ताबा रहात नाही. शेवटी मृत्युनंतर सर्वांना सोडून जाणार कुठे? याचाही पत्ता नाही. खूप करून डोके गरगरू लागते तरीही काहीच कळत नाही.

हो, विचार करायचे काहीच कारण नाही. फक्त मुखात नाम असू द्या.... ॐ साई! ॐ साई!! ॐ साई!!!

तुम्हाला सर्व काही कळेल काय? वर सर्व काही स्वाधीन आहे. विकारावर ताबा, तोही अगदी सोपा. आलो कोठून? जाणार कोठे? तर साई माऊलीने पाठवले तेथून आणि परतायचे तेथेच... सद्गुरू साईंच्या पवित्र चरणाजवळ. तर मग, प्रातःकाळी उठावे, साईनाम स्मरावे, दिनक्रमातही 'लक्ष' असावे, रात्री निद्रिस्त होताना, आपल्या सर्व कर्माची कबूली साईंना द्यावी. मग चिंता कशाला? नको ध्यान-धारणा, समाधी-साधना, योग-याग, कर्मकांड... कारण त्या सर्वांचे ध्येय म्हणजेच आपले साई सच्चिदानंद!

तो दयाधन प्रभू सच्चा सेवकही आहे. अनादिकालापासून, गांजलेल्या सर्व अनाथ दीनांचा तो नाथ आहे, साईनाथ आहे, कोठेही, कधीही आपल्या बाबांना हाक मारा. दीनांची माउली नव्हे तर माऊलीहूनही मवाळ, असा प्रेमाचा कल्लोळच आपल्या पाठीशी

हजर होईल यात शंकाच नाही आणि म्हणूनच या जागृत विश्वातील, 'त्या' अज्ञात' विश्वाचा स्वामी, सद्गुरू सच्चिदानंद साई कर्ताकरविता समर्थ आहे.

अणि म्हणूनच, साई-कृपा झाली तर, काय मागाल ते मिळेल.

**जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ॥ (ज्ञानेश्वर)**

## जीवीचा जिव्हाळा, असा माझा साई लळा

अनंतकोटी ब्रह्मांडाच्या मुळाशी दडलेल्या आत्मतत्वा! साई रुपाने सर्व जीवांच्या चिमुकल्या हृदयांत विराजमान झालास. आणि जागृतावस्थेचा उदय झाला. देहभान झाले. मी माझे माझ्यासाठी सर्व काही सुरू झाले. संकल्पविकल्पांचे डोंगर तयार झाले. आणि आपण मात्र या सर्वांपासून अलिप्त झालात. सर्व काही तुम्हीच निर्माण करून आपला चेहरा लपविलात. आणि कर्तेपण मात्र भासवलेत. वा! वा! काय किमया माझ्या साईंची!

बालपणापासून आतापर्यंत माझे हजारो मित्र झाले असतील. पण तुझ्यासारखा सवंगडी मी केव्हाही पाहिला नाही. हे सुदामाच्या प्रेमळ कृष्णा! माझ्या मनातील सर्व काही तंतोतंत जाणूनही, हा खट्याळ मित्र मी, क्षुल्लक गोष्टींचा पाढा वाचून दाखवितो, याचे तुला कौतुक नव्हे तर हसूच येत नसेल ना?

कोणी तुझी महती गातात, ती वेगवेगळ्या अलंकारांनी नटवतात शिवाय अगदी रसभरीत वर्णनेही करतात. असा तू, कितीही थोर असेनास! मला मात्र काहीही वाटत नाही, कारण, तू माझा आवडता साई, माझ्या जीवाचा जीवलग आहेस तू, हे काय वेगळं सांगायला हवे?

तूच निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टी मी तुलाच भेट देतो, ही फळे, ही फुले, तन-मन-धन सर्व अर्पण करण्याची तयारी दाखवितो, हे खरेच, पण त्याही मागे, असे घडावे, तसा प्रसंग येऊ नये, अशी क्षुद्र अपेक्षा ठेवतोच, हे स्वार्थापोटी दडलेले प्रेम नाहीतर काय?

तुझ्या या स्वार्थी मित्राचा धिक्कार असो....

सख्या! तू मात्र सदा सर्वदा माफ करायला तयार! मला प्रेमाने अधकाधिक जवळ करू पहात आहेस. काय म्हणावे तुझ्या अथांग प्रेमाला?

## धांव! धांव!! रे शिरडीच्या पांडुरंगा!!!

कर्तव्यबुद्धिने केलेल्या भक्तीपेक्षा प्रेम-भावाच्या आंतरिक ओढीने केलेली भक्ती ईश्वराला आवडत असावी. भक्तीच्या भुकेला प्रभू आपल्या लाडक्या भक्ताला काहीही कमी पडू देत नाही. इतकेच नाही तर नास्तिकतेने विटाळलेल्या नीच, निंद्य प्रवृत्तीच्या लोकांवरही तो प्रेमळ माया करतो. त्याच्या पवित्र राज्यात भेदाला थाराच नाही.

असे करावे, तसे करू नये, वगैरे नियम, धर्म, फार प्राचीन काळापासून विचारवंतांनी ठरविले असले, त्याला वेगवेगळ्या गोष्टींचा आधार असला तरी.... ईश्वराचा लाडका पुत्र त्याची तमा बाळगत नाही. तो इतर काही जाणत नाही, तो ओळखतो, त्याचा देव आणि त्याची सेवा. जीवनाचे सारे सार त्याने ओळखलेले असते. ईश्वराकडून त्याला कोणतीच अपेक्षा नसते. परंतु...

भगवंता! ह्या संसार सागरात मी पुरता बुडलो रे बुडालो. बघ, कामक्रोधही माझे लचके तोडताहेत. राग-लोभाने पिरगळून काढले आहे रे मला! मी पुरता पिडला गेलो आहे रे अहंकाराच्या कुऱ्हाडीचा घाव बसलाय रे! या विकारांनी मानगुटीवरच आनल

घालून माझे प्राण कासाविस केले आहेत रे! धांव! धांव!! रे शिर्डीच्या पांडुरंगा... मी असहाय्य झालो रे! सोडव या कचाट्यातून, ही प्रार्थना मात्र तो करेलच करेल. त्या मंगलमूर्तीची सेवा आपल्या हातून योग्य तऱ्हेने होत नाही म्हणून खेद करीत बसला असेल. बाकी, संसारातील इतर कोणत्याही वस्तूबद्दल वा व्यक्तीबद्दलच्या मालकी हक्काचे त्याला स्मरणही नसते. मग, वस्तूची, खेळण्यांची मागणी तो कशी करेल? नाही, कदापि नाही, ती कल्पनाही त्याला सहन होणार नाही. त्याचे मागणे एकच, देवा! तू मला हवा, तुझा मला कधीही विसर पडू देऊ नकोस. तुझ्यासाठी मी जन्मोजन्मी यातना भोगायला तयार आहे. मला मुक्ती नको, किर्ती नको, काही, काही नको.... फक्त तू हवास!

## शिकवण श्री साईबाबांची

हिंदू मुसलमान भाई भाई असून, हिंदूंना जो राम, कृष्ण, रामकृष्ण, तोच मुस्लिमांना अल्ला, मालिक, वगैरे. ही एकाच परमेश्वराची विविध रुपे आहेत, हे कबीरानंतर, साईबाबा बनून त्या प्रेमस्वरूपाने दाखवून दिले, नाही का? तरीही खोडकर भावंडात आपल्या पित्यांविषयी भांडणे का? म्हणून प्रत्येकाने आपल्या अंतःकरणात डोकावून बघू या. कोठेही भेदाचा लवलेश असेल तर तोच आपल्या बाबांपासून आपली ताटातूट करतो आहे, असे समजू या 'सबका, मालिक एक' मग भेदभाव टाकावा हीच 'साई-शिकवण' आहे, नाही का? **श्रद्धा सबुरी**:- दयाघनावर दृढ विश्वास हीच **श्रद्धा**, त्याच्या अथांग प्रेमाची, आपल्या निर्मळ, स्वच्छ, मनातील ओढ म्हणजेच श्रद्धा, त्या कृपावर्षावासाठी चकोरासारखी केलेली प्रतिक्षा ही, सबूरी, मग आपल्या संसारीक कामनापूर्तीसाठी केलेली मूर्ख आशा ही खरी श्रद्धा ठरेल काय? त्यासाठी केलेली याचना ही प्रार्थना ठरेल काय? त्या करता धरलेला धीर, या आसक्तीपोटी लागलेली तळमळ ही सबूरी होईल काय? हीच का साईबाबांची श्रद्धा व सबूरी?

तो आनंदाचा सागर, दीनांचा दयाळू, प्रभू आपल्या मनातील भाव पूर्णपणे ओळखतो आहे. तो हृदयनिवासी आपल्या सर्व वासनाही पूर्ण करतो आहे, तरी पण तिकडे लक्ष न देता, काय वाटेल ते होवो, आता 'सोडणार नाही चरण' हेच ठरवावे, कारण अमृतवाणी आहेच —

**शरण मज आला आणि वाया गेला**
**दाखवा, दाखवा, ऐसा कोणी।**

## देवा, मी तुझा होणार

अनन्तकोटी, ब्रह्मांडनायक, ॐ काररुपी परमेश्वरा! तुम्ही आपला थोरपणा लपवून आपल्या लेकरांसाठी, साईनाथांच्या रुपाने प्रकटलात. पण बाबा! आम्ही कावळे मात्र इतकी वर्षेच नव्हे तर इतके जन्म आमच्या स्वसुखाला वंचित होऊन अभक्ष भक्षण करून, आपल्या चिन्मय स्वरुपाकडे नकळत दुर्लक्ष केले. क्षमा करा बाबा! आम्हा रंट्यांना हे कसे आणि केव्हा समजणार?

डबक्यातील बेडकाप्रमाणे संकुचित वृत्तीने, आम्ही आमच्या कर्माने, भूतलावरील तुमच्या प्रत्येक वस्तूला, प्रत्येक जीवाला, आपलेच समजून, स्वार्थापायी तुम्हाला सीमित करून ठेवले. पण हे देवाधिदेवा! सद्गुरु साईनाथा!! आम्हा अज्ञानी बालकांना, तुमच्या सर्वसाक्षित्वाची कल्पना आमच्या मनात कधी साकारलीच नाही.

कणाकणात, अणुरेणुत, प्रत्येक प्राणिमात्रातील, चैतन्याच्या अस्तित्वाला जबाबदार

असणाऱ्या हे प्रभो! तुझाच मी व माझ्यातील ह्या तुझ्याच सर्व भाव-भावना, तुझ्याच चरणी लीन असोत. प्रभो! आमचे भाग्य थोर म्हणूनच आपण आम्हाला जवळ केलेत. अन्यथा, या अथांग विश्वांत मी अनन्तकाळपर्यंत भरकटत राहिलो असतो.

हे सदगुरु चैतन्यानंदा, अनन्तकाळापासून अनेक ऋषीमुनी आपल्या विश्वरूप दर्शनासाठी धडपडले. वेदांनाही तुमचा थांगपत्ता लागला नाही. त्या दुर्लभ परमेश्वरा! ही केवळ तुझीच लीला आहे, विलास आहे. आपण, आतापर्यंत हजारो अवतार घेऊन लाडक्या लेकरांना शिकवण दिलीत, केवळ प्रेमापोटी भक्तांची संकटे स्वतःवर ओढवून घेतलीत, त्यांतून त्यांना बाहेरही काढलेत. शेवटी या अमर्याद संसारसागरातील असंख्य जीवांना, स्वस्वरूपी विलीनही केलेत. हा अभागी जीवही आपल्यातच विलीन होण्यासाठी, चिरविश्रांतीसाठी हजारो युगे तडफडतो आहे. 'हे करुणामयी साई माऊली मला जवळ घे' ही प्रार्थना बाळाला जशी आई आम्हाला तशी साई.

# श्री साईवचन

**— श्री. लक्ष्मण सदाशिव नाईक**
१११, धन्वंतरी नगर,
इंदूर, मध्यप्रदेश.

पाप जयाचे विलया गेले। ऐसे जे पुण्यात्मे वहिले॥
तेच माझे भजनी लागले। खुण लाभले ते माझी॥
सांई सांई इंति म्हणाल सात समुद्र करीन निहाल॥
ह्या बोला विश्वास ठेवाल पावाल कल्याण निश्चये॥
(श्री साईसत्चरित, अध्याय १३.)

उपरोक्त साईवचनाप्रमाणे 'साई-साई' ह्या नामाचा सतत जप केल्यास अंतःकरणातील आदर्श विचारांच्या अंधःकाराला तथा पूर्व जन्माच्या पापांना नष्ट करणारे आहे. भगवान श्री साईराम ह्या नामाचा जप करून शुद्ध आचरण ठेवल्याने मनाला शांती लाभते. ईश्वर भजन करीत राहिल्याने मनाचा चंचलपणा नष्ट होऊन मन शांत व विकार शून्य होते.

हल्लीच्या भौतिक युगामध्ये पैशाने सारे काही प्राप्त होऊ शकते परंतु आत्मिक शांती व मनःशांती मिळू शकत नाही. आध्यात्मिक शांती मिळविण्याकरिता लोभ, मोह, माया, राग, द्वेष इत्यादि षड्रूपी शत्रूंचा त्याग करून मनात कोणत्याही गोष्टीची आसक्ती न ठेवता निष्काम वृत्तीने ईश्वरभक्ती (भजन) केल्याने आध्यात्मिक लाभ होवू शकतो.

कलीयुगात आयुष्य फार थोडे आहे. जोपर्यंत जीवन शक्ती आहे, तोपर्यंत 'साईराम-साईराम' नामःस्मरण सतत करीत रहावे. एकदा शरीर क्षीण झाल्यास ईश्वर भक्ती, नाम जप होणे तितकेसे शक्य होत नाही. शरीराद्वारे केलेले पूर्वजन्मीचे पाप 'साईराम-साईराम' ह्या जपाने नष्ट होऊन जाते. ईश्वराकडे जाण्याकरिता आपले मन शुद्ध व निष्काम होणे अत्यंत जरूरीचे आहे. जितके आपले मन निष्काम व सक्रीय असेल तितकेच आपण ईश्वराजवळ जाण्यास लायक होवू.

# श्री साईंचे सत्य चरित्र — अध्याय १७ वा

## ब्रम्हज्ञान कथन — २

गद्य अनुवाद — श्री. मु. ब. निंबाळकर
(निवृत्त)
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स,
बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१.

(एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या 'ब्रम्हज्ञान कथन - २' या लेखाचा उत्तरार्ध)

या संसाररुपी सागरातील वडवानलाच्या आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक या तीन ताप (दुःख) रुपी संतप्त आगीत कोण बरे सुखी असेल? त्यातून आपला उध्दार करून घेण्यासाठी साईबाबांची कृपा संपादन करावी. त्यांच्या चरित्राचे आदरपूर्वक वाचन, श्रवण व मनन करावे. हे श्री साईनाथ चरित्र आपले कुटुंब, पुत्र आणि मित्र यांसह श्रोत्याने ऐकले तर या लोकीचे व परलोकीचेही साध्य होईल. बाबांची लीलाच विचित्र आहे. या कथेचे श्रद्धाळू श्रोते भाग्यवान आहेत. ही कथा हळूवारपणे श्रवण केली तर शांततेलाही शांतता येते. या कथारूपी झऱ्याच्या प्रवाहात कर्म व अकर्म (कर्म न करणे) रूपी मीठ विरघळून जाते व कानांच्या द्वारे साईबाबांचे गोड रूप डोळ्यांत शिरते. चरित्राच्या श्रवणाने पातकांचा ऱ्हास होतो, काळाशीदेखील झुंज देऊन विजयी होण्याची तयारी होते व खूप स्फूर्ती येऊन श्रोत्यांना समाधान प्राप्त होते. श्रवणाने अंतःकरण शुद्ध होते, श्रवणाने जन्ममरण चुकते, श्रवणाने फक्त कर्म (फळाची इच्छा न करता) ब्रम्हार्पण केल्याने ब्रम्हपण प्राप्त होते. अशी ही साईबाबांच्या सेवेची इच्छा सेवकांना सदा निष्काम करते. श्री साईराम आपल्या भक्तांना सर्वदा आराम देतील. श्रोते हो! या ग्रंथाचा एक एक अध्याय घेऊन (भागशः) दररोज वाचन, श्रवण, अभ्यास, मनन आणि चिंतन करा. 'आनंदो ब्रम्हेति व्यजानात्' (आनंद हाच ब्रम्ह आहे हे निश्चयपूर्वक जाणले) असे जे तैत्तिरीय उपनिषदात प्रसिद्ध आहे त्याच निर्णयाचा जणू काय बाबा आपल्या भक्तांना अनुवाद करून सांगत असत. 'जराशी देखील फिकीर (काळजी) करू नये, सदा आनंदित असावे आणि मरेपर्यंत चिंता करू नये' असा बाबांचा नेहमी उपदेश असे. (ओ. १०३-११३)

असो. या अध्यायाचे प्रयोजन (हेतू) ब्रम्हतत्त्वाचे विवेचन व साईबाबांना शरण जाईल त्याला ते नौका (नाव) होतील की नाही याचा उहापोह करणे हे आहे. सर्वांचे हित होईल असा उपदेश करावा, सर्वांवर उपकार करावा या (शास्त्र) वचनाला अनुसरून बाबा वागत असत. हे योग्य की अयोग्य हा मतभेद केवळ व्यक्तीव्यक्तीचा. ज्यामुळे सर्व सामान्य जनतेला संतोष होईल तोच या ग्रंथाचा उद्देश आहे. हेच येथील प्रयोजन आहे. बाबा कार्य व त्याचे कारणही जाणतात. जशी ज्याच्या मनाची इच्छा असते तसेच होणारे होते. गुरूंच्या तोंडच्या कथा ऐकाव्या, त्यांच्या अतर्क्य (कल्पना न करता येणाऱ्या) लीला अनुभवाव्या, आठवतील त्या मनात (संग्रही) ठेवाव्या आणि इतरांना ऐकवाव्या.

साईबाबांचे हे सुंदर चरित्र अत्यंत आदराने श्रवण केले असता श्रोते आणि वक्ते यांचे दैन्य नष्ट होते आणि सर्वांचे वाईट दिवस संपून जातात. बाबांची अलौकिक लीला पाहून जो चकित झाला नाही, केवळ दर्शनानेच ज्याचे मन शांत झाले नाही व जो त्यांच्या पदकमली नम्र झाला नाही तो अभागीच म्हणायचा. साईबाबांच्या गोष्टी जाहीर आहेत, त्या मोकळ्या मनाने ऐकावयाच्या असतात. अशी सुखाची संधी आल्यावर कोण फुकट दवडील? (ओ० ११४-१२१)

स्त्री, पुत्र, व मित्ररूपी हा भोवरा, काम, क्रोध वगैरे रूपी सुसरींनी भरलेला, नाना रोगरूपी तिमिलिंग नावाच्या मोठ्या माशाने विस्तारलेला आणि आशारूपी मोठ्या आवाजांनी खवळलेला आहे. कित्येकदा घटकेघटकेला उद्वेगाचा झटका येऊन जातो. सुखदुःख, शोक मोह वगैरे द्वंद्वांनी मनात शंका उत्पन्न होते. परंतु चटकन (स्त्रीपुत्रांचा) मोह तोडवत नाही. स्वतःच जीवाला उपदेश करावा की तूच शुद्ध ब्रह्म आहेस. देहाचे संगतीने नळीला बांधून घेणाऱ्या पोपटाप्रमाणे तू (स्वतःच) बद्ध झाला आहेस. मोह मायेने तू केवळ भ्रमात पडला आहेस म्हणून स्वतःचे हित विसरला आहेस. तुझा तूच सावध हो आणि स्वस्वरूपाकडे चटकन ये. भ्रमामुळेच संशय आणि मी देह आहे असा खोटा भास वाटला आहे. 'मी माझे' हे मृगजळासारखे फसवे आहे हे जाणून 'मम' (माझेपण) सोडून दे. हे पोपटा! या मी- तू पणाच्या घोटाळ्यात घट्ट कशाला गुंतावे? ते आवळलेले पाय सोड आणि उंच उडत जाऊन चैनीने फिर की! मुक्त माणसाकडे बद्धता येऊ शकते व बद्ध माणूसच मुक्त होऊ शकतो. तू दोन्ही स्थितीपासून वेगळा होऊन स्वस्वरूपात राहा. हे ज्ञान तर साक्षेपतेचे (तुलनेचे) असते. सुख व दुःख हे सर्व अज्ञान टाकून विज्ञान संपादन कर, म्हणजे ब्रह्मज्ञान जवळच असेल. देहात जोपर्यंत मी-तू पणा आहे तोवर तू स्वतःचे हित पाहणार नाहीस. तो (मी-तू पणा) टाक आणि आपला कृपणपणा (देह पकडण्याचा चिकटपणा) दूर भिरकावून दे. (ओ० १२२-१३०)

कुबेरासारखा श्रीमंत जरी भिक्षावृत्तीने वावरला तरी ती केवळ दुर्दैव व अज्ञानाने प्राप्त झालेली उलट परिस्थिती होय. नित्य उत्तम शास्त्रांचे श्रवण करावे, विश्वासपूर्वक सद्गुरुवचन पाळावे, व सदा सावधान राहून आपले ध्येय लक्षात ठेवावे. त्यांनी (शास्त्रांनी व गुरुंनी) सांगितलेली आचार पद्धती मनात ठेऊन लोक आपल्या उद्धाराचा मार्ग शोधतात. त्यांच्या उपदेशाने असंख्य लोकांचा उद्धार होतो व त्यांच्या (मोक्षाचा) मार्ग सुलभ होतो. संसाराच्या बंधनातून सुटका होईल तो क्षण कधी येईल अशी ज्याच्या मनाला रात्रंदिवस चुटपुट लागलेली असते तो (स्त्रीपुत्रांचा) मोह चटकन् सोडतो. साधवेळ तो एकांत साधून, संसारात काही अर्थ नाही ही (मनाशी) गाठ बांधून अध्ययन व आत्मचिंतन यात निरंतर असावे. भक्तिश्रद्धा युक्त मनाने, पूर्ण नम्रतेने, साष्टांग नमस्कार करून गुरूला शरण गेल्याशिवाय तो शिष्याला ज्ञानाचा ठेवा देत नाही. गुरुंना सर्व अर्पण करून त्यांची सेवा करावी, बंध व मोक्ष या वृत्तींचे (त्यांच्याशी) विवरण करावे, विद्या व अविद्याबद्दल त्यांना प्रश्न करावे म्हणजे गुरूमहाराजांकडून फळ प्राप्त होते. आत्मा कोण व परमात्मा कोण हे गुरूशिवाय कोणाला सांगता येणार नाही.

गुरूदेखील पूर्ण शरण आल्याशिवाय ज्ञानाचा कणही देत नसतात. गुरूशिवाय इतरांनी जर ज्ञान दिले तर त्यामुळे संसारातून पूर्ण सुटका होत नाही, मोक्षाचे फळ किंचितही प्राप्त होत नाही व मनात ठसतही नाही. म्हणून गुरूविना ज्ञान नाही हे सर्व विद्वान जाणतात. ब्रम्ह व आत्मा यांच्या ऐक्याची सोय करायला गुरूंचेच पाय समर्थ आहेत. तेथे आढेवेढे न घेता, ताठ अभिमान टाकून, जमीनीवर दंडाप्रमाणे (काठी प्रमाणे) सरळ लोटांगण घालून, गुरूंच्या चरणी मान वाकवा आणि मनाचा हिय्या पक्का करून गुरूचे पाय धरून तोंडाने म्हणा, "मी तुमचा दासानुदास आहे व मला तुमच्या पायांचाच भरवसा आहे." मग पहा त्या गुरूचा चमत्कार!! तो गुरूरूपी दयेचा सागर डोलायला लागेल व लाटांच्या शय्येवर वरच्यावर तुम्हाला झेलील. इडापिडांचा संहार करून आपला अभय देणारा हात तुमच्या डोक्यावर ठेवील व सर्व पापांच्या राशी जाळून मस्तकाला उदी फासेल. (ओ० १३१-१४४)

अशा प्रकारे ब्रह्मार्थिला ब्रह्माचे वर्णन हे केवळ निमित्त करून बाबांनी जीव व परमात्मा (शिव) यांच्या ऐक्यतेची खूण भक्तांना संपूर्णपणे कथन केली. महाराजांची एवढी मोठी प्रज्ञा व गाढ विद्या असताना थट्टेची प्रौढी (महत्त्व) का आणि विनोदाची आवड का? सहज अशी शंका मन घेईल. परंतु विचार करून पाहिले तर एकच समाधानपूर्वक कारण लक्षात येते ते नीट ऐका. मुलाबाळांशी बोलताना त्यांच्या बोबड्या बोलात रमून जाताना प्रौढत्वाच्या कथा वार्ता कधी होतात का? (ज्यांची थट्टा केली) त्यांचेवर बाबांचे प्रेम नसते असे म्हणता येईल का? परंतु बोध (उपदेश) करण्याच्या कलेची विनोद व मस्करी ही एक तऱ्हा आहे. आपल्या पोटात काय रोग आहे हे काय बाळास दिसते? औषधाची गोळी जरी तो हट्टाने घेत नाही तरी त्याला कधी ओंजारून, गोंजारून, कधी डोळे वटारून, तर कधी चवदाव्या रत्नांची (छडीच्या माराची) योजना करून, तर कधी प्रेमाने हृदयाशी धरून मातेला ती पाजावी लागते. परंतु तोच मोठा होऊ लागला की, त्याचे लाड करावेसे वाटले तरी त्याच्या तीव्र व बोजड बुद्धीचा विचार करावा लागतो. ज्ञानाचे तसेच आहे. तीव्र बुद्धीचे तीव्र ग्रहण. उपदेश ठरण्यास क्षणही लागत नाही. परंतु जड बुद्धीचे कामच विलक्षण. डोक्यात ठसवायला फार कष्ट पडतात. समर्थ साई हे ज्ञानाचे भांडार आहेत. ज्या भक्तांची जशी बुद्धी तशी त्यांची पात्रशुद्धता ठरवून ज्ञानरूपी द्रव्य वाटतात. ते पूर्ण अंतर्ज्ञानी आहेत. त्यांना सर्वांची आधीच्च माहिती आहे. ज्याला जसे योग्य साधन तसेच त्यांना त्यांचे नेम घालून देणे असते. जसा ज्यांचा अधिकार तसा त्यांचा विचार करून त्यांच्या योग्यते व अयोग्यतेप्रमाणे भक्तांचा भार बाबा वाहतात. तसेच आम्ही दिसायला जरी थोर (वयाने मोठे) असलो तरी त्या सिद्ध साईसमोर खरंच आम्ही पोरांहून देखील पोर आहोत व विनोदासाठी सदा आतुर असतो. बाबा विनोदाचे आगर (सांठा) आहेत. ज्या ठिकाणी ज्यांची आवड असते ते ते त्यांना यथेष्ट पुरवून भक्तांना ते शांत ठेवतात. बुद्धिवान असो किंवा मंद बुद्धीचा असो. हा अध्याय वाचला तर परमानंद प्रगटेल, ऐकला तर श्रवणाचा छंद वाढेल आणि मनन केला तर स्वानंदाचे समाधान लाभेल. त्याचे आवर्तन (पुन्हः पुन्हः

पठण) केले तर परमार्थाचे ज्ञान होईल, निदिध्यासन (निरंतर चिंतन) केले तर खूप आनंद होईल आणि अखंड व निर्भेळ सुख प्राप्त होईल. अशी ही अगाध लीला आहे. येथला यत्किंचीतही अनुभव ज्याने भाग्यवशात् भोगला असेल तो येथे कायावाचामनाने खिळलाच (चिकटलाच) म्हणून समजावे. अशी ही साईबाबांची अतर्क्य (कल्पना न करता येणारी) लीला आहे. (ओ० १४५-१६१)

हेमाडपंत साईबाबांच्या चरणी शरण आले आहेत. विनोदमार्गाने बाबांनी ज्ञान वाटले, त्यांत भक्तांचे कल्याण हाच उद्देश व ब्रह्मार्थि हा मात्र निमित्तच. पुढील अध्याय या अध्यायापेक्षाही गोड असेल व ऐकणाऱ्याचे लाड पुरवील. माझ्या जीवाची (मनाची) गुप्त इच्छा स्पष्टपणे उघड करून पुरवीली जाईल. मी माधवराव देशपांड्यांजवळ जाईन, त्यांना बाबांचा निरोप देईन व मग कसा अनुग्रह (कृपा) पावेन हे त्यांत संपूर्णपणे ऐकावे. (ओ० १६१-१६४)

सर्वांचे कल्याण असो. अशा प्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंतांनी रचिलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्य चरित्राचा 'ब्रह्मज्ञान कथन' या नावाचा सतरावा अध्याय संपूर्ण झाला.

।। श्री सद्‌गुरू साईनाथांना अर्पण असो — सर्वत्र शुभ असो ।।

# दिन सोनीयाचा उगवला
# शिर्डी साईराम प्रवेशिला

— श्री. वि. म. हटवार
१४९, रेशीम बाग,
नागपूर-९.

● सर्वश्रेष्ठ श्रीरामाची अयोध्यापुरी, श्रीकृष्णाची मथुरा तशीच श्रीसाईबाबांची शिरडी ही पवित्र भूमि आहे. साईराम शिर्डीस आले तो सव्वाशे वर्षांपूर्वीचा दिवस खरोखर सोनीयाचा ठरला, ज्या शुभ दिनी म्हाळसापतीने 'आओ साई' या शब्दांनी श्रीसाईचे स्वागत केले. प्रथमदर्शनी ओळख पटणे हा योग असतो. योग या शब्दाचा अर्थ जोडणे असा असला तरी जो जोडला जातो त्यास 'योगी' म्हणतात. योगी प्रसन्नमुख, सद्‌गुणी व तारक असतात.

श्री साईबाबांनी आपल्या निर्वाणाच्या सात वर्षे आधी रामनवमी उत्सव शिर्डीला सुरू केला. श्री रामाचा आदर्श साईभक्तांनी स्वतःच्या जीवनात उतरवावा हाच त्यांचा उद्देश त्यामागे असावा. रामासारखा प्रजेची नित्य काळजी वाहणारा राजा झाला नाही. रामराज्याचा आदर्श आजही हितकारक आहे, याची जाणीव ठेवून कार्य झाले पाहिजे, असेच श्री साईबाबांस सांगायचे होते. श्री साईराम शिरडीचे आराध्य दैवतच नव्हते तर त्यांच्याशी ज्या भक्तांनी सम्पर्क साधला त्या सर्वांचे ते हृदयसम्राट बनले.

**असे जया अंतरी भाव जैसा, बसे तया अंतरी साई तैसा।**
**तेणें तुझी काय नाही केली चिंता, राहे त्या श्रीरामा आठवूनि।।**

खरा देव तोच. जो प्रत्येक प्राणिमात्राच्या ऐहिक कल्याणाची आणि त्याबरोबरच मानवांच्या पारमार्थिक कल्याणाची काळजी वाहतो, भक्तांवर अनुग्रह करतो. अयोध्येच्या श्री रामाने जो आदर्श भक्तराज हनुमंतास दर्शविला, तोच आदर्श शिरडीच्या साईरामाने आपल्या प्रिय साईभक्तांना दाखविला. श्रेष्ठ साईभक्त दाभोलकरकृत 'श्री साईसत्‌चरित्र' पोथी वाचून, साईरामाची भक्तकल्याणाची भावना लक्षात येऊन माणूस सबूरीने जगू लागतो.

श्री रामाने आपल्या केवळ दर्शनाने अहिल्येचे पातक नाहीसे करून पदस्पर्शाने उद्धार केला. दृष्ट प्रवृत्तीच्या राक्षसांचा नाश केला. परशुरामाचे गर्वहरण केले. जेथे सामर्थ्य असेल तेथे लक्ष्मी असते. जेथे राम तेथे सीता हे रामायणाने दर्शविले आहे. जेथे सत्व नसेल तेथे लक्ष्मी नसते. सदाचरणी माणसाचा सहवास कष्टदायक होतो. जो मनुष्य नेहमी प्रातःकाळी आणि सायंकाळी एकाग्र अन्तःकरणाने रामनामाचे स्मरण करील, त्यास मनःशांति लाभते आणि सत्कार्याची प्रेरणा मिळते. काळ बदलला असला आणि विज्ञान युगात आज धर्मावर व देवावर श्रद्धा असणारे लोक कमी असले तरी दिवसेंदिवस शिरडीला श्री साईरामाचे दर्शन घेणारे भाविक आणि भक्तांची संख्या वाढतच आहे. जशी श्रीरामचरणी हनुमंताची सेवा रूजू झाली, तशी साईचरणाची पहिली पूजा म्हाळसापतीने केली. म्हाळसापती शिर्डीचे राहणारे असून पूर्वीपासून खंडोबाचे भक्त होते. श्री साई स्मरणाने अन्तःकरण शुद्ध होते, हा साईमहिमा आहे.

भगवान श्रीराम गुरूकुलात असताना जे अन्न खात तसेच श्री साईराम माधुकरी मागून आणलेले अन्न गुरूस अर्पण करून नंतर सेवन करीत असत. गोदाकाठच्या साईरामाने शिर्डीतील आपले गुरूस्थान दाखविले, तेव्हां सर्वांना सद्‌गुरूचा महिमा कळला. श्रीरामाच्या यज्ञाचे प्रतिक म्हणून अखंड धुनी चेतविली. धुनीतील उदी हा सद्‌गुरूचा प्रसाद आहे.

श्री साईरामास भगवान रामचंद्राची रामलीला ऐकण्याची फार आवड होती. ते भक्तांकडून भावार्थ रामायण वाचून घेत असत. स्वतःचा अंतकाळ जवळ आला तेव्हाही श्री साईरामांनी श्रीराम-विजय ग्रंथ वाचून घेतला होता.

संत कबीर यांना श्री रामानंदास गुरू करावयाचे होते. पहाटे अंधुक प्रकाशात कबीर गंगेच्या घाटावर आले. रामानंद स्नान करून येत आहेत, हे पाहून कबीर एका पायरीवर झोपले. कबीरास पाय लागताच अंधारातच रामानंद 'राम राम' म्हणाले. कबीराने चटकन् त्यांचे पाय धरले आणि मुखातून आनंदोद्‌गार निघाले, आज रामनाम मंत्राचा उपदेश देऊन आपण माझे गुरू झालात. तेव्हापासून कबीर आपल्यास रामानंदाचा शिष्य सांगू लागले. श्रीराम किंवा साईराम नामात शक्ती आहे. शक्तीची उपासना करण्याची भक्ती असली तर श्रद्धेने आणि सबुरीने साईकृपेचे फळ मिळते.

**आत्म चिंतनी रमवा निशिदिनी साईसद्‌गुरू तुम्हीच ना।**
**अनन्यभावे शरणागत मी, साई-श्रीराम तुम्हीच ना।।**

# श्री साईबाबांचे बोल व त्यांची सूत्रे

ईश्वर आहे हे सत्य मान
ईश्वर नाही हे खोटे समज
सब अल्लाही अल्ला आहे
रहे नाम अल्लाका।

हा सर्व अल्लामियाचा खेळ आहे.

अल्ला मालिक है। दुसरा कोई नहीं। त्याची करणी अलौकिक, अमोलिक, अकळ आहे.

अल्लापेक्षा कोणी मोठा नाही. तो कोण्या तऱ्हेने जीवदान देईल, कोण्या तऱ्हेने सांभाळील हे त्याचे त्यालाच ठाऊक.

गरीबोंका अल्ला वाली है। अल्लासे कोई नहीं।

देव किनई लई कनवाळू आहे. आपणच त्याच्यावर भरंवसा ठेवीत नाही आणि सबूरी पकडत नाही.

देव भेटायला लोखंडाचे चणे खावे लागतात. लई कठिण गोष्ट आहे. तरी पण देव लई मायाळू आहे. अरे, तो लांब कुठे आहे? अगदी अगदी जवळ आहे, पण तो भेटायला निष्ठा आणि सबूरी पाहिजे. या दोन्ही गोष्टी जवळ असल्यास तो दूर नाही.

अक्कलसे खुदा पहचानना।
वाड्यात बसलेल्याला ओळखले पाहिजे.
मालकाला ओळखले पाहिजे.

ईश्वर करेल तेच होईल. त्याचा रस्ता तोच दाखवील आणि विनाविलंब मनाची मुराद पुरी होईल.

वह जैसा रखेगा वैसा रहेना।
बुरेसे खुदा डरे और खुदासे बुरा डरे।

अच्छा तऱ्हेसे चलो, अल्ला अच्छा करता है। बुरा तऱ्हेसे चलेंगे तो बुरा होता है। हम गाणगापूरमेंभी है, पंढरपूरमेंभी है, सब ठिकाणमें है, सब जगमें हम है और हमारे पास सब जग है।

मी सगळीकडे फिरतो गड्या: मुंबई, पुणे, सातारा, नागपूर ही सगळी शहरे रामाने भरली आहेत.

सर्व ठिकाणी मी पूर्ण भरलेला आहे. जे डोळ्याने दिसेल ते सर्व मिळून मी आहे. माझे येणे जाणे नाही. मी हालत अगर चालत नाही. आपण चांगले करून अल्लाला द्यावे म्हणजे चांगलेच होईल; चांगले करील त्याचेच मालक अल्ला आहे. वाईट करतात व चांगले माझेजवळ मागतात; मी कोठून देऊ?

भल्याभल्यांची बुद्धी चालत नाही. मग आपली काय गोष्ट? ऐकावे आणि स्वस्थ बसावे. ज्याच्यावर ईश्वरी कृपा होते तो बोलत नाही; पण ज्याच्यावर ईश्वरी अवकृपा होते तो फार बोलतो. गर्वाने चढेल तो पडेल.

नेक व्हावयास पुष्कळ घडावे लागते. (पुण्याची जरूरी आहे.) माझे बाळगोपाळ

जरी हजारो कोसांवर असले तरी मी त्यांना जवळ बोलावून आणीत असतं.

माझी बाळगोपाळ आली की मला लई बरं वाटतं आणि मला दोन घास आनंदाने जातात. आन् मुठभर मांस वाढतं. माझ्या बाळगोपाळांची चिंता मला रातंदिवस सारखी ठेवावी लागते, आणि कवडी कवडीचा हिशोब मला देवाला द्यावा लागतो.

एका भक्ताने बाबांस विचारले, "हे जाते कशाला ठेवले आहे व आपण कां बर दळता?" बाबा त्याला म्हणाले, "इथे जे येतात त्यांचं मलां दळावं लागतं बरं!" (भक्ताला त्याचे प्रारब्ध व क्रियामाण कर्मापायी होणाऱ्या यातना इच्छादि यांचेसाठी सदगुरूस शिणावे लागते. जनन मरणाचा फेरा चुकविण्याची शक्ति एका सदगुरूचे शिवाय कोणासही नाही.)

आपल्या बाळगोपाळांना ती (उदी) लई कामाला येईल. जपून ठेवावी.

इकडे शिरडीस मस माणसे मुंग्यावाणी येतील. तू काही घाबरू नकोस; मी तुझ्याच जवळ आहे.

पन्नास हजार आले आणि छपन्न हजार गेले त्याच्याशी आपल्याला काय करावयाचे? ज्याची निष्ठा धड आहे आणि इमान शाबूत आहे त्याला सात समुद्र न्याहाल करीन. माझ्या माणसांना बहात्तर पिढ्यांपर्यंत मीच सांभाळतो.

हजारो कोसांवर जाऊन हजारो लोकांना मला सांभाळावे लागते.

माझी नजर सगळ्यांवर सारखी आहे. खटनट, सुष्टदुष्ट सगळ्या तऱ्हेची माणसे आपल्या दरबारात येतात. त्या सगळ्यांवर मला सारखी नजर ठेवावी लागते.

आपल्या दरबारात सर्व तऱ्हेचे लोक येतात. चांगलेही येतात, वाईट, खट, नष्ट, दुष्ट असेही येतात. आपण कशाला कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या काढाव्या?

अरे, माझी कृपा कोणावर नाही? सर्वांवर माझी कृपा सारखीच. माझे कृपेवाचून झाडाचे एकही पान हालत नाही.

हम किसीके बंदे नाही है। अल्लाके बंदे है।

लोकांना गाव आहे, मला जंगल आहे
लोकांना मकान आहे, मला मकान नाही.

माझी एकच घोड्याची बगी आहे. पण तो एक घोडा दहाबारा माणसांना घेऊन जातो. [घोडा (प्राण) दहाबारा माणस (इंद्रिये) घेऊन जातो, मरणानंतर (श्रीमद्भगवद्गीता, अ. १५)]

चौघांचे मुडदे पाडीन (चारी देहांचे निरसन करीन.)

माझे प्राण गेले तरी मी म्हणतो ते ध्यानात धरा. माझी हाडे तुर्वती मधून तुम्हांस आश्वासन देतील. मी काय पण माझी तुर्वत तुमच्यासवे बोलत राहिल. जो तीस अनन्य शरणागत आहे, त्याच्यासवे डोलत राहील. मी डोळ्यांआड होईन ही चिंता माझ्याविषयी करू नका. माझी हाडे बोलताना ऐकाल व तुमच्यासवे ती हितगुज करील.

साठ्यांचा वाडा बांधावयाची सुरूवात केली तेव्हा निंबाचे झाड पुढे बांधकामाला नडले असे समजून श्री साईबाबांकडे झाड तोडण्याविषयी परवानगी मागण्यात आली असता ते म्हणाले, "आपण कशाला झाड तोडावे?" पुढे काम बरेच झाल्यानंतर त्या

झाडाचा थोडासा भाग नडू लागला तेव्हा साईंना फिरून विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले, ''आडवे आले की कापून काढले पाहिजे. जेवढा भाग नडत असेल तेवढा कापून टाका.''

वादावादी करू नये. कोणी दहा बोलले आणि आपल्या मनास आले तर आपण एक बोलावे.

तू कुणाला बरे बोलू नकोस वाईट बोलू नकोस. कोणाला वाईट बोललास तर मला दुखणे येते.

अरे सापाचे दांत पाडून घशात घालावे. तो दुष्ट किती उड्या मारील ते आपणच पाहू. आपण लोकांचे बरे करीत असावे मग देव आपले बरे करितो.

आपल्यावर उठेल त्याचा नायनाट होईल.

घरात दहा माणसे असतात, तर एकमेकांचे एकमेकांशी पटत नाही. भांडण, वाईट (दहा माणसं=पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये.)

जिसकी बुरी उनके साथ। जिनकी भली उनके साथ।  
जैसे जो करील तैसे तो भरील  
जशी ज्याची नियत तशी त्याची बरकत.  
ज्याचा इरादा चांगला त्याचे सगळे चांगले.  
नेकीका फल भारी है।  
बदीका फल कम है।

पैसा म्हणतो मला वापरून पहा. मला चांगला वापरशील तर मी तुझ्या कामी येईन. अन्न म्हणते मला चांगले करून खाशील तर मी तुझ्या कामी येईन. भोगी आत्म्याकरीता योगी आत्मा चांगला.

द्रव्य कोणाचे घेऊ नये. निरपेक्ष असावे.  
चिंधीवाला मंदिल वाल्यापेक्षा चांगला.

आलास कशाला? गोवऱ्या वेचायला? (आहार करून विष्टा करायला?)

लोकांचे मनशिक कोठे चांगले आहे? मनशिक चांगले पाहिजे.

तेली लबाड, यह तेल नहीं खाना, घी खाना. (तेला प्रमाणे तरंग उठविणारे मन लबाड आहे. शांतिरूपी घृत सेवन केल्याने लाभ होतो.)

पहा लोक कसे मतलबी असतात! वेळ आली म्हणजे साथीदाराला सोडून आपल्या मतलबाला दक्ष असतात. म्हणून आपण असा साथी करावा की, जो आपल्याला कल्पांतीही सोडणार नाही. (अर्थात् सदगुरूराया शिवाय असा दुसरा साथी कोण मिळणार आहे? म्हणून साथी करावयाचे तर त्यांनाच करावे. प्रेम भूतमात्रांवर असावे, पण संग सदगुरूचाच करावा. तोच संग खरा सुखकर होतो.)

आम्ही लोक असे आहोत की भांडू तर एकमेकांच्या उरावर सुद्धा बसायला कमी करणार नाही. पण आम्ही कधीही एकमेकाला बिछुडणार नाही. (सोडणार नाही.)

दोरी सद्गुरूच्या हातात एकदा दिली म्हणजे काळजी करण्याचे कारण नाही.

मी कुणाला सोडणारा माणूस नाही,  
गुरू मानायचा असतो, करावयाचा नसतो.  
आनंदात आहे असेच म्हणावे

पोटात काटे भरावे पण महाराच्या येथे जेऊ नये. (षड्रिपूंच्या आधीन होऊ नये.)

अंगात महार (षड्रिपूं) आहे तो काढून टाकावा.

दुनिया इकडची तिकडे झाली तरी आपण मागे पुढे होऊ नये. निश्चल राहून कौतुक तेवढे पहावे. (साक्षीवत् रहा.)

कोणाचे होऊन रहावे किंवा कोणाला आपले करून रहावे.

जिन्ने पाया उन्ने छिपाया (घडा जोपर्यंत भरत नाही तोपर्यंत आवाज करतो.)

मागितले पाहिजे. (मागितल्याशिवाय आईपण वाढत नाही.)

फिरल्यावाचून चरता कसे येईल?

संसार कोणाला चुकत नाही. मग तुम्ही कष्टी होऊन भोगा की आनंदी होऊन भोगा.

मातीत माती मिळेल आणि पखेरू उडून जाईल.

मस सांगे लोकाला शेंबुड आपल्या नाकाला. (परोपदेशे पांडित्यम्.)

काही लाग्याबांध्याशिवाय मनुष्य काय पण पशुपक्षीही कोठेही जात नाहीत. म्हणून कुणालाही हडहड करू नये.

आलेल्या गेलेल्याचा आदर कर, तृषिताला पाणी दे, भुकेलेल्यास भाकरी, उघड्यास वस्त्र व घर नसलेल्यास बसावयास ओसरी द्यावी म्हणजे श्री हरी तुष्ट होईल.

एका भक्ताने बाबांना दोन रुपये दक्षिणा दिली तेव्हा बाबा त्याला म्हणाले, "अरे, आणखी दोन दे; दोन देशील तर चार होतील, चार देशील तर आठ होतील. पेरशील तर उगवेल, पेरलेच नाही तर उगवणार कोठून?

एका भक्ताने बाबांना सव्वा रूपया दक्षिणा दिली. बाबा त्याला म्हणाले, "याने तर सव्वा रूपया दिला-रुपया सव्वा दिला. श्रीराम परवर दीगार। सत्तेचे आपले घर।। हे आहे एक मी येथे। यावे हो नेहमी बरे।।

एका भक्ताने बाबांना विचारले, "बाबा, माझा गणपती उजव्या सोंडेचा आहे आणि त्याचा एक हात मोडलेला आहे. लोक सांगतात अशी मूर्ती घरात ठेवू नये, पाण्यात शेळवावी." तेव्हा बाबा म्हणाले, "आपल्या मुलालेकराचा हात पाय तुटला असता तर आपण त्याला बुडविती का? तो गणपती लई लकी आहे. त्याची पूजाअर्चा रोज करीत जावी."

कुणाला पैसा हवा असेल व तुझ्या मनात देण्याचे नसेल तर देऊ नको पण त्याच्या बरोबर कुत्र्यासारखा वागू नकोस.

आपुले कर्म आपुल्यासंगे, दुजियासंगे. (भीक मागत असलेल्या अगदी गरीबाला पाहून कोणी तार्किकाने असा विचार केला की, त्याच्या (गरीबाच्या) कर्माचे फळ (दु:ख, गरीबी) तो भोगत आहे त्यात आपण मदत करून ईश्वरी योजनेत काड्या घालण्याचे कारण काय? तर त्याचे उत्तर असे की त्याचे कर्म आहे तेच आहे. त्याचा विचार करण्याचा खटाटोप केल्याशिवाय त्याला ईश्वररूप मानून आपण साहाय्य केले तर ते पुण्यकर्म आपल्याबरोबर येईल. आणि देण्याचा इरादा न ठेवता त्याचा तिरस्कार केला तर अतिथिदेवाचा तिरस्कार केल्याचे पाप लागेल व ते आपल्याबरोबर येईल.)

तुमच्या आणि माझ्यामध्ये 'तेल्याची' तसेच 'वाण्याची' भिंत आहे ती पाडून टाका

म्हणजे सगळे समजेल. नंतर तुम्ही ते मी व मी ते तुम्ही. (तेल चिकट असते, स्निग्ध असते व ते संसारिक प्रेमाचे एक चिन्ह समजले जाते. पण त्याच्यात राहिलेला चिकटपणा, मनुष्य स्वभावातील आसक्ती, काढून टाका, निःसंग व्हा असा भावार्थ घेऊ शकतो.)

रोहिला रात्रभर त्रास देतो अशी तक्रार झाल्यावर बाबा म्हणाले, "त्याची बायको अनावर झाली आहे, ती मला सतवायला येते पण त्याच्या ओरडण्याने पळून जाते व मला झोप लागते."

माझे सरकार म्हणत, 'लुटा, लुटा, घ्या, घ्या. माझा खजीना उतून जात आहे. खोदा, खोदा, गाडी आणा आणि तिच्यात खजीना भरून घेऊन जा. पण कोणीही प्रयत्न करत नाही, कोणाला मेहनत करावयाची नाही, जो तो येऊन माझ्या सरकारकडे मागण्याऐवजी माझ्याकडे मागतो. माझी काय महती? हे तर मातीत मिळेल, वाऱ्याला वारा मिळेल. पण माझ्या सरकारची, भगवानाची, फकीराची कळा न्यारी आहे. मागा त्याच्याकडे मागा.' (तपरूपी मेहनतीने मागणीचा आर्तनाद ईश्वरापर्यंत पोचवा.)

माझी दुर्व्या (द्रव्य) वावरा वावराने पडली आहे.

अलिकडे किनई मी लई बेजार झालु आहे. कुणाला पैका पाहिजे, तर कुणाला बाईल पाहिजे, तर कुणाला ल्योक पाहिजेत. माझ्याजवळ आहे ते तर कुणीबी मागत नाही. बघीन बघीन आन् एकाद दिवस अस्साच गपचिप चालेला जाईन. लई कंटाळा आलाय.

बाबांनी १९१८ साली विजयादशमीच्या मूहूर्तावर समाधी घेतली. त्या आधी काही महिने ते एका भक्ताला म्हणाले, "आता आपल्याला शिरडीस यायच नाही बर. मी तरी तुझ्या बरोबरच आहे व तुझ्या संगच राहीन बर. इथ लइ लोक खराब झाले अक्षि सतावतात. पै पैका मागतात. पुन्हा बेमान होतात. आपण आता कंटाळलो बरं."

*****

# साईकृपा

**— माधवी फडके**
१०, राज्य मंत्र्याचे निवासस्थान,
सिव्हील लाईन, नागपूर.

तो दिवस शनिवार होता. मी सायकल चालवित होते. रस्ता पार करताना एका स्कूटरने माझ्या सायकलीला ठोकर दिली. दिनांक १-१२-१९८४ रोजी ५ वाजता ही घटना घडली. मला त्यानंतर काय झाले ते कळलेच नाही. माझे दिनांक ४-१२-८४ रोजी डॉ. बाभुळकर यांनी सकाळी माझ्या पायाचे ऑपरेशन केले व ऑपरेशन ठिकही झाले. थोडक्यात बचावले होते, ही सर्व साई लीलाचीच कृपा! १५ मे १९८५ ला शिर्डीला जाऊन आपले नतमस्तक साई चरणी ठेवले. त्यांच्या आशिर्वादानेच मी या अपघातातून वाचले होते.

# साधना आणि सहजसमाधी

— **श्री. चकोर आजगांवकर.**
एम्.ए. (उपसचिव, शिक्षणखाते),
वाय ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

संत कबीर व साईबाबा या दोन महात्म्यांच्या जीवनात व विचारात इतके साम्य आहे की, बाबांचा कबीर हे पूर्वावतार होते अशी विचारधारा मनाला पटते. सहजसाधना व सहजसमाधी, पंथजात विहीन मानवतावादी दृष्टीकोन हा वारसा दोन्ही महात्म्यांनी भारतीय समाजाला दिला. कबीरांनी सहजमीलन व सहजसाधना यांचा पुरस्कार केला आणि बाबांचा गुरुमार्गही असाच समांतर अशा गुरुध्यानाचा, गुरुमीलनाचा व सहजावस्थेतील कृपेचा होता. साई आणि कबीर दोघांना मशीद मंदिराबाहेरील निर्गुण निरंजन राम-रहिमांचा साक्षात्कार झालेला होता.

"तो वसे मशीदित अल्ला — बेहर वसे मग कोण?
मूर्तीत नांदतो राम — मग विश्वी राहे कोण?
जी नारी अथवा नर जो — ते सर्व रूप देवाचे
मी दास साई रामाचा — ते पीर, गुरूही माझे!"

परमश्वररूपी प्रियकर सदैव जवळ असतो. मायेचा घुंघट दूर केल्यावर त्याचे दर्शन घडते, तो दैवी प्रियकर घटाघटात भरलेला आहे. देहभाव व देवभावाचे सरळ मीलन घडताच ह्रदयात आनंदाचे अनाहत गीत गुंजत रहाते —

देही देही वसतो साई — प्रीती ही अनमोल खरी
कबीर बोले शब्द अनाहत — ह्रदयातुन आनंद भरी!

कबीरांना गुरूंनी दिलेल्या सिद्धनामामुळे ह्रदयातील "साई" समजला. परमेश्वर अणुरेणूत भरला आहे. उन्मन अवस्थेत देहभाव विसरून केलेल्या श्वासातील अजपाजपातून साई प्रगट होत असतो.

"नगर शिवेच्या पैल वसे मी विजनाच्या छायेशी
शोध मला मी खेळत बसलो तुझिया श्वासोश्वासी!"

कबीर रसवंतीला निर्गुण रामाचे नांव घ्यावयास सांगतात. हा राम दशरथी राम नसून निर्गुण "रं"कार आहे. या मूळ ओमकारात शक्तिसंपुरीत सिद्धतेचे माधुर्य व सौंदर्य साठले आहे. या रामनामातील माधुर्य कबीरांनी प्राशन केले व नामाची सुधा सर्वांना वाटून दिली.

"रसने! रामनाम रस प्यावा
गुणातीत तो गोड सुधारस क्षणक्षण प्राशावा"

सहजसाधना व सहजावस्था यांचा अनुभव नित्य घेणारे कबीर व साईबाबा साधकांना देहकष्ट, उपासतापास, पूजाअर्चा यात व्यर्थ नाटकीपणे वेळ गमावयास सांगत नाहीत. मूर्ती, देव्हारे, उत्सव, दांभिक उपचार यांच्या विरुद्ध दोघेही आहेत. केवळ गुरुकृपा,

गुरुध्यान, सहज अजपाजप यातून दोघानाही सत्य सापडले व तेच त्यांनी सर्वांना उपदेशिले.

सहजसमाधीचा अनुभव सर्वांना सांगताना कबीर म्हणतात की, संतसज्जनांनो, सहजसमाधी हीच खरी ज्ञानाची अवस्था आहे. ही अवस्था गुरुकृपेने जागृत झाल्यावर मला क्षणोक्षणी आनंदाचा अनुभव येत आहे. उघड्या डोळ्यांनी मी श्री हरीचे रूप पहात आहे. कान वा डोळे बंद न करता मला योग साधला आहे.

अनाहताच्या रथात बसलो आलो हरद्वारी
तडिल्लता चमकते, गुंजते ऋतंभरा वैखरी!
ज्ञाननयन उघडला, उतरलो समतेच्यापरतीरी
प्राण भृंग तो हंस भिरभिरे सहाहि चक्रावरी!
अशी समाधी क्षणहि मिटेना देह तुटावा तरी
गुरुकृपेने जागृत झाली, अनुदिन सौख्य भरी!

हृदय अष्टसात्त्विक भावांनी उचंबळले आहे, दृष्टी ज्ञानोदयाने विश्वाशी समरस झाली आहे, प्राण सर्व चक्रांत व्यापून विश्वरूपाशी समत्व पावला आहे, एका जागेवर बसून श्री कबीर त्यांच्या साईशी एकरूप झाले आहेत. जीव शिव झाला आहे. श्री साईबाबाहि एकदेशीय असूनही सहजावस्थेत सदैव विश्वात्मक झालेले असत. देहाच्या, दिशांच्या, काळाच्या सीमा ओलांडणारी ती समाधीच्या माथी पाय ठेवणारी सामरस्य अवस्था होती, निरंजनावस्था होती!

# स्मरण आणि चिंतन

**साधनेचे मर्म :-** श्रीसाईबाबांच्या प्रेमिक भक्तांच्या मनांत श्रीसाईंचे स्मरण व चिंतन या दोन्ही प्रक्रिया होतात पण त्यांचे मर्म जाणण्याचा त्यांनी प्रयत्न केला तर ते साधनेच्या दृष्टीने सुवर्ण मोलाचे ठरणार आहे.

सर्व साधना या मन, बुद्धी, अहंकार व शरीर यांच्यावरील संसाराचा व आसक्तीचा ठसा पुसण्यासाठी असतात. धन, स्त्री, कीर्ति, सत्ता इत्यादी प्रेरणा मनाला बांधून ठेवतात. कारण लहानपणापासून वस्तूवर व आवडणाऱ्या गोष्टीवर प्रेम करावयास शिकविले जाते. तसे देवावर प्रेम करावयास कुणी शिकवत नाही. त्याच्या चरणावर सर्व आवडत्या, मोहक व आकर्षक बंधनाचे समर्पण करावयाची नवी दिशा समजू शकते. पण ती समजून आचरणात आणणे कठीण असते. साधना ही नवी दिशा दाखविते. आवडत्या गोष्टी प्रभूचरणी अर्पून आपण फक्त साईप्रभूच्या चरणावर प्रेम करणे हे साऱ्या साधनाचे, व्रतांचे, तपांचे परमोच्च ध्येय आहे!

**जाणीवांची शुद्धी :-** त्यासाठी मन, देह, वृद्धी, प्राण व अहंकार या चारही पातळीवर आपल्या जाणीवाला उच्च न्यावयाचे असते. निष्काम कर्मे, भक्ति, समर्पण, ईशशरणता, नामजप व ध्यान या वाटानी मनुष्य आपली जाणीव आपले अस्तित्व शुद्ध करतो. यावर अधिक विस्ताराने लिहिण्याऐवजी येथे फक्त स्मरण व चिंतन या मनाच्या

दोन प्रक्रियांनाच स्पर्श करतो.

**देह, प्राण, मन संस्करण :-** देह सत्कार्यांनी व प्राण संयमाने शुद्ध करीत असतांना भटकणाऱ्या मनाला शिस्त लावायचे कठीण काम करावयाचे असते. कारण मन हे ओढाळ वासराप्रमाणे पंच विषयांकडे धावत दौडत असते. योग्यालाही प्राण आवरता आले तरी मन जिंकणे कठीण असते यासाठी मनाला स्मरण व चिंतन या दोन बंधनात अडकवावयाचे असते.

**चिंतन :-** विचार करणे, संज्ञा प्रवाह चालू ठेवणे, भटकत रहाणे हा मनाचा सहजधर्म आहे. यासाठी हृदयांत साईबाबांबद्दल प्रीति निर्माण करून मनाच्या चिंतनाचा प्रवाह त्यांच्या लीलांकडे, गुणसंकीर्तनाकडे, रुपाकडे मूर्तीकडे वळवावयाचा असतो. साधुपुरुषांचा संग, सत्क्षेत्रावर वस्ती, पूजा, व्रते, ग्रंथपठण इत्यादी सहज क्रियाद्वारे मनाला उच्च पातळीवर खेळवीत ठेवणे याला खरे साईचिंतन म्हणता येईल.

**स्मरण :-** हे जास्त शिस्तबद्ध व हेतूपूर्वक घडवावे लागते. साईच्या नामरूपावर अष्टोप्रहर तैलधारावत मन केंद्रित करण्याचा अट्टाहास करीत रहाणे म्हणजेच साईस्मरण होय. स्मरणात जाम व रूपाचय निदिध्यासाचे अविभाज्य अंग सामावलेले असते. या अट्टाहासातून निदिध्यास निर्माण होतो. खरेखुरे स्मरण सुरू होते. अभावितपणे न कळत नाम व रूप यात मन सहज गुंतावयास लागते. यास वेधशक्ति म्हणतात. ही वेधशक्ति स्मरणात जागृत झाली की आपण खरोखरच साईरूपी भगवंताच्या बरेच जवळपास पोहोचतो.

# हिच माझी आस देवा

तव चरणाची सेवा
हिच माझी आस देवा
चरणी ठाव मिळावा
तव स्मरणात खंड नसावा ।। धृ. ।।

तव चरणाचा ध्यास मना
तव चरणी रमू दे मना
हृदयी जपीते हा ठेवा
हीच माझी आस देवा ।। १ ।।

नयनी तूच दिसावा
चरणाचा महिमा किती गावा
ध्यानी मनी साई वसावा ।। २ ।।

हीच माझी आस देवा
साई तुजवरी जीव जडांवा
वदनी नामाचा कवळ घालावा
हृदयी तव प्रेमाचा उमाळा यावा
हीच माझी आस देवा ।। ३ ।।

मजवरी जीव तुझा जडावा
वाढवी मम भक्ती भावा
ध्यानी मनी तूच असावा
हीच माझी आस देवा ।। ४ ।।

घ्या पदरी मज देवा
मम हृदयी घ्या विसावा
जन्मोजन्मी करीन सेवा
हीच माझी आस देवा ।। ५ ।।

तव चरणाचे गुण किती गाऊ
तव चरण मम हृदयी कसे ठेवू
मन्मनी ठेवूनी तुझे नाम
करीते तव चरणा प्रणाम ।। ६ ।।

**— डॉ. सुमन खानवीलकर.**
लोणावळा, सीता कुंज,
मुंबई पूना रोड.

# कबीरः आचार— संहिता

**श्री. य.न. पंडित**
'अर्चना' शरणपूर,
नाशिक— ४२२ ००२.

संघर्षाच्या संक्रमणाच्या काळात कबीराचे सारे जीवन व्यतीत झाले. हिन्दु, मुसलमान यांच्यात तर विरोध होताच पण हिंदूमध्येही अनेक वैचारिक मतभेद होते. कर्माऐवजी जन्मावरून जातिभेद रूढ झाले होते. त्यात उच्चनीचतेचे भाव समाविष्ट होते. त्यामुळे व अन्य कारणांमुळेही धर्मांतर मोठ्या प्रमाणावर होत होते. विशेषतः राजदरबारी मान—सन्मान मिळविण्याकरीता हिंदू जसे धर्मांतर करीत तसेच हिंदू—क्षूद्रही दारिद्र्यापोटी धर्मांतर करीत होते. मुसलमानांच्या आक्रमक धोरणामुळेही त्यांनी हिंदूंना बळजबरीने धर्मांतर करावयास भाग पाडले.

सामाजिक, राजकीय, धार्मिक व तात्त्विक क्षेत्रात अनेक मतमतांतरे होती. मूर्तिपूजा व कर्मकांड यांमुळेही हिंदूमध्ये काही स्वतंत्र पंथांची स्थापना झाली होती. अशा परिस्थितीत कबीराने मानव धर्मातील मनाच्या सरळपणावर खरेपणावर अधिक भर दिला.

**जाँनि बूझि सांचहिं तजै, करै झूँठ सूँ नेह।**
**ताकी संगति राम जी, सुपने ही जिनी देह॥**

जो मनुष्य जाणूनबुजून सत्याचे आचरण करीत नाही व असत्यावर प्रेम करतो अशा मनुष्याला स्वप्नांत सुद्धा परमेश्वराची साथ न मिळो!

धर्मप्रसाराकरिता मुसलमानांनी तलवारीचा आश्रय घेतला, हिंदूंची देवळे फोडली. अशा परिस्थितीत हिंदु—मुसलमानांमध्ये सामंजस्य निर्माण करण्याचे महान् कार्य कबीराने केले आहे.

**हिंदू मूये रांम कहि, मुसलमान खुदाइ**
**कहि रहीम सो जीवता, दुहमें कवे न जाइ**

हिंदू 'राम—राम' म्हणत मरण पावतात. मुसलमान 'खुदा—खुदा' म्हणत मरण पावतात. परंतु तो खऱ्या अर्थाने जगतो, जो 'राम—खुदा' या द्वंद्वात पडत नाही.

कबीर मूलतः एक समाज सुधारक होता. त्याच्यामध्ये निवृत्ति—प्रवृत्तिचे, आसक्ति—विरक्तीचे, गृहस्थी—संन्यस्त जीवनाचे सुंदर मिश्रण झालेले दिसते.

दुसऱ्याची निंदा—नालस्ती करण्यात मनुष्याला एक प्रकारचा विशेष आनंद होतो. या प्रवृत्तीवर कबीराने कोरडे ओढले आहेत. मात्र निंदक एक प्रकारे आपणांवर उपकारच करीत असतो, असेही प्रतिपादन केले आहे.

**न्यंदक दूरि न कीजिए, दी जै आदर माँन।**
**निरमल तन मन सब करें, बकि बकि आँनहि आँन॥**

"निंदकाचे घर असावे शेजारी." निंदकाचा सन्मानच केला पाहिजे. कारण निंदेच्या द्वारा निंदक आपले शरीर व मन शुद्ध व पवित्र करीत असतो.

तसेच वाईट संगतीतून वाईटच निष्पन्न होणार. सुसंस्कारांचे महत्त्व अबाधित आहे.

संग याकरिताच आवश्यक आहे.

**सतगुर साँचा सूरिवाँ, तातें मोहि लुहारा।**
**कसर्णी दे कंचन दिया, ताइ लिया ततसार॥**

सद्‌गुरू खरा शूर वीर आहे. लोहार ज्याप्रमाणे लोखंडाला तापवून त्याला पाहिजे आकार देतो, त्याप्रमाणे सद्‌गुरू साधकावर योग्य ते संस्कार करून त्याला सत्प्रवृत्त वितो. सोन्याची परिक्षा कसोटीवरून होते, त्याप्रमाणे सद्‌गुरू साधनेच्या कसोटीवर धकाची परिक्षा घेतो व त्याला जीवनाच्या तत्त्वाची ओळख करून देतो.

जीवन दुःखाने भरलेले आहे, हे खरे असले तरी सुखदुःखाच्या पलिकडे जाता येते विशद करताना कबीराने म्हटले आहे,

**दाध बली ता सब दुखी, सुखी न देखौं कोइ**
**जहाँ कबीरा पग धरै, वहाँ टुक धीरज होई**

कर्मामुळे उत्पन्न झालेल्या दुःखापासून कोणीही मुक्त नाही. जगी सर्व सुखी असा ग आहे? पण भक्तीच्या सामर्थ्यावर, परमेश्वराला जवळ केल्यावर दुःख कसले? दैनंदिन जीवनात प्रेम—भावनेचा उपयोग केल्यास कितीतरी समस्या सुटण्यास केवढी मदत होईल. मात्र प्रेम व त्याग या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**प्रेम न खेतौं नीपजै, प्रेम न हाटि बिकाइ**
**राजा परजा जिस रूचै, सिर दे सो ले जाइ**

प्रेम शेतात पिकत नाही किंवा बाजारात विकत मिळत नाही. राजा असो किंवा तील सामान्य माणूस, कोणालाही प्रेम मिळते. पण त्या करिता त्याग करण्याची वेळ लीच तर मरण्याचीही तयारी पाहिजे.

दैनंदिन जीवनात दुसऱ्याला फसविणे, स्वतःची स्तुती स्वतःच करणे, दुसऱ्यावर जुलूम -जबरदस्ती करणे, कटू बोलून दुसऱ्याला दुखविणे, बोलल्याप्रमाणे न वागणे इत्यादी तिक गोष्टी टाळल्या पाहिजेत. तरच संसार सुखाचा होतो, मानवाला मनःशांती प्राप्त होते.-

**कबीर आप ठगाईये, और न ठगिये कोई।**
**आप ठग्यां सुख उपजै, और ठग्याँ दुःख होइ॥**

एक वेळ आपण स्वतः फसवले गेलो तरी चालेल, पण दुसऱ्याला फसविण्याचे ातही आणू नये. आपण फसलो गेलो तर फारसे दुःख होणार नाही, पण दुसऱ्याला फविले तर मात्र अत्यंतिक दुःख पदरी येईल.

**आपन यों न सराहिये, और न कहिए रंक।**
**नौ जाँणै किस विष तली, कूडा होइ करंक॥**

स्वतःची स्तुती स्वतःच करू नये. दुसऱ्याला गरीब म्हणून हिणवू नये. आपला मृत्यू व्हा होईल हे कोण जाणणार? आपली हाडे केव्हा व कोणत्या वृक्षाखाली गाडली णार आहेत, हे कोणासच माहीत नाही.

**जोरी कीयां जुलुम है, मांगत न्याव खुदा।**
**मालिक दरि खूनी खड़ा, मार मुहे मुहे मुहिं खाई॥**

कोणावरही बलप्रयोग करणे अत्याचार आहे. विधियुक्त परमेश्वराला मान्य आहे. अत्याचार करणाऱ्याच्या तोंडावर प्रहार केले जातात.

**ऐसी वाणी बोलिए, मन का आपा खोइ।**
**अपना तन सीतल करै, और न कौं सुख होइ।।**

अहंकार सोडून सर्वांशी गोड-गोड बोलावे. त्यामुळे आपणाला शांती मिळते व दुसऱ्यांना आनंद होतो. शेवटी हेही लक्षात ठेवले पाहिजे की, आपल्या कर्मानुसार फळ मिळते, म्हणून जीवनात सद्‌विचार व सदाचार यांचे विशेष महत्त्व आहे.

**राम झरोखे बैठके सबका मुजरा लेत।**
**जैसी जिनकी चाकरी वैसा उनको देत।।**

परमेश्वर ज्याच्या त्याच्या आचरणानुसार फळ देतो.

कबीरने स्त्रीला नागीण म्हणून संबोधले आहे. ती साधनेत बाधा निर्माण करणारी आहे, म्हणून तिची निर्भत्सना केली आहे. स्त्रीबद्दलचे त्याचे विचार औचित्याला व मानवधर्माला धरून आहेत असे वाटत नाही. कदाचित पुरूष साधक असल्यास त्यात स्त्री बाधा आणते व स्त्री साधक असल्यास पुरूष बाधा आणतो, असेही त्याला सूचित करावयाचे असेल. कामी पुरूषाबद्दलही त्याने तीव्र संताप व्यक्त केला आहे. तरीही स्त्रीबद्दलचे त्याचे अनुदार विचार एकांतिक वाटतात.

"कथनी" पेक्षा "करणी" चे महत्त्व कबीराने जागोजाग प्रतिपादिले आहे. तत्त्वज्ञानाच्या मोठमोठ्या गप्पा मारायच्या पण कृतीत मात्र त्यातले काहीही आणावयाचे नाही अशा बाष्फळ बडबडीवर त्याने तीव्र टीका केली आहे.

**जैसी मुख तैं नीकसै, तैसी चालै नाहिं।**
**मानिष नहीं ते स्वानगति, बांध्या जमपुर जाहिं।।**

विचार अतिशय उच्च पण आचार त्याच्या अगदी उलट असा मनुष्य कुत्र्यासारखा, तो नरकातच जाणार.

'एक तरी ओवी अनुभवावी' चे मूल्य वादातीत आहे. थोडक्यात, साधेपणा, सच्चेपणा, परोपकारी वृत्ती, त्यागाची भावना व अहंकार सोडून परमेश्वराची भक्ती या गुणांची जोपासना केल्यास मानवाला 'याच देही याच डोळां' मुक्ती मिळणे अशक्य नाही. सुखदुःखाच्या अतीत गेल्याशिवाय मनःशांती प्राप्त होणार नाही. परमेश्वराकडून सुखाची आशा करावयाची तर दुःखही त्याचाच प्रसाद मानला पाहिजे.

# हाती काम मुखी राम

— श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास,
चेंबूर (गांवठाण),
मुंबई-४०० ०७१.

कृत, त्रेता, द्वापारादी युगांचा विचार करता मनुष्याला आयुष्य प्रमाण फार होते, शिवाय त्यावेळी सत्‌विचार मनांत होते. परंतु प्रत्यक्षांत त्याचा उपयोग करताना राक्षसवृत्तीचा त्याला विरोध होत होता म्हणून भगवंताला सूक्ष्मांतून स्थुलात येणे आवश्यक होते. त्यामुळे हे कार्य भगवंतानी सगुण देह धारण करून केले.

परंतु सद्यस्थिती कलीयुगाची अत्यंत कठीण आहे. वाईट विचार, आचार, द्वेष, स्वार्थ, अप्रेम ह्याला मानव अंकीत होऊ लागला आहे. तिरूपती बालाजीकडे बघताही तो डोळ्यावर पडदा घेऊन कलीला मोकळेपणा दिलेला दिसतो. ह्या एकंदर परिस्थितीचा विचार करता 'सूक्ष्मांतून' बुद्धीत शिरून हे कार्य करणे क्रमप्राप्त आहे आणि हीच गोष्ठ 'नामाने' म्हणजे नामावताराने होणारी आहे.

संतश्रेष्ठ नामसम्राट ''ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर'' महाराज यांनी जीवाची आटापीटा करून सर्वांना 'नाम' घ्या हाच वारंवार उपदेश केला. 'नाम जे करील ते रामही करू शकणार नाही म्हणून 'राम नामाने' समुद्रावर धोंडा तरला व प्रत्यक्ष श्रीरामानी हाताने टाकलेला धोंडा पाण्यात बुडाला.

श्री मारूती रायांनी, मच्छिंद्रनाथ महाराजांनी (जे सर्व सिद्धी पारंगत होते, मृत्युला ही ज्यांचा धाक होता) अत्यंत कठीण प्रसंगात 'नामाचा आश्रय' घेतला व ते संकट मुक्त झाले.

तूर्तचा काळ संप, दुष्काळ, जागेचे प्रश्न, नोकरीचे प्रश्न, वेळेचा अभाव ह्या सर्वांचा विचार करता 'हाती काम मुखी राम' ह्या सारखा परमार्थ नाहीं.

श्री क्षेत्र गोंदवले येथे प्रतीवर्षी श्रीराम मंत्राचा १३ कोटी जप होत असतो. त्याचा भक्तांना, देशाला फायदाच होईल. परंतु तो भाग इतका पवित्र झाला आहे की, महाराज एकदा स्वप्नांत आले व म्हणाले 'येथील कोठलाही धोंडा उचल तो मारुतीच होईल' व खरोखर तसे झाले. धोंड्यावर मारुती तर निघालाच परंतु 'राम' ही अक्षरे स्वयंभू त्या धोंड्यावर आहेत.

ह.भ.प. कै. पिलुबुवा वडुजकर म्हणून नामांकित किर्तनकार होते. मुंबईत तसेच खेडोपाडी त्यांची किर्तने होत असत. किर्तनाला गर्दीही फार होत असे. लहानपणी ते वडीलांबरोबर गोंदवल्याला जात असत. त्यांच्या बाल्यस्वभावानुरूप महाराजांवर त्यांचा राग होता. त्यांचे म्हणणे असे होते की 'महाराज आम्हांला उष्टे देतात.' मी उष्टे खाणार नाही व गोंदावल्याला येणार नाही. परंतु वडिलांपुढे त्यांचे चालले नाही व ते वडीलांबरोबर महाराजांचे दर्शनाला गेले. गोंदवले येथे येताच वडीलांनी महाराजांना पेढे देऊन नमस्कार केला. महाराजांनी त्यातील अव्वळ १ पेढा घेऊन बाकीचे त्यांना परत दिले व मुलाला

म्हणाले 'अरे हे काय उष्टे पेढे होतात'? असे म्हणून लडीवाळप्रमाणे गालावर चापट मारली व म्हणाले 'अरे तू लोकांना राम म्हणावयास लावशील.'

पुढे हा मुलगा मोठा झाला. त्यांचा प्रेस होता. परंतु देश प्रेमाने वेडा झालेला 'पिलुबुवा' इंग्रजांवर काव्य करून त्यांचा द्वेष करू लागला. त्याने देश प्रेमावर "इंग्रजांविरुद्ध अष्टक लिहीले. शेवटची ही ओळ होती. 'स्वराज्याविणे का सुराज्यांत गोडी" ह्या अष्टकांमुळे इंग्रज सरकार कृद्ध झाले व त्यांनी प्रेसवर छापा घालून खिळ्यासकट सर्व जप्त केले. पुढे चरीतार्थासाठी त्यांना 'झांज' हाती घ्यावी लागली. व लोकांकडून 'रघुपती राघव राजाराम पतीत पावन सीताराम' हे भजन म्हणून घ्यावे लागले. त्यांचा आमचा घरोबा होता. त्यांची किर्तने आमच्याकडे होत असत. बिघडलेली संसार घडी 'रामनामाने' तारीली.

कै. दत्तात्रय सखाराम कुवळेकर व त्यांची पत्नी श्री. मालतीबाई हे दापंत्य मुंबईत होते. घरची परिस्थिती अचानक बिघडून अन्नाला महाग झाले. काय करावे काही सुचेना. नोकरी गेली. आणि सर्व बाजूने वनवास पाठीशी लागला. सर्वत्याग करून गाणगापूरला पडेल त्या परिस्थितीत राहून आयुष्य संपवावे असे मनात आले. दरम्यान शिर्डीला जाऊन बाबा काय करतात ते पहावे असे ठरवून उधार उसने करून ही मंडळी शिर्डीला आली. समाधीचे दर्शन घेतले. परंतु तेथेही पैसे जाण्यापलीकडे उपयोग झाला नाही. परत मुंबईला आले. मुंबईला आल्यावर रात्रौ 'भक्त वत्सल श्री साईनाथ' स्वप्नात आले व म्हणाले "तुझी सोय गोंदवले येथे केली आहे" त्यांना गोंदवले कोठे आहे तेथे काय आहे याची कल्पना नव्हती. परंतु पुढे माहिती मिळून गोंदवले येथे जाणे झाले. १६ ते १८ वर्ष पर्यंत सेवा केली. आता श्रीमती मालतीबाई आहेत. महाराजांचे कृपेने त्यांना वाशी (नवी मुंबई) येथे जागा मिळाली आहे व महाराज अजूनही त्यांचा संसार चालवित आहेत. "दुःखात रामनामामुळेंच मी आनंदाने दिवस काढले. हाती काम मुखी राम हा मंत्र आचरणांत आणला."

श्री. गोपाळराव मंजिरे व काशिताई मंजिरे ह्यांचा विवाह प्रत्यक्ष श्री गोंदवलेकर महाराज यानी लावला होता. आज ही दोघेही हयात नाहीत मात्र श्री. काशिताई ह्यांना कृपाप्रसाद म्हणून महाराजांनी आपले पायातील वापरलेल्या 'खडावा' दिल्या आहेत. त्यांचे पुत्र श्री. राजाभाऊ मंजिरे टिळक नगर बि.नं. ६४, चेंबूर, मुंबई नं. ८९ येथे आजही ह्या पहावयास मिळतात. हे भाग्य त्या मातोश्रींचे पुण्याईचे प्रतीक आहे.

जय जंय श्रीराम, जय जय श्रीराम

# श्री दत्तगुरूंचा कलियुगातील अवतार

**श्रीमती ज्योति उमडेकर**
द्वारा श्री. मिलींद प्रभाकर उमडेकर, असिस्टंट स्टेशन मास्टर,
शांता सदन
१८ नवी पेठ, उज्जैन

**परित्राणाय साधूनाम्, विनाशायच्च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थीय, संभवामि युगे युगे ।।**

असे 'श्रीमद्‌भगवद्‌गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले. त्याप्रमाणे जेव्हा जेव्हा ह्या पृथ्वीवर अधर्माचं प्राबल्य होऊन, दुष्टांच्या अत्याचारामुळे धर्माचे तेज नष्ट होऊ लागले तेव्हा परमेश्वरान मत्स्य, कूर्म , वराहादि अवतार घेऊन पृथ्वीच रक्षण केल. जेव्हा जेव्हा समाजाची दिशाभूल झाली व तो अधःपतनाच्या खाईकडे वाटचाल करू लागला तेव्हा ह्याच परमात्म्यानं अनेक संतांच्या रूपानं आपला आविर्भाव करून, सगुण साकार रूप धारण करून, भारतीय समाजाला योग्य मार्गदर्शन केल व भारतीय संस्कृतीच विश्वातलं सर्वतोपरिने, सर्वोत्कृष्ट स्थान अबाधित ठेवलं.

देवांनाही आपल्या पातिव्रत्यानं चकित करणाऱ्या सती अनुसयेच्या पोटी जसा ब्रम्हा-विष्णू-महेश या देवांच्या अंशापासून श्रीदत्तांचा अवतार झाला, तसाच ह्या कलियुगातही एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत, म्हणजे जवळजवळ शंभर वर्षे, समाजाला सत्यमार्गाला लावणारे, ईशभक्ति व सदाचरण ह्यांचे महत्त्व पटवून देणारे ईश्वराचे तीन अंश, जणू सत्यदत्तच अशा रूपाने विद्यमान होते. ते म्हणजे शिरडीचे श्री साईबाबा, शेगावचे श्री गजानन महाराज व इंदूरला ज्यांचे समाधिरूपाने नित्य वास्तव्य आहे असे श्री माधवनाथ महाराज.

ह्यांपैकी श्री साईबाबा व श्री गजानन महाराज यांचा जन्म केव्हा झाला ही माहीती उपलब्ध नाही. श्री साईबाबा एका वरातीत प्रगट झाले व श्री गजानन महाराज शेगावला उकिरड्यावर अकस्मात प्रगट झाले असे वाचनात येते. श्री माधवनाथ मात्र करवी, चित्रकूट येथे श्री बालाजी मंदिरात जन्मले, असा उल्लेख त्यांचे 'संपूर्ण चरित्र श्री माधवनाथ संजीवनी' ह्या ग्रंथात आहे.

काही असले तरी ह्या संतांचा उद्देश एकच होता. तिघेही प्रसिद्धीपासून दूर राहिले. कोणी जास्त उपद्रव देऊ नये म्हणून समाजापासून शक्य तितके लांब राहून एकांतात ईशचिंतन करणे हेच त्यांचे काम असे. सामान्य माणसांप्रमाणे शाळेत वगैरे जाऊन त्यांनी काही लौकिक रूपाने शिक्षण घेतले नाही.

श्री गजानन महाराज उष्टया पत्रावळी चाटण्याचा विक्षिप्तपणा करीत, श्री साईबाबा सगळीकडे तेल मागत व एकदा श्री माधवनाथ एका पाटलाचे शेत राखणीस बसले असताना पाखरे शेत खाऊन गेली. गव्हाचे नुकसान झाले म्हणून त्यांना पाटलाकडून त्रास सहन करावा लागला. असा ह्या संतांना अपमान सोसावा लागे.

परंतु कितीही झाकून ठेवले तरी सूर्याचे तेज प्रकट झाल्याशिवाय रहात नाही. तशी ह्या संतांची किर्ती हळू हळू सगळीकडे पसरू लागली व अनेक लोक त्यांच्याकडून अनुग्रह घेऊन त्यांचे शिष्यत्व पत्करू लागले. तिघांनीही आपल्या नावावर स्वतंत्र ग्रंथनिर्मिती अशी केली नाही. ज्याप्रमाणे संत रामदासांनी दासबोध, ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी किंवा तुकारामांनी अभंगगाथा असे ग्रंथ लिहिले तसे काही ग्रंथ ह्यांनी लिहिले नाहीत. परंतु शिष्यमंडळीशी वार्तालाप करताना किंवा सामान्य जनांना उपदेश देताना जे काही तत्त्वज्ञान ह्यांच्या मुखांतून बाहेर पडे त्याने अनेक ग्रंथ लिहिले गेले असते ह्यात वानवा नाही.

श्री गजानन महाराजांचे 'गणगणगणांत बोते' हे भजन विशेष प्रिय होते, तर श्री माधवनाथ 'आम्ही अळीकर प्रेमसुखाची लेकरें', 'देव रंगारी रंगारी' वगैरे भजने नेहमी म्हणत असत. अनेक अश्रद्ध लोकांना ह्या संतांनी आपल्या ठिकाणी त्यांच्या इष्टदेवतेचे दर्शन देऊन सश्रद्ध बनविले, अंतर्ज्ञानाने त्यांच्या मनातील विचार जाणून, तसेच आवश्यक झाले तेव्हा त्यांचे विचारपरिवर्तन करून नंतर अनुग्रह दिला.

ह्या तीनही संतांचे आपसात असे तादात्म्य होते. एकदा इंदूरच्या बाळासाहेब रेग्यांना श्री माधवनाथांनी एका चिठ्ठीवर केवळ 'देवीचे दर्शन' हे दोनच शब्द लिहून देऊन श्री साईबाबांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते भेटल्यावर बाबांनी समाधिस्थानाच्या खिडकीच्या कठड्यावर ठेवलेल्या चिठ्ठीतील निरोप जाणून रेग्यांना देवीचे दर्शन दिले. तेथेच त्यांना श्री नाथ व बाबा समोरासमोर दिसले. एकदा श्रीनाथशिष्य तात्यासाहेब बानवळे व आणखी एक सदगृहस्थ असे श्री गजानन महाराजांच्या भेटीस शेगावला गेले, तेव्हा ते 'नाथके दो छात्रे आते है।' म्हणून आनंदाने खूप नाचले व भोजनोत्तर दोघांना दोन विड्याची पाने दिली. श्री नाथांना निरोप दिला की ' साथे भोजन किया और तुम्हारा पान यही रह गया।' श्री नाथांना विडा अतिशय प्रिय असे.

प्रायः ह्या संतांचा उपदेश हाच होता की, निष्काम कर्म करावे, कर्मफलाची इच्छा धरू नये म्हणजे संचित जीवाला चिकटत नाही व मोक्ष प्राप्ती सुलभ होते. इंद्रियसंयम करावा. मायामोह टाळावे. असाच उपदेश करीत असतांना एकदा श्रीनाथांना वासुदेव गणेश थत्ते ऊर्फ विवेक ह्यांनी प्रश्न विचारला की, 'असे जर आहे तर संत चमत्कार तरी का करतात? हा सुद्धा एक प्रकारचा मोहच नव्हे का? श्रीनाथ उत्तर देतात, 'थोर विभूति जर सामान्य मनुष्यांसारख्याच वागल्या व स्वतःच्या प्रभुत्वाची साक्ष त्यांनी अज्ञानी मनुष्यास पटविली नाही तर त्यांच्यावर कोणाची श्रद्धा बसणार नाही व अज्ञानपंकांत रूतलेल्या जीवांचा उद्धार ते करू शकणार नाही. म्हणून असे चमत्कार करणे त्यांना आवश्यक असते.

श्री साईबाबांनी आपल्या योगबळाने दिवाळीत तेल मिळाले नाही म्हणून पाणी घालून पणत्या तेवविल्या. श्री गजानन महाराजांनी योगबळाने वायुनिरोध करून अंगात घुसलेले मधमाशांचे डंख बाहेर काढले. तसेच श्री माधवनाथ यांनी एका भक्ताच्या मुलाच्या अंगावर आलेले देवीचे फोड स्वतःच्या अंगावर घेऊन त्यास वाचविले. असे अनेक चमत्कार ह्या संतांनी केले. या संक्षिप्त लेखात जास्त वर्णन करणे अशक्य आहे.

भक्तांवर कृपा करण्याच्या बाबतीत श्री साईबाबा म्हणतात, 'जो जो मज भजे जैशा-जैशा भावे, तैसा तैसा पावे मी ही त्यासी ।।' श्रीनाथ म्हणतात, 'जो जे वांछी साधक भावें लाभे फल तैसे तयाला ।।'

श्री साईबाबा म्हणतात, 'मी जरी शरीर टाकून गेलो तरी तुम्ही स्मरण करतांच मी तुमच्याजवळ उभा आहे हे निश्चित समजा' त्यांच्या अस्तित्वाचे अनेक अनुभव आजही भक्तांना येतात. तसाच श्री नाथांच्या समाधितील त्यांच्या अस्तित्वाचा एक प्रत्यक्ष अनुभव ही त्यांची अज्ञ बालिका सांगत आहे. दि. १३-१२-८२ ला मी उज्जैनला असताना सोमवारी पहाटे स्वप्न भास झाला की, 'मी इंदूरला नाथमंदिरात आहे. प्रदक्षिणा करून गाभाऱ्याबाहेर आले, तो एक ८-९ वर्षांचा तेजःपुंज बटु मला म्हणाला की, 'तुम्ही अजून इथं एकदाही अभिषेक वगैरे केला नाही. तुम्ही स्वतःच्या हाताने अभिषेक करा.' मी म्हटलं, 'बरे, आज गुरूवार आहे. मी सोमवारी अभिषेक करीन.' तो बटु अदृश्य झाला. स्वप्नही संपले. योग असा की, दि. १५ ला मी इंदूरला आले व दि. २० ला सोमवारी ब्राह्म मुहूर्तावर माझ्या हातून मी नाथांना अभिषेक झाला ही त्यांचीच कृपा!

अशी ह्या संतांची महती अगाध आहे. म्हणून ह्या सत्यदत्तांना स्मरण करून ह्यांच्याच मालिकेतील हल्ली इंदूरला विद्यमान असलेले दत्तोपासक पूजनीय संत श्री नाना महाराज तराणेकर ह्यांना वंदन करून आज गुरूवारी लिहिलेला हा संक्षिप्त लेख मी श्री साई चरणी अर्पण करते.

# माझे साईबाबा

— सौ. निवेदिता घाडीगांवकर
१०/२७, श्री. मोहन को.ऑ.हौ. सोसायटी,
गोविंद नगर, बोरिवली (प.).

माझी मुलगी अंजू ही तीन वर्षाची असताना खूप आजारी झाली. तिला लघुशंकेस व्हायचे बंद झाले आणि ती लाकडासारखी ताठ झाली. त्या दिवशी रविवार होता. आमच्या डॉक्टरांनी तिला स्वतः के.ई.एम्. रुग्णालयात दाखल केले. तिच्या कॉटच्या चारी बाजूला मृत्यूने घेरले होते. त्यामुळे तेथे भयाण, निरव शांतता पसरली होती. मी रात्रंदिवस साईबाबांचे नामस्मरण करीत होते. तीन दिवस, तीन रात्री ती बेशुद्धच होती. चौथ्या दिवशी ती शुद्धीवर आली. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. मी साईबाबांचे लाख लाख उपकार मानले. बाबांमुळेच माझी अंजू मला परत मिळाली.

# दैवत माझे साईबाबा

— कु. आशा शा. पुरव
डी ८४, चेंबूर गावठाण,
मुंबई — ७१.

मी ३-४ वर्षापासून साईबाबांची भक्ति करायला लागले. तेव्हापासून मला जर काही अडचण आली तर मी ती साईबाबांना सांगत असे व साईबाबा ती आनंदाने दूर करीत असत. त्यामुळे माझा त्यांच्यावर दिवसेंदिवस विश्वास वाढत गेला. परंतु एक काळा दिवस माझ्या आयुष्यात आला की, माझी आई १ जानेवारी १९८४ साली अचानक आजारी झाली. माझा साईबाबांवर पूर्ण विश्वास होता. परंतु मला वाटते की, नुसता विश्वास असून चालत नाही त्याचबरोबर श्रद्धाही असायला पाहिजे, आणि ही श्रद्धा माझ्याकडे हवी तेवढी नसल्यामुळेच गुरुवारी दि. १२-१-१९८४ रोजी माझी आई आम्हाला सोडून देवाघरी गेली. ती जाण्यापूर्वी मी दोन दिवस आधी माझ्या आईला होणारा त्रास पाहून साईबाबांवर खूप रागावले, माझी आई आजारातून बरी झाली नाही, तर मी तुझे तोंडसुद्धा पहाणार नाही, अशी धमकी दिली. परंतु आजही तो दिवस मला आठवला तरी खूप वाईट वाटते. भावनेच्या आहारी गेल्यामुळे तसेच अज्ञानपणामुळे मी साईबाबांना ओळखले नाही. विनाकारण त्यांचा राग केला, त्यांच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. परंतु एक दिवस माझ्या मनात सहज एक विचार येऊन गेला की, जर आपल्या दैवात नसेल तर देव तरी काय करणार? देव आपल्याला देतो परंतु आपल्या दुर्दैवाने ते आपल्या हातात येत नाही. त्याची उशीरा का होईना मला जाणीव झाली. रागामुळे मी त्यांची वाचत असलेली पोथी बंद केली. त्यामुळे मिळत असलेला आनंद मी गमावून बसले. तसेच त्यांचे छत्र मी माझ्या हाताने दूर केले. डोक्यावर आई-वडिलांचे छत्र नाही. कोणत्याही वेळी संकट आले की मी त्यांची सोबत मागत असे. तेही मी माझ्या हाताने लोटून दिले. त्यामुळे त्या दिवसापासून माझी स्थिती केविलवाणी होवू लागली. सतत त्रास होऊ लागला. अपमान, अपयश, घरात अशांतता निर्माण झाली. माझी स्थिती अगदी दोरा तुटलेल्या पतंगाप्रमाणे झाली. जीवन जगणे असह्य झाले. जीवन जगण्यात रस वाटेनासा झाला. त्याचबरोबर मनात एक विचार आला की, आपण पुन्हा एकदा साईबाबांना शरण गेलो तर आपले आयुष्य पुन्हा पूर्वी प्रमाणे व्यवस्थित होईल. ही अभिलाषा बाळगून मी साईबाबांना झालेल्या चुकीबद्दल क्षमा मागून तुम्हीच माझे दैवत आहात असे सांगितले. 'मरण हे अटळ आहे, ते प्रत्येकाचे वाट्याला येणार आहे, ते कधीच चुकणार नाही' ही गोष्ट उशीरा का होईना माझ्या लक्षात आली. कदाचित बाबांनी माझी समजूत काढलेली दिसते. पुन्हा मी साईबाबांवर विश्वास ठेवू लागले आणि काय आश्चर्य! त्या दिवसापासून माझे जीवन सुरळीत चालू झाले. ऑफिसमधल्या अडचणी, घरातल्या अडचणी, त्यांना सांगितल्यावर त्या दूर होऊ लागल्या. सल्ला हवा असेल, शंका निर्माण झाली की, मी चिठ्ठी टाकून बाबा तुम्ही सांगाल ते

मला मान्य आहे, असे समजून चिठ्ठीत येणाऱ्या उत्तराप्रमाणे मी वागत असे. त्यामुळे माझे विनाविलंब काम होत असे. मिळालेल्या सल्ल्याचे उत्तर नेहमीच बरोबर असे. त्यावरून सिद्ध झाले की, बाबांनी माझ्या चुका पोटात घातल्या आहेत. यात शंकाच उरली नाही.

पुनः माझ्या आयुष्यात एक बिकट प्रसंग आला, तो म्हणजे माझी काकी जी आई गेल्यापासून मला आईसमान आहे, ती अचानक आजारी पडली. चार दिवस होऊन गेले तरी ती अन्नाला शिवेना, बिछान्यावरुन उठेना, दिवसेंदिवस तिची तब्येत खालावत गेली. तिची स्थिती पाहून माझ्यासह घरातील सर्वजण घाबरून गेले. मला जेवण सुचेना, ऑफिसमध्ये काम करावेसे वाटेना. त्यातच सहलीचा दिवस जवळ आल्याने काय करावे ते मला सुचेना, सहलीत भाग घ्यावासा वाटेना. मी साईबाबांना नवस केलाकी, माझ्या काकीला बरे कर! त्या दिवशी काकीला उदी लावायला सांगितली, आणि काय आश्चर्य! दोन दिवसात काकीची तब्येत सुधारू लागली आणि २५ डिसेंबरला गुरुवारी माझी काकी स्वयंपाक करण्यासाठी सकाळी लवकर उठली, ते पाहून मला तर खरेच वाटेना, माझा आनंद गगनात मावेनासा झाला. साईबाबांचे आभार कसे व कोणत्या शब्दात मानायचे तेच कळेनासे झाले. केवढे मोठे महाभयंकर संकट बाबांमुळेच दूर झाले यात तिळमात्रही शंका नाही. काकीच्या आजारपणामुळे माझे डोळे उघडले. ते आपल्या पाठीशी आहेत, याची जाणीव झाली. यापुढे काळजी करण्याचे कारणच उरले नाही. दुसरे सांगायचे म्हणजे, मला सहलीला जाण्यास जी अडचण आली होती ती तर बाबांनी दूर केलीच; परंतु माझा संपूर्ण प्रवास इतका सुखाचा व आनंदाचा गेला की, साईबाबांचे किती गुण गावू असे होऊन गेले. मी विनाकारण माझ्या दैवतावर रागावून स्वतःचे नुकसान करून घेत होते. उशीरा का होईना, मला माझ्या दैवताची पूर्ण ओळख पटली. अशा ह्या माझ्या दैवतरूपी साईबाबांना माझे शतशः प्रणाम.

# श्रद्धा, सबूरी

**— श्री. गंगाधर कोंडाजी जगताप**
गोदरेज सोप्स्. प्रा.लि.,
विक्रोळी, मुंबई — ७९.

मी आणि माझा मुलगा शिर्डी येथे एकदा गेलो असता, तेथील साईबाबा इंटरनॅशनल या हॉटेलच्या बाल्कनीत उभे होतो. माझा मुलगा मला म्हणाला, पप्पा, आपल्याला पण अशी खोली असती तर किती बरे झाले असते! त्या खोलीलाही अशीच बाल्कनी असती. मी म्हणालो, बाबांना सांग. बाबा जरूर तुझी इच्छा पूर्ण करतील. बाबा नेहमीच भक्तांच्या हाकेला धावून येतात, अशी माझी श्रद्धा आहे, असा माझा विश्वास आहे. आणि काय आश्चर्य! दोन वर्षाच्या आत मी डोंबिवली येथे ब्लॉक घेतला. त्यापूर्वी मी १४ वर्षे भाड्याच्या खोलीमध्ये राहात होतो.

# बाबा वाटाडे झाले

— सौ. नंदिनी माधव नाडकर
शकुंत. ब्लॉक क्र. ५,
सरस्वती बाग,
के. जी. एस्. कॉलनी,
जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई-४०० ०६०.

आषाढ महिन्याचे ते दिवस होते. वेळ सकाळची सातची होती. आम्ही जोगेश्वरीला रहात असून, त्यादिवशी मी व माझे यजमान हॉस्पिटल मध्ये जाण्यास निघालो. सौ. सुनेने रिक्षा आणली व हॉस्पिटलचा पत्ता सांगून त्या रिक्षावाल्यास आम्हाला तेथे उतरविण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही निश्चिंत होतो.

मालाड मार्केटजवळ रिक्षा गेली आणि पुढील रस्ता वाहनांना बंद असल्याची पाटी आम्हाला दिसली. कारण त्या ठिकाणी एका जैन साधूची मिरवणूक होती. रिक्षा चालकाने आम्हाला तेथेच उतरविले; व तो म्हणाला, माझा नाईलाज आहे, पुढे रिक्षा नेता येत नाही. मला काही सुचेना. रस्ता अनोळखी होता व त्यातच यजमानांची माझ्यावर जबाबदारी होती; कारण त्यांना कांहीच दिसत नव्हते. त्यात भर म्हणजे जोराचा पाऊस! पावसाची सर जाईपर्यंत आम्ही दोघे आडोशाला उभे राहिलो. मनात बाबांचा धावा चालूच होता. नंतर मी येणाऱ्या जाणाऱ्यांना हॉस्पिटलचा पत्ता विचारू लागले; पण कुणीच नीट उत्तर देईना. या बाजूला वळा, तेथून पुढे गल्लीत शिरा. अशी मोघम उत्तरे मिळू लागली. मिरवणुकीमुळे रस्त्यावर अलोट गर्दी झाली होती, मी पार गोंधळून गेले.

एवढ्यात एक चमत्कार झाला. रस्त्याच्या समोरच्या बाजूस एका खांबाला टेकून एक माणूस उभा होता. त्याच्या अंगावर केवळ गुडघ्यापर्यंत मळके धोतर होते. रंगाने तो गोरा होता व त्याचे केस अस्ताव्यस्त पिंजारलेले होते. त्याच्या ह्या अवस्थेमुळे त्याला काही माहिती नसणार असे समजून मी त्याला काही विचारले नाही. तो स्वतःहूनच माझ्याजवळ येऊन म्हणाला, डोळ्यांच्या हास्पिटल मध्ये जायचं नव्हं, चला. आणि यांचा हात धरून तो माणूस चालू लागला. थोडे चालून गेल्यावर माझ्या मनात विचार आला, याला, आम्हाला कुठे जायचे आहे ते कळले कसे! चालताना तो यांच्या पाया खालचे दगड बाजूला सारीत होता व तोंडाने काहीसे पुटपुटत होता. मी त्याला म्हटले, पुढच्या आठवड्यात यांच्या डोळ्याचे ऑपरेशन आहे म्हणून तारीख नक्की करायला आम्ही आलो आहोत, त्यावर तो म्हणाला, "छे. ते काय होते एवढ्यात". असे बोलताना त्याने मला दोन बोटे दाखवली. त्यावेळी मला काही त्याची ही तऱ्हेवाईक व चिन्हांकित भाषा उमगली नाही. जवळच्या वाटेने हॉस्पिटलच्या दारात त्याने आम्हाला सोडले. मी त्याचे उपकार मानताना म्हटले, भाऊ, मेहरबानी झाली. हे घ्या चहापाण्याला . असे बोलून मी त्याला दोन रुपये दिले. इतका वेळ बडबड करणाऱ्या त्या माणसाने ते पैसे निर्विकारपणे घेतले व तो तडक निघून गेला. नंतर यांचे ऑपरेशन लांबणीवर पडले

व मी त्या माणसाचे बोलणे विसरूनही गेले.

परंतु जेव्हा यांचे डोळ्यांचे पहिले ऑपरेशषन झाले तेव्हा, आम्ही पहिल्या वेळेला हॉस्पीटलमध्ये गेलो, त्याच तारखेला दोन महिन्यांनी हे ऑपरेशन झाले. त्याक्षणी मला एकदम त्या माणसाची आठवण झाली, त्याच्या दोन बोटांचा अर्थ समजला आणि मी मनात म्हटले, माझे बाबा मला वाट दाखवायला आले; पण मला वेडीला ते कळलेच नाही. असे आहेत माझे बाबा सर्व साईभक्तांची काळजी वाहणारे.

# साई आत्मा, साई परमात्मा

— **श्री. शू.शि. पोवळे**
छाया इलेक्ट्रॉनिक्स,
मु.पो.ता.- उरण,
जि. रायगड.

श्री साईंच्या महानिर्वाणाला ६८ वर्षे झाली, तरीही आज श्री साईंच्या अस्तित्वाची जाणीव साईभक्तांना सतत होत असते. मी माझ्या दैनंदिन जीवनात श्री साईंच्या कृपादृष्टीचा साक्षात्कार नित्य अनुभवत असतो. सदर लेखात 'मी' हा शब्द देहाला संबोधला नसून आत्म्याला संबोधला आहे. निर्वाणापर्यंतच्या काळात श्री साई नामधारी 'मी' (आत्मा) जनहितार्थ जगाच्या कल्याणासाठी स्थूलदेहाने श्री साईरुपात वावरलो म्हणजेच श्री साईरुप समाधिस्थ झालं नसून ते देहरुप समाधिस्थं झालं. मी - माझं अविनाशी रुप सदैव होतं, आहे व असणार. कारण मी - माझं अनंत रुप यांना आदी व अंत नाही.

म्हणून (जो जो मज भजे जैशा जैशा भावे तैसा तैसा पावे मीही त्यासी) मीच शेगावचे गजानन महाराज, मीच शिरडीचे श्री साई. माझ्या भक्तांच्या सोयीसाठी, भिन्न जाती-धर्मातील लोकांनी आपसातील कलह विसरून एककेंद्री होण्याकरिता मी देहरुप धारण केले, करतो व करत राहणार.

'मी' शोधून सापडणार नाही. चुकीचा मी शोधणारे बरेच होऊन गेले, आहेत व होतील. षडरिपूंचा अंमल असणाऱ्या या देहालाच अहंकाराने 'मी' समजून ते वावरले व देहपतनाबरोबर त्यांचा 'मी' नाश पावला.

खरा 'मी' शोधून सुद्धा सापडणं कठीण. ज्यांना तो सापडला, त्यांनी श्री सच्चिदानंद स्वरुप ओळखले व तेही सच्चिदानंद रुपाशी एकरुप झाले. 'मी' अनेक देह धारण केले, धारण करत आहे व धारण करावे लागणार. भक्तांच्या रक्षणासाठी, दुष्टांच्या संहारासाठी, धर्माचा अधर्म न व्हावा यासाठी मला असेच देह धारण करणे क्रमप्राप्त आहे.

श्री शिरडी पती साई तीन दिवस आपला देह म्हाळसापतीच्या स्वाधीन करून, आत्मारूपी संचार करीत होते, तेच माझे ब्रह्मस्वरुप, देह निमित्त असून 'मी' - माझं चैतन्यरुप सदैव होते, आहे व असणार. म्हणून आजही शिरडीचे सद्गुरु साईनाथ प्रत्येक भक्ताच्या नितांत श्रद्धेला, कोणत्याही क्षणी धावतात व त्या भक्ताला आपल्या अस्तित्वाची

प्रचिती देतात. जरी देह रुपाने त्यांचे महानिर्वाण झाले असले तरी, ते म्हणजेच 'मी' चैतन्यरुप सदैव भक्तांच्या श्रद्धेप्रमाणे त्यांच्या हाकेला धावतो.

जरी हे शरीर गेलो मी टाकोन,
तरी मी धावेने भक्तांसाठी ॥

*******

## साई दरबारातील नवरत्ने...८

# श्री. तात्याबाबा पाटील कोते



श्रीसद्गुरू साईबाबांना ज्यांनी स्वहस्ताने भाकरी खाऊ घातली, त्या श्रीमती (कै.) बायजाबाई पाटील कोते. त्यांचे चिरंजीव तात्याजी गणपत पाटील कोते यांना सर्व तात्याबा म्हणत असत. शिरडी येथील मराठेशाही पेहरावाचे, गावात मोठा दरारा. गावातील तक्रारींचे निवारण तात्याबाबांशिवाय होतच नसे. प्रत्येक खेड्यात अशी एक जबाबदार व्यक्ती असतेच, त्याप्रमाणे शिरडी खेड्यात तात्याबाबा.

तात्याबाबा सर्वगुण संपन्न होते. हरएक तऱ्हेच्या गुणीजनांचे आश्रयस्थान म्हणजे तात्याबाबांचे घर. हरिदास, पुराणिकच काय, पण तमाशेवाले जरी आले, तरी त्यांची

सर्व व्यवस्था तात्याबाबाकडेच. तमाशेवाल्याला तमाशा करावयाला लावून बिदागी देऊन मगच त्याची रवानगी करीत. त्यांच्या बैठकीची जागा रिकामी सहसा सापडत नसे. पान खाण्याचा दांडगा शौक असल्यामुळे बैठकीतील पानाचे तबक सदा भरलेले असावयाचेच. या पानाच्या तबकावर बऱ्याच लोकांचा पान खाण्याचा शौक पुरवला जात होता.

तात्याबाबा मनाने जसे दिलदार होते, तसे हातानेही सढळ होते. शिरडी गावातील श्रीगणपती, महादेव, शनैश्वर, महालक्ष्मी या देवतांची देवालये स्वखर्चाने त्यांनी बांधली आहेत. गावचे हनुमानाचे देवालय बांधण्यासदुद्धा खर्चाचा बराच मोठा भाग त्यांनी उचलला होता.

श्रीसमर्थ साईबाबा आणि तात्याबाबा यांचे मामा-भाच्याचे नाते मानले जात असे. बाबा यांचा राग त्यांना अनावर झाला, म्हणजे फक्त तात्याबाबाच त्यांना शांत करू शकत. इतरांची नुसती साईबाबांच्या जवळ जाण्याची ताकद नव्हती. चावडीच्या मिरवणुकीला-सुद्धा साईबाबा, तात्याबाबा आल्याशिवाय द्वारकामाईमधून उठत नसत. दुपारच्या भोजनाला-सुद्धा बाबांच्या बरोबर तात्याबाबा असावयाचे. रात्रौ ८ वाजण्याचे सुमारास तात्याबाबांनी द्वारकामाईत आणलेली भाकरी साईबाबा थोडीशीच का होईना, पण मोठ्या प्रेमाने खात असत. साईबाबा तात्याबाबांना रोज रू. ४ देत असत.

शिरडी गावात आखाडी भरत असे. राजाचे सोंग तात्याबाबा करीत. आखाडीच्या खर्चाचाही थोडासा वाटा ते उचलीत असत. श्रीमंत गोपाळराव बुट्टी आखाडीसाठी ५०० रूपये देत असत. त्यावेळी शिरडीची आखाडी फार प्रसिद्ध होती. लांबलांबून ती पाहाण्यासाठी लोक येत असत. साईबाबा चावडीत बसून आखाडी पहात असत.

सर्व थरांच्या लोकांवर तात्याबाबा फार उपकार करीत. निरनिराळ्या तऱ्हेची (द्रव्यद्वारा) मदत नेहमी चालू असावयाचीच. ज्या ज्या लोकांवर उपकार केले, मदत केली, त्यांपैकी एकहीजण स्मरून तात्याबाबांचे उपयोगी पडला असेल तर शपथ. परोपरकाराकरिता तात्याबाबांचे जवळ होते नव्हते, ते सर्व संपुष्टात आले. कर्जबाजारी होण्याची पाळी आली, पण त्याही परिस्थितीला ते डगमगले नाहीत. सत्याने चालणाऱ्याचे असेच हाल होत असतात. हे जग रूढीच्या बाहेरचे नाही. तात्याबाबा शिरडीचा एक धर्मात्मा होता, असे म्हटले तर वावगे होणार नाही. विशेष नवलाची गोष्ट म्हणजे त्यांच्या अंतकालाच्या समयाला कोणाचे एक पैसुद्धा कर्ज त्यांचेवर राहिलेले नव्हते; ही श्रीसाईबाबांची कृपाच होय.

एकदा एकनाथषष्ठीचे दिवशी सायंकाळी रथाच्या मिरवणुकीच्या वेळी तात्याबाबा कोते यांच्यावर बाबा रागावले. ज्या वेळी तात्याबाबा कोते यांच्यावर बाबा रागावले, त्यावेळी तात्याबाबाही बाबांवर खूप संतापले. दोघेही हट्टाला पेटले. रात्री १२ वाजेपयत मिरवणूक थांबून राहिली. नंतर बाबा शांत झाले. तात्याबाबांनीही आपला हट्ट सोडला व मग मिरवणूक आनंदाने झाली.

तात्याबाबा कोत्यांचे उपरणे दडवून ठेवणे, खांबामागून त्यांना ढकलून देणे, त्यांचे डोळे झाकणे व हे कोणी केले असे विचारले, म्हणजे पुन्हा खांबाआड दडून बाबांनी खदखदा हसणे असे नेहमीच चालायचे.

द्वारकामाईत बाबा, तात्याबाबा व म्हाळसापती रात्री निजले असता झोपेत याचे पाय

त्याच्या उरावर, त्याचे पाय याचे उरावर, कोणाचे पाय आपले अंगावर , असे करून ठेवावे. सकाळी उठून पाहावे व विचारावे, बाबा, हे कोणी केले, म्हणजे बाबांनी खदखदा हसावे.

भर उन्हाळ्यात तात्याबाबाला धगधगीत पेटलेल्या धुनीमाईजवळ निजवावयाचे व त्यांना झोप लागली, म्हणजे आपली धाबळी त्यांचे अंगावर घालावयाची. यामुळे त्यांचे सर्वांग नखशिखांत घामाने डबडबे. ते जागे होत व सर्व घाम पुशीत. 'बाबा, हे कोणी केले' म्हणून विचारले, म्हणजे बाबा खदखदा हसत.

बाबा कधी कधी तात्याबाला गुदगुल्या करीत व बाबा हे काय म्हणून विचारले, म्हणजे हसत. त्यांना कधी कधी पोटऱ्या व मांड्या चेपावयास सांगत व तात्यांबानी जर हात वर नेला म्हणजे म्हणत,

"हां! उपर हात मत लगाओ, हां! उपर हात मत लगाओ." व खदखदा हसत.

बाबा तात्याबाबांबरोबर फुगड्या घालीत, कुस्ती खेळत, कधी कधी सोंगट्या खेळत, कधी कधी पंजा खेळत, हैदोस-धुल्ला घालीत.

१९१३ साली तात्याबांचे वडील बयाजी हे पक्षघाताच्या विकाराने बिछान्याला खिळले होते. तात्या धावत मशिदीकडे बाबांच्या पायावर गडगडा लोळले व हात जोडून बाबांना म्हणाले,

"बाबा, माझे वडिल पक्षघाताने बिछान्याला खिळले आहेत. त्यांना तुम्ही वाचवावयास हवे.

आपल्या वडिलांना लावण्यासाठी बाबा आपल्याला उदी देतील, अशी त्यांची कल्पना होती पण बाबांनी उदी त्यांना दिलीच नाही. बाबा तात्यांना एवढेच म्हणाले,

"अल्ला मालिक सर्वांची काळजी घेतो, त्याला साऱ्यांचीच काळजी आहे."

"बाबांनी आपल्या वडिलांसाठी काहीच केले नाही, काहीच दिले नाही, हे पाहून तात्यांना खूप वाईट वाटले. ते जड पावले टाकीतच घरी परतले. तिसऱ्या दिवशी बयाजींचा अंत झालां. तात्यांनी त्यांचा अंत्यविधी पार पाडला.

"तात्याची घरची गरिबी असल्यामुळे बाबा त्यांना दररोज खर्चासाठी चार रूपये देत असत व त्यांना नेहमी उपदेश करीत.

"तात्या पैसे साठव पैशाची बचत कर. नंतर शेत जमिनी विकत घे आणि मग सुखाने संसार कर."

बाबांनी १५ ऑक्टोबर १९१८ रोजी समाधी घेतली, पण त्या दिवशी देखील तात्यांना चार रूपये द्यायला बाबा मुळीच विसरले नाहीत. तात्यांनी बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानली. त्यांनी पैसे साठविले व त्यातून पुढे शेत जमिनी विकत घेतल्या, व पुढे सुखी जीवन जगले.

# साई- ईश्वराचा अवतार

— सौ. सुधाताई चैतन्य
१४, राजस्व ग्राम, इंदोर (म.प्र.) — ४५२ ००२.

आपल्या भारतात प्राचीन काळापासून उच्च कोटीतील गुरुशिष्य परंपरा चालू आहे. गुरूच्या ठिकाणी आपण परमात्माच पहात असतो. सद्‌गुरू आणि परमात्मा एकच अशी आपली भावना असते.

बंध किंवा मोक्ष, स्वर्ग अथवा नरक, सुख वा दुःख यापैकी काय हवं ते मिळविणे आपल्यावर अवलंबून असते. जो मनुष्य साईचिंतनात जास्त वेळ घालवून साईबाबांना शरण जातो, तो खरंच धन्य होय!

आपण तर देह स्वरूपात आलो आहोत त्याचा सदुपयोग करून आत्मकल्याण करायचे जर असेल व पश्चातापाची पाळी येऊ नये असे वाटत असेल तर अनन्य भावे साईबाबांना शरण जा. त्यांनी सांगितलेले बोध शब्द 'श्रद्धा व सबुरी' हे जर आचरणात आणले तर तुमचे सार्थक नक्कीच झाले असे समजा. श्रद्धे शिवाय माणूस जगू शकत नाही. ज्या ठिकाणी श्रद्धा नसेल तेथे पूर्ण निष्ठा हवी.

मी शहरात राहणारी, लिहणं-वाचणं येत होतं. आईची शिकवण, की सतत काम करीत असावं, हे माझ्या अंगवळणी पडले होते. सतत काम करायचं एवढंच काय ते माहीत!

माझं पूर्व पुण्य उदयाला आलं व माझे लग्न अशा घराण्यात झाले की, ते सर्वच साईभक्त! रात्री झोपताना त्यांनी रोज साईबाबांबद्दल सांगावं, साईची भक्ती का करावी याची माहिती द्यावी, हे नियमित घडू लागले. मी आता साईचरित्र ऐकण्याचा हट्ट धरू लागले, साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याची मला इच्छा होऊ लागली. पण सासूबाईंची शिस्त कडक. त्यांनी जी गोष्ट करायची म्हटली, तीच गोष्ट होत असे. घरात मी सर्वात मोठी सून. मला तीन मुलगे झाले. मला मुलीची हौस! पण माझी हौस कोणास पटेना. माझं मन साईबाबांच्या छबीकडे सारखे धावायचे. मी मनात प्रार्थना करायची की, देवा, मी जरूर शिरडीस येईन. माझ्याकडून काय मिळणार? माझी पूर्ण तुझ्यावर निष्ठा बसेल असे कर.

आम्हाला एकदा भाच्याच्या मुलाच्या मुंजीचं बोलवणं आलं. मी मुंजीला जाण्याचा हट्ट धरला. मला शिरडीलापण जाता येईल. असे त्यांना मी सांगितले. मला चार महिने गेले होते.

मी समाधीचं दर्शन घेतलं. मनात काहूर माजलं होत. मी काय करू हे माझं मला कळत नव्हतं. माझ्या मागून एक खूप थकलेला म्हातारा मला म्हणाला, "मुली, तुझं मनोरथ पूर्ण होईल. तू बाबांवर निष्ठा ठेव." मी त्याच्याकडे पाहिले देखील नाही. पण मनात त्याच्या बोलाने आनंद झाला. तो कोण होता, कोणास ठाऊक? हे सर्व चित्रपटाप्रमाणे झाले, त्यानंतर माझ्या मनात खात्री वाटू लागली.

खोलीत गेल्यावर त्यांनी साईचरित्रातील ओवी मला वाचून दाखविली. "साई भरला स्थिरचरी। साई सर्वांच्या आंतबाहेरी। साई तुम्हा-आम्हा भीतरी। निरंतर नांदत असे। अ.४४ ओवी १०९।" मला वाटले, या रूपात साईचेच रूप आले का? नंतर

माझी श्रद्धा अटळ झाली व साई आशीर्वादाने मला तीन मुलांवर मुलगी झाली. आता माझी मुलगी मोठी झाली आहे. तिचं लग्न झालेलं आहे. माझे जावई ज्यांचे नाव उदयराव आहे, ते शिरडीजवळ साखरे गावचेच राहणारे आहेत.

बाबांवर असणारी श्रद्धा मनातून जागृत झाली पाहिजे. म्हणजे तुमचं काम झालंच समजा. साईंनी पृथ्वीतलावर अवतार घेतला हे नक्की. त्यांनी जातपात, अमीर-गरीब, उच्च-निच या सर्वांचे कोड समूळ काढून टाकली. तुम्ही साईंना सर्व रूपांत पहा.

# साईलीला अगाध आहे

— सौ. कुमुदिनी य. गोखले
टिळक नगर, ब्लॉक क्र. १,
पटवर्धन वाडी, रत्नागिरी.

आमच्या शेजारी एक साईभक्त असून, साईलीलाचे अंक त्यांच्याकडे नियमित येतात. या अंकापैकी काही जुने-नवे अंक माझ्या नेहमी वाचनात येऊ लागले व साहजिकच त्यामुळे माझ्याही मनात श्री साईंच्याबद्दल एक सुप्त ओढ निर्माण झाली, बाबांचे स्मरण माझ्याकडून नित्य होऊ लागले.

आम्ही यापूर्वी ज्या ठिकाणी राहात होतो, त्या घरमालकांनी जागा खाली करण्याची आम्हाला नोटीस दिली. रत्नागिरी शहरात राहाण्याच्या जागेबाबतची परिस्थिती फारच कठीण असून नवी जागा मिळणे त्याहून बिकट आहे. पुष्कळ प्रयत्न करूनही जागा काही कुठे मिळेना. खोली रिकामी करून देण्याची तारीख जवळ आल्याने मी चिंतेत व नवी जागा शोधण्याच्या प्रयासाने अगदीच थकून गेले होते. अखेरीस श्री साईंना शरण गेले, म्हणाले, "बाबा, तुम्ही सर्वांसाठी सर्व काही करता, मग माझ्या जागेचा प्रश्न ठरलेल्या मुदतीच्या आत सोडवा." आणि आश्चर्य म्हणजे — आठवड्याच्या आतच व सहजासहजी आम्हाला सुंदरसा ब्लॉक मिळाला.

दुसरा अनुभव असा की, माझे पती इन्शुरन्स कंपनीचे मॅनेजर असून, एकेदिवशी त्यांच्या ऑफिसच्या चाव्याच हरवल्या. जागेचा प्रश्न सुटतो ना सुटतो तोच दुसरी समस्या उभी राहिली. परंतु श्री साईनाथांच्या कृपेने, त्या किल्ल्या कुणाच्याही हाती न लागता परत मिळाल्या. खरोखरच! श्री साईबाबांची लीला अगाध आहे. श्री साईबाबांनी जशी मला मदत केली, तशीच ती इतर साईभक्तांनाही होवो, हीच श्री साईचरणी नम्र प्रार्थना.

# रिक्षाचे काम लवकर पूर्ण झाले

— श्री. विनोद मोरे
साईधाम, धनसार [अल्याळी आंबेवाडी],
ता.पो.-पालघर, जि. ठाणे - ४०१४०४

मी माझ्या धाकट्या भावाबरोबर [डॉ. अनिल] पाच/सहा वर्षापूर्वी शिर्डीस जाऊन आलो आणि तेव्हापासून बाबांच्या भक्तीमार्गास लागलो. श्री साईबाबांचे सारखे नामस्मरण करणे, सुख-दुःखात बाबांना आळवणे, बाबांची उदी प्राशन करणे हा माझा नित्यनेमच बनला.

आमच्या गावात असणाऱ्या पाईप फॅक्टरीत मी कामाला होतो. परंतु दुर्दैवाने आमच्या मालकाचे लंडनमध्ये हृदयविकाराने निधन झाले, अन् आम्हा कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. तेव्हा माझ्या मनात रिक्षा घ्यायचा विचार आला. त्याप्रमाणे बँकेतील कर्जाच्या साहाय्याने रिक्षा खरेदी करायचे ठरले.

सर्व कागदपत्रांची मिळवामिळव व जुळवाजुळव झाली. मात्र बँकेतील काम काही होईना. मी तर फारच वैतागलो. मंत्रालयातूनही प्रयत्न करून पाहिले पण सर्वच व्यर्थ! आता सर्व काही बाबांवर सोपवलं, बाबांवरील विश्वासावरच राहायचे ठरवले आणि एक दिवस बाबा स्वप्नात येऊन बोलून गेले की, "तुझं रिक्षाचं काम लवकरच पूर्ण होईल."

कंपनी चालू व्हायची काही चिन्हे दिसेनात. सर्व भार रिक्षावर होता. ह्या कालावधीत काही महिन्यांचा कालावधी निघून गेला.

ठाण्यात आर.टी.ओ.च्या ऑफिसमध्ये जाताना व घरून निघताना मी साईबाबांचं दर्शन घेतल्याशिवाय निघतच नसे. लेखक, कवी संमेलनातून परतताना आणलेल्या 'श्री साईसत्चरित्राचे' मी एकदा पारायणही केलं. तसेच बऱ्याच दिवसांनी प्रतिक्षा करीत असतानाच लवकर रिक्षाचं काम व्हावं म्हणून पंधरावा अध्यायही वाचला आणि पंधरा दिवसांच्या आतच मला रिक्षासाठी पाचारण व्हावं लागलं अन् सर्वात सुखाचा धक्का म्हणजे गुरुवारीच मी रिक्षासाठी निघालो व शुक्रवारी १४ डिसेंबर ८६ रोजी रिक्षा घरी आली आणि सर्वांनाच आनंद झाला.

महिन्यापूर्वीच मला रिक्षाचं परमिट मिळालं आहे. परमिट मिळविण्याच्या दिवशी आर.टी.ओ. ऑफिसमधील अधिकाऱ्याच्या पुढ्यातील साईछबीला वंदन केल्यावर त्यांनी मला विचारले की, आपण साईभक्त आहात काय? ह्यावर काय उत्तर देणार? माझा उर भरून आला होता.

मी आता अतिशय समाधानी असून, माझ्या रिक्षाच्या मागे मी "साईधाम" ही अक्षरे लिहिली आहेत. मला जेव्हा माझे रिक्षावाले मित्र "साईधाम" म्हणून हाक मारतात तेव्हा होणारा आनंद काही वेगळाच असतो.



# श्रीसाईबाबांची सर्वव्यापकता व दूरदृष्टी

— श्री. नंदू लक्ष्मण पाटील
महेश कृपा चाळ,
लोकमान्य नगर,
ठाणे (प.) —

परमात्म्याच्या अनेकविध रूपांचा शिर्डीच्या श्री साईबाबांमध्ये वास होता. याचा प्रत्यय अनेक भक्तांना आलेला आहे. भक्तांनी जशी जशी इच्छा केली तशी तशी अनेक रूपे त्यांनी दाखविली. साईबाबा हे शिर्डीत होऊन गेलेले थोर विभूती परमेश्वर होत. त्यांना लहान मुले फार आवडत. लहान मुलांसारखेच ते निष्पाप व निर्मळ होते. साईनाथ शिर्डीत आले त्यावेळी शिर्डी हे अगदी मागासलेले खेडेगाव होते. परंतु बाबा तेथे राहू लागल्यापासून त्यांची किर्ती जसजशी पसरू लागली, तसतसे शिर्डी गावही सुधारू लागले.

दीनदुबळ्यांचे दुःख दूर करण्यासाठी श्रीसाईबाबांनी आयुष्य घालविले. आजही बाबा अदृश्य रूपे भक्तांच्या पाठीशी उभे राहून त्यांची संकटे दूर करीत आहेत. ज्यांनी ज्यांनी बाबांना नवस केले, त्यांचे दुःख दूर होऊन त्यांच्या मनोकामना पूर्ण होत आहेत त्यामुळेच शिर्डीचे नाव आज केवळ आपल्या देशातच नव्हे तर अन्य देशातही पसरत आहे.

शिर्डीला लेंडीबाग नावाचे एक फडयानिवडूंगांनी भरलेले दाट जंगल आहे, तेथे जाऊन बाबा योगसाधना करीत असत. शिर्डीत आल्यावर साईबाबांनी आपल्या योगसामर्थ्याने अग्नि प्रज्वलित केला, तो अग्नी म्हणजे धुनी होय! ती धुनी अद्यापही पेटत आहे. बाबा अनेक रुग्णांची सेवा सुशृषाही स्वतः करीत असत.


श्रीसाईबाबा हे हिंदु अथवा मुसलमान नव्हे तर साक्षात् परब्रह्म होते. त्यांना सर्वधर्मियांना एकत्र आणावयाचे होते, त्यांच्यात एकोपा निर्माण करायचा होता. बाबा रोज हंडीभर प्रसाद करीत. त्यासाठी ते स्वतः रोज पाच घरी जाऊन भिक्षा मागून आणत. सगळ्यांबरोबर सहभोजन करीत असत. बाबांनी प्रथमतः चांदभाई पाटलाला आपले सामर्थ्य दाखविले. खरोखरच, ज्यांना साईसद्गुरूंचा सहवास लाभला ते कृतार्थ झाले.

दयाघन साईनाथांनी १९१८ साली दसऱ्याच्या दिवशी समाधी घेतली त्यावेळी त्यांनी सांगितले —

झालो जरी गतप्राण। वाक्य- माझे मानाप्रमाण।
माझी हाडे तुर्बतीमधुन। देतील आश्वासन तुम्हास।। १०५।।
मी काय पण माझी तुर्बत। राहील तुम्हासवे बोलत।
जो तीस शरणांगत। राहील डोलत तयासवे।। १०६।।

(श्रीसाईसच्चरीत अ. २५)

शिर्डीला सध्या भक्तांची अलोट गर्दी होत असते. तेथील समाधी मंदिरात प्रवेश केल्यावर मनाला एकप्रकारची शांती लाभते व नास्तिकातही साईबाबांच्याबद्दल श्रद्धा जागृत होते. यातच बाबांच्या सामर्थ्याची प्रचिती येते.



# सबका मालिक एक है

लेखक-निर्देशक श्री. किरण कुमार दुधाळकर यांच्या कथ्थक या नृत्य नाट्य संस्थेतर्फे सबका मालिक एक है या श्री साईबाबांच्या जीवन चरित्रावर आधारित तीन अंकी हिंदी नाटकाचे प्रयोग महाराष्ट्रात ठिकठिकाणी धुमधडाक्याने सुरू आहेत. भरपूर ट्रीक सीन्स असलेल्या या नाटकात चाळीस वर कलाकार असून त्या सर्वांनी आपापल्या भूमिका समजून व यशस्वी करण्याचा यत्न केलेला आहे. श्री बाबांची भूमिका स्वतः श्री. किरण कुमारनी केलेली असून ती अगदी हुबेहूब वठविलेली आहे. त्यांच्या पत्नी सौ. आशा व कन्या कु. तेजा किरण यांनीही या नाटकात भाग घेतला आहे हे विशेष होय. श्री. अब्दुल हनीफ व अनुप जलोटा हे अनुक्रमे या नाटकाचे गीतकार व संगीत कलाकार आहेत. नाटकातील बायजा, लक्ष्मी, म्हाळसापती, दासगणू इ. ची या नाटकातील कामे वाखाणण्यासारखी आहेत. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातच नव्हे तर परदेशातही या नाटकाचे सर्वत्र प्रयोग श्री साई कृपेने व्हावेत अशी शुभेच्छा श्री साई चरणी करतो.

— साईनंद

# साईकृपेचे अनुभव

— श्री. शंकर रामचंद्र कदम
६३, राजहंस, विश्वकर्मा नगर,
मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८०.

आमच्या देव्हाऱ्यात श्री साईबाबांचा फोटो दहा-बारा वर्षांपासून आहे. अन्य देवादिकांचे फोटोही आमच्या देव्हाऱ्यात आहेत. परंतु डिसेंबर १९८३ मध्ये शिर्डीस जाण्याचा योग आला आणि त्यानंतर श्री साईबाबा आपणा सर्वांचे आहेत असे वाटू लागले. 'साई दरबारात गेलेला कोणीही विन्मुख होऊन परतत नाही' याची प्रचिती त्यानंतर सर्वांप्रमाणे आम्हालाही येऊ लागली.

"नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे।।
शरण मज आला आणि वाया गेला। दाखवा दाखवा ऐसा कोणि।।"

वरील बाबांच्या वचनाचे अनेक अनुभव आम्हाला आले. त्यातील काही पुढे देत आहे —- माझा मुलगा चि. सुदेश यास एकाच वेळी दोन चांगल्या नामांकित कंपन्यांचे बोलावणे आले होते आणि काय करावे असा प्रश्न सर्वांपुढे पडला होता. परंतु यातून बाबाच योग्य तो मार्ग दाखवतील असा विश्वास सर्वांच्या मनात होता. काही जणांचे सल्ले घेऊन त्याने एका कंपनीत जाण्याचे नक्की केले. जवळ जवळ एका वर्षानंतर ज्या दुसऱ्या कंपनीचे बोलावणे आले होते, ती काही कारणास्तव बंद झाली. जणू बाबाच त्याच्या पाठीशी उभे राहिले आणि बाबांनीच योग्य तो सल्ला देऊन त्याला योग्य मार्ग दाखविला.

दुसरा अनुभव असा की, गेल्या वर्षीची गोष्ट. २८ ऑगस्ट १९८६, दहीहंडीचा तो दिवस होता, तसेच गुरुवारही होता. माझा मुलगा चि. दिनेश दहीहंडी खेळायला गेला असता पडला आणि त्याचा डावा पाय एकही पाऊल पुढे न टाकण्याइतका सुजला. डॉक्टरांच्या सल्ल्यावरून त्याला हॉस्पिटलला नेले. तेथे पाय फ्रॅक्चर झाल्याचे सांगून पायाला प्लास्टर करून घरी पाठविण्यात आले. आम्ही सर्व तर घाबरून गेलो होतो. तेव्हा बाबांजवळ प्रार्थना केली, "बाबा, आज गुरुवारचा दिवस, असे का व्हावे? तुम्हीच आता त्याला यातून लवकर बरे करा." त्याच्या पायाची सूज दोन महिने झाले तरी कमी होत नव्हती. डॉक्टरांनी तर पाय जमिनीला लावायलाही मनाई केली होती. आम्ही रोजच बाबांची प्रार्थना करत होतो. आणि काय आश्चर्य! आठ दिवसातच आमची एका साई-भक्ताशी ओळख झाली. त्यांना मालिश या प्रकारातील थोडी फार माहिती होती. त्यांनी त्याच्या पायाला प्रथम मालिश केले आणि बाबांवर विश्वास ठेवून थोडे चालायला सांगितले. परंतु डॉक्टरांनी दीड महिने तरी पाय जमिनीला लावू नको असे सांगितल्यामुळे तो फार घाबरत होता. तरी बाबांवर विश्वास ठेवून व प्रयत्न करून तो तीन-चार पाऊले पुढे टाकू लागला. तसेच अजून तीन-चार वेळा मालीश केले असता तो चांगला चालू लागला आणि नंतर हॉस्पिटलला जाऊन 'क्ष' किरण फोटो काढला असता दीड महिना पाय जमिनीला लावू नको सांगणाऱ्या डॉक्टरांनी पायात फ्रॅक्चर नसल्याचे सांगितले.

अन् आम्हा सर्वांचे मन अक्षरशः उचंबळून आले. आता साईकृपेने त्याचा पाय चांगला असून काही त्रास नाही.

तसेच साईबाबांच्या उदी-महीम्याचे अनेक अनुभव आम्हाला आले असून संकटात कोणत्याही वेळी बाबांना हाक मारली असता बाबा वेळोवेळी आमच्या मदतीला धावून आले आहेत, अशीच बाबांची कृपा सर्व भक्तांवर सदैव राहो. त्या साईमाऊलीच्या चरणी आम्हा सर्वांचे कोटी कोटी प्रणाम.

# शुभशकून व अपशकून — एक मीमांसा

— श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई - ४०० ०३७.

त्या दिवशी कार्यालयात आल्यावर माझ्याकडून एक काचेचा पेला फुटला. कार्यालयातल्या शिपायाने घाबरत घाबरत येऊन मला सांगितले की, "साहेब, काचेची वस्तू ज्या दिवशी फुटते तो दिवस वाईट जातो. तुम्ही आज सांभाळून रहा."

मी मनातल्या मनात म्हटले की, "बघूया, श्रीबाबा येत्या २४ तासात काय घडवतात ते!" त्यावेळी माझ्या घड्याळात सकाळचे ९.३० वाजले होते. परंतु खरोखरच त्याने सांगितल्याप्रमाणे मात्र कोणताही वाईट अनुभव आला नाही. २४ तासात तर नाहीच नाही; पण त्यानंतरही कोणतीही वाईट घटना घडली नाही.

गेले कित्येक महिने शुभशकून व अपशकून व त्यावर असलेला बऱ्याच भक्तांचा दृढ विश्वास याविषयी माझ्या मनात चिंतन चालू होते. त्या दृष्टीने माझी प्रत्येक समजाची छाननी प्रत्यक्ष अनुभवावर चालू होती.

कित्येक महिने कितीतरी वेळा मांजरी, बोके माझ्या महत्वाच्या कामाच्या वेळी रस्त्यात मला आडवी गेली. पण माझी बहुतेक कामं त्या दिवशी विनासायास झाली. म्हणजे मांजर आडवं गेलं तर आता घरी परत चला, असा विचार माझ्या मनात येत नाही.

डोळ्याची उजवी किंवा डावी पापणी फडफडणे व त्याप्रमाणे शुभ व अशुभ तंतोतंत घटना घडल्या नाहीत. त्यामुळे त्यालाही काही विश्वसनीय आधार नाही, असं ठामपणे म्हणता येईल.

गेल्या आठवड्यात माझ्या पत्नीने एक जुना पत्र्याचा डबा उघडला तेव्हा पालीचे छोटे पिल्लू तिच्या हातावर चक्क बसले. संध्याकाळी तिने सांगितले की, "या घटनेने मी अस्वस्थ आहे." तेव्हा मी सांगितले की, "आपले घर श्रींचे आहे व त्यांना आपली चिंता आहे, तेव्हा काही होणार नाही. तू स्वस्थ रहा." खरोखरच तसं काही घडलं नाही.

मी स्वतः श्री साईसच्चरित्र ग्रंथ व त्यातील लीला ह्या प्रत्यक्ष जीवनात कसे वागावे ह्यासाठी मार्गदर्शक समजतो. या अनुषंगाने शुभशकून व अपशकून या बाबतींतील श्रींच्या लीला चाळू लागलो.

शुभशकूनाविषयी श्रींनी एक गोष्ट वारंवार सांगितली आहे, ती म्हणजे वाढलेले ताट डावलू नये. कोणत्याही शुभकार्याच्या किंवा महत्वाच्या कामाच्या वेळी जर जेवण किंवा खाण्याचा पदार्थ कोणी प्रेमाने व निरपेक्ष भावनेने दिला, तर तो शुभसूचक होय. वाचकांना श्रींच्या गुरूने ३२ व्या अध्यायात त्यांना खाऊन जाण्याविषयी दोन वेळा सांगितल्याचा उल्लेख आहे. खाल्ल्यानंतरच श्रींना पुढचा मार्ग सापडला, असा स्पष्ट उल्लेख आहे. हे झाले शुभशकूनांविषयी. आता अपशकूनांचा काही उल्लेख आहे का ते पाहू —

श्रींच्या निर्वाणाच्या आधी त्यांच्या एका भक्ताकडून चुकून त्यांच्या गुरूने दिलेली वीट फुटली. या गोष्टीचा दुश्चिन्ह म्हणून उल्लेख केलेला श्री साईसच्चरित्रात आहे. पण तो अपशकून म्हणून उल्लेखलेला नाही. हे लक्षात घेतले पाहिजे.

१५ व्या अध्यायात पाल चुकचुकण्यामुळे ही अशुभ घटनेची सूचना तर नाही ना अशी शंका विचारणाऱ्या भक्ताला, "तिची बहिण तिला भेटायला येत आहे, त्यामुळे तिला आनंदाचे भरते आले आहे." असं सांगून श्रींनी पाल चुकचुकणं म्हणजे अशुभ घटनेची सूचना या समजाला धक्का दिलेला आहे. कारण दोघा बहिणींची भेट ही शुभ घटना आहे.

साधारणतः अमावास्येच्या दिवशी बाहेरगावी जात नाहीत. पण याही समजाला श्रींनी सौ. निमोणकरांना गावी आजारी असलेल्या मुलाला बघण्यासाठी परवानगी देऊन हादरा दिला आहे.

ज्योतिषाने श्रीमान बापूसाहेब बुटींना, "संध्याकाळी बाहेर जाऊ नका, अतिशय वाईट वेळ आहे." अशी सूचना दिली असताना श्रींनी त्यांना "निश्चिंत रहा" असे सांगितले व कोणतीही दुर्घटना त्या दिवशी घडली नाही.

तेव्हा मला स्वतःला व इतर श्रीभक्तांनाही असं निश्चित वाटत असेल की, बहुतेक शकुन व अपशकून हे गैरसमजावर आधारलेले आहेत.

संपूर्ण श्रीसाईसच्चरित्रात श्रींनी भक्तांची परमेश्वरावर दृढ श्रद्धा बसावी व ती त्या त्या भक्तांना स्वानुभवाने प्रत्यक्ष पटवून मगच बसावी अशा प्रकारे लीला घडवल्या आहेत. त्यामुळे त्यांनी कोठेही अंधश्रद्धेवर भक्तांनी विश्वास ठेवू नये म्हणून मुद्दाम अंधश्रद्धेला आधारभूत ठरणाऱ्या अपशकूनांना मान्यता दिली नाही. उलट दुर्घटना घडणार असेल तर त्याची पूर्वसूचना देऊन भक्तांना वेळीच सावध केले व काही प्रसंगी प्रत्यक्ष त्यांना सहाय्य केले आहे. संकटापासून वाचवणे हे तर श्रींचे खास वैशिष्ट्य आहे.

या सर्व गोष्टींचे एकच सार असे निघते की, श्रींच्या भक्तांनी अपशकून व अंधश्रद्धा यांच्यावर विश्वास न ठेवता श्रींच्या सर्वगामी सहाय्यावर व त्यांच्याच सामर्थ्यावर विश्वास ठेवून आपली कर्तव्ये पार पाडावीत व अशा प्रकारे श्रींच्या सामर्थ्याचा स्वतः अनुभव घ्यावा. माझा स्वतःचा व अनेक अंकित भक्तांचा वैयक्तिक अनुभव असा आहे की, श्रींनी ज्यांची पूर्ण कसोटी घेऊन स्विकारले आहे त्यांना हे अपशकून बाधत नाहीत.

# साईमाऊली

अंतकरणीचे दुःख जेव्हां दाटून येतं
तेव्हां मुखी असते साईनाम ॥ धृ ॥

जगण्यातही राम नाही, होते जाणीव ही
तेव्हां सतत असते पाठीशी साई माऊली ॥ १ ॥

कशात ही गम्य वाटत नाही
तेव्हां दर्शन देते साई माऊली ॥ २ ॥

सगळे होतात बघे संकटकाळी
तेव्हां अभय देत असते साईआई ॥ ३ ॥

जेव्हां आनंदाला पारावर उरत नाही
तेव्हां मनाचा तोल सावरते साई ॥ ४ ॥

खरंच डोळ्यातील अश्रूंना धीर धरवत नाही
तेव्हां श्रद्धा आणि सबूरी असते लाखमोलाची ॥ ५ ॥

— **सौ. रेखा भा. माहीमकर**
अमरज्योती को.हॉ. सोसायटी,
बिल्डिंग नं. २२, फ्लॅट नं. १६, २ रा मजला,
चार बंगला, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम),
मुंबई-४०० ०५८.

# "साई"

साईच्या चरणी माथा होता लीन
साईगाथा म्हणण्यास सर्व पंथ होत तल्लीन
सर्व धर्मियांचा एकच नारा
साईनाथ सर्वांहून आम्हा प्यारा
संकट समयी कुणी देत नाही थारा
त्या त्या क्षणी साई दाखवी सुखाचा निवारा
जे जे करी सदा साईची भक्ती
त्यास देई सर्व सुकार्यास शक्ती
हृदयात साठवावी साईची मूर्ती
साईलीलेच्या आठवणी सर्वत्र राहो किर्ती

— **कु. सिंधु रंगराव थोरात**
बि.नं. ४८/२३१२ गांधीनगर,
गुलमोहर को.ऑ. सोसायटी,
बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

# भक्तीविना भाग्योदय नाही

**— श्री. बाळकृष्ण अ. देसाई**
सी/३, हरमेस पार्क,
३०, बंडगार्डन रोड, पुणे-४११ ००१.

अक्कलकोटला राहणारे दोघे मित्र, एक सपटणेकर अन् दुसरा शेवडे. दोघेही हुशार. त्यांचा वकिलीचा अभ्यास चालू होता. सपटणेकर पुस्तकातील किडा. जेव्हा पाहावं तेव्हा त्याच्या हातात पुस्तक दिसायचंच! अभ्यास किती करायचा याला त्याच्या गावी सीमाच नव्हती. या उलट शेवडे. तो अभ्यास करायचा पण सारा भार देवावर. शिर्डीच्या साईबाबांवर. त्यामुळं त्या दोघांत बरीच वादावादी चालायची.

सपटणेकर म्हणायचा, 'अरे शेवडे! तुला परिक्षेला बसायचंय की, तुझ्या देवाची प्रतिमास वारी करायचीय! जेव्हा पाहावं तेव्हा तुझ्या आपल्या शिरडींच्या गोष्टी. कोण आहे रे तो फकीर? काय आहे त्याच्यात देवपण?'

त्यावर शेवडे उत्तर द्यायचा, 'मित्रा, असा वैतागून एका सज्जन महातपस्वी देवतातुल्य बाबांना का असा उद्धटपणे बोलतोस? तुला ते फकीर दिसताहेत पण अंतरीच्या खुणा काही वेगळ्याच आहेत त्यांच्या. अरे, अभ्यास चालूच आहे. पण प्रयत्न केल्यावर आपण कितीही मनोराज्ये केली, तरी यश देणारा वेगळाच असतो, नि तोच देव! म्हणून त्याचं स्मरण वारंवार हवंच!'

शेतकरी शेतात कितीतरी राबतो; पण तो शेवटी देवाकडेच दृष्टि लावीत असतो. मी जरी तुझ्या दृष्टीनं इकडे तिकडे भटकत असलो, तरी अभ्यासाकडे कधीच दुर्लक्ष करीत नसतो. जळाखाली घागर ठेवल्यानंतर ती भरून जाऊ लागली, की तिथून तिला दूर करावीच लागते. अभ्यासातून डोकं बाहेर काढून ते प्रयत्नांना यश देणाऱ्या देवाकडे लावलं तर, त्यात चुकलं कुठं?

दुसरं. कोणत्याही सत्पुरूषाला त्याची काहीही माहिती नसताना दोष देणं अत्यंत वाईटच! लोक त्यांच्या उपदेशाप्रमाणं वागतात, ते सारे वेडे असं म्हणून कसं चालेल? ज्यांना जसा अनुभव येतो, तसे ते त्या सत्पुरूषाच्या भजनी लागतात. एकाद्या महात्म्याचा पोषाख किंवा त्याची राहणी यांवर अंदाज बांधणं अत्यंत मूर्खपणाचं ठरतं. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, नामदेव, एकनाथ, सावतामाळी, चोखामेळा अन् जनाबाई ही सारी संतमंडळी लोकांत देखण्या रुबाबात वावरत नव्हती. पण ते सारे देव होते, देवाचे लाडके होते. त्यांच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या शब्दांनी लोकांचं कल्याण होत असे, म्हणून ते देव. देवानं आपलं देवपण अशा आपल्या लाडक्या भक्तांना अर्पण केलं होतं, इतकंच नव्हे तर त्यांची तो एकाद्या सेवकाप्रमाणं सेवा चाकरी करीत असे, याची उदाहरणं शोधायला कुठं दूर जायला नको!

एकच उदाहरण देतो. संत नामदेवांची घरातील कामं करणारी दासी जनाबाई, ही आपला धनी विठोबाची भक्ति करतो, म्हणून आपणही आपल्या फावल्या वेळात त्याची

भक्ति करावी असं तिच्या मनानं घेतलं, नि त्याप्रमाणं ती उठल्या बसल्या देवाचं नाव आळ्वू लागली. हळू हळू नामदेवाप्रमाणं अभंगही रचून गाऊ लागली.

एकदा नामदेवाच्या आईनं रात्री झोपण्यापूर्वी दळण काढून ठेऊन जनाबाईला म्हटलं, 'कोंबडा आरवण्यापूर्वी मोठ्या पहाटे उठून हे चांगलं दळून ठेव!' धनिणीच्या आज्ञेप्रमाणं जनाबाईनं रात्री साडेतीनच्या सुमाराला उठून जातं मांडलं नि दळू लागली. साडेचार झाले तरी दळण निंमे होतेच. विसावा न घेता तिचं काम चालू होतं. अंगावरचे कपडे घामाच्या धारांनी भिजून चिंब झाले होते. थकवाही आला, नि त्या गुंगीत डोळे मिटले. ही संधी साधून भगवान श्रीकृष्ण तेथे आले. तिच्या हातातील जात्याचा खुंटा अलगद आपल्या हातात घेऊन सारं दळण दळून टाकलं. अन् निघून जाण्यापूर्वी आपल्या गळ्यातील हार तिच्या गळ्यात घालून तिथून गुपचूप पसार झाले.

काही वेळानं जनाबाईला जाग आली. पहाते तो सारं दळण दळलेलं होतं. ती समजली, ही सारी विठ्ठलाची कृपा! अन् गळ्यात देवाचा हार. घरातील मंडळींनी हार पाहून विचारलं, 'रात्री देवळात जाऊन देवाच्या गळ्यातील हार चोरुन आणलास की काय?' पण तिला काहीच सांगता येईना. अन् तिला तरी काय माहित, हे कसं घडलं ते सारी मंडळी समजली, ही सारी श्री पांडुरंगाची कृपा! असा असतो देव भक्तांची दुःखं, श्रम दूर करणारा.

सपटणेकराचं घर छान चाललं होतं. त्याची वकिली उत्तम चालून पैसाही बराच झाला होता. एका चौदा, पंधरा वर्षाच्या मुलीशी त्याचा विवाह होऊन दोन अडीच वर्षात त्याच्या घरात एक सुंदर बाळसेदार बाळही रांगू लागलं होतं. त्याच्या घराला धन्यता लाभली होती. त्याभरात त्यानं आजूबाजूची तीर्थक्षेत्रं आळंदी, देहू, पंढरपूर, नाशिक, गाणगापूर इत्यादि पाहिली. तेव्हा मित्र शेवडे म्हणाला, 'सपटणेकर, एकदा तू शिरडीला जाऊन साईबाबांचं दर्शन घेऊन ये! तुझं खरोखर त्यांच्या आशीर्वादानं आहे त्यापेक्षाही फारच उत्तम होईल!' 'कोण साईबाबा! तो मुसलमान फकीर डोक्याला कापडं गुंडाळणारा? छट्! आपण ही मोठाली देवस्थानं केली, आणखी इथं तिथं नको!' सपटणेकरने नकार दिला.'अरे, पण ऐकशील माझं! आणखीन् एखादं देवस्थान केलंस, तर काही बिघडणार आहे का? 'अधिकस्य अधिकं फलम्।' शेवडे म्हणाला. शेवटी सपटणेकराच्या बायकोने जेव्हा हट्ट धरला, तेव्हा तो, त्याचा भाऊ नि पत्नी यांनी शिरडीला जाण्याचं ठरवून ती मंडळी श्रीसाईबाबांच्या दर्शनाला आली.

बाबा लोडाला टेकून मशिदीत बसले होते. सपटणेकराने नारळ, फुले घेऊन बाबांसमोर ठेवली नि त्यांच्या पायावर डोकं ठेवणार तोच, 'चल हट, दूर हो! नि आलास तसा चालता हो! कुणी सुचवलं तुला माझ्याकडे यायला? माझ्या डोळ्यासमोर उभा राहू नकोस! जा, जा म्हणतो ना!' बाबा गरजले.

सपटणेकर निराश होऊन अक्कलकोटला परताला. त्यानंतर हळूहळू त्याची वकिली चालेनाशी झाली. पूर्वीचं वैभव गेलं. लोक त्याला विचारीनासे झाले. घरांत दुडदुडणारं सुंदर बाळ घटसर्पानं आजारी पडून मृत्यू पावलं. पत्नीची प्रकृतीही खालावली. ती रोड

झाली. रोज काही ना काही दुखणं तिच्या पाठीशी लागलं. अशा परिस्थितीत त्यांची परीक्षा पहाण्याच्या हेतूनं श्रीसाईनाथ अक्कलकोटला आले, नि एका निंबाच्या झाडाखाली पारावर बसून राहिले.

पहाटे बायकोच्या स्वप्नात बाबा दिसू लागले. ती चालली होती विहिरीवर पाणी आणण्यासाठी. विहिरीच्या अलीकडे थोड्या अंतरावर असलेल्या निंबाच्या झाडाच्या पारावर बसलेला एक जटाधारी फकीर तिला दिसला. ती त्याच्या जवळ जाऊन म्हणाली, "फकीरबाबा, इथं एकटं बसून काय करता?"

त्यानं उत्तर दिलं, "काय सांगू मुली तुला! माझी कंबर दुखतेय, ढोपरं आखडलीत, अधून मधून पोटातही दुखतंय अन् दमही लागतोय! अशी आहे माझी स्थिति! म्हणून विश्रांती घेण्यासाठी इथं बसलोय! तू आता विहिरीवर चाललीस, पण सांभाळून! एकादवेळी पाण्याचं भांड वर ओढताना झोक जाईल तुझा! घाई नको सावकाश होऊ दे!"

सकाळ झाली. उजाडलं. पत्नीनं सपटणेकराला पहाटे स्वप्नात पाहिलेल्या सर्व प्रसंगाचं यथार्थ वर्णन करुन म्हटलं, "अहो, त्या फकिरानं स्वतःविषयी जे काही सांगितलं ते सर्व माझं होतं. तो चांगला खडखडीत होता. मला होणारं दुःख त्यानं कसं हो जाणलं? मला वाटते ते साईबाबाच असावेत. कारण पोषाख आणि बोलणं अगदी बाबांसारखंच होतं. चला, पाहू त्या निंबाच्या झाडाखाली ते आहेत का!"

पण दृष्टांत देणारा देव तिथं थोडाच बसून राहाणार! सपटणेकरानं बायकोच्या स्वप्नांत दिसलेले अन् तिला होणाऱ्या व्याधींची हुबेहूब माहिती सांगणारे दुसरे कुणी नसून साईबाबाच असावेत हे जेव्हा शेवडे यास सांगितले, तेव्हा शेवडे म्हणाला, "सपटणेकर, बाबा तुझ्या पाठीशी आहेत! तेच तुला सुखाचे दिवस दाखवतील. ते तुला टाकून बोलले, 'ऊठ, चालता हो! तोंड दाखवू नकोस!' वगैरे सारं तुझी परीक्षा पाहाण्यासाठी होतं. म्हणून पुन्हा जा, त्यांची क्षमा माग, नि पायावर लोळण घेऊन तिथेच राहा!" त्यानंतर एका गुरुवारी सपटणेकर बायको नि बंधूसह शिरडीला जाण्यास निघाला. ध्यास एकच. काही झालं तरी बाबांचे पाय न सोडता तिथंच चिकटून राहायचे.

सपटणेकर कुटुंब शिरडीला आलं. नारळ, फुलं, फळं बाबांच्या पायावर वाहून दोन्ही हातांनी पाय घट्ट पकडून डोकं ठेवलं ते त्याने दूर केलंच नाही.

शेवटी बाबा म्हणाले, "आता तुझे डोळे चांगले उघडले, हे बरं झालं. आता इथून हलू नकोस! मी सांगेन तेव्हाच जा!"

'बाबा!' सपटणेकर म्हणाला, "तुम्ही कोण हे आता मला चांगलं समजलं. तुम्ही फकीर नसून साक्षात् त्रिकालज्ञानी परमेश्वर आहात याची खात्री पटली. माझ्या पत्नीच्या स्वप्नात येऊन तिच्या व्याधि सांगितल्यात, आता तुम्हीच त्या दूर करणार! माझं वैभव, माझा बाळ नि माझा लौकिक आता पुन्हा तुम्हीच मिळवून देणार! हे पाय हेच माझं सर्वस्व!" सपटणेकर गहिवरला, त्याच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. त्यानंतर बाबांनी त्यांना जायला सांगितलं. निघण्यापूर्वी सपटणेकराच्या पत्नीला हाक मारली. 'मुली, इकडे ये! माझ्याजवळ बस!' असं म्हणून तिच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला. तो काय चमत्कार! ती चांगली ठणठणीत झाली. तिची मरगळलेली अवस्था एका क्षणात नष्ट झाली.

# साईबाबा कोण होते?

— श्री. बाळकृष्ण देसाई
सी-३, हरमेस पार्क,
बंडगार्डन रोड,
पुणे-४११,००१

माझ्या काही मित्रांनी मला प्रश्न केला, 'साईबाबा कोण होते?' मी त्यावर चटकन उत्तर दिलं, 'ते जागृत दैवत होतं, परब्रह्म होतं!' 'छट्! लांब झगा घातलेला, लुंगी नेसलेला, डोकीला फडकं गुंडाळलेला नि हातात भिक्षापात्र घेतलेला तो एक फकीर होता. आमचे नाही का साधू गोसावी? कपाळभर गंध नि अबीर गुलाल फासून, हातात लोटा-भिक्षापात्र घेऊन दारोदार भिक्षा मागत फिरत. तोंडात नाव देवाचं; पण कृति मात्र दुसऱ्याला लुबाडण्याची. त्यातलेच हे तुझे साईबाबा!' एकानं आपलं मत प्रदर्शित केलं.

मी म्हटलं, 'चुकतोयस तू! दोघांत जमीन अस्मानाचं अंतर आहे. साईबाबा अनंतकोटी ब्रह्मांडनायक प्रत्यक्ष त्रिकाल ज्ञानी देवच!' 'ह्या तुझ्या विधानाला आधार काय?' दुसऱ्याचा प्रश्न

'त्यांनी अनेक चमत्कार केले. प्रथम त्यांनी जाति निर्मूलन केलं. सर्व मानवजात एकाच परमेश्वराची लेकरं आहेत, आपण सारे बंधू-भाऊ आहोत, अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. जे लोक त्यांच्याकडे येत, त्यांना ते स्वहस्ते स्वयंपाक करून एका पंगतीत बसवून वाढीत. यावेळी आपल्या शेजारी कोण बसलंय याकडे कुणाचेच लक्ष जात नसे. मग तो भिकारी, भंगी, ख्रिश्चन, पारशी, मुसलमान, हिंदू किंवा हरिजन स्त्री-पुरुष असो. गरीब -श्रीमंतीचा विचार न करता सर्वांनाच ते सारखी वागणूक देत. अन् ती प्रथा बाबांच्या पश्चात आजही रात्रंदिवस चालू असून हजारोंच्या पंगती रोज शिरडीला जेऊन उठत आहेत. तिथं धनाढ्य आणि भिक्षेकरी हा भेद नाही' मी उतरलो.

'बरं! तू त्यांना संबोधिलेस ते कसं काय?' तिसऱ्याचा प्रश्न.

'याची अनेक उदाहरणं तुमच्या पुढं ठेवता येतील' असे सांगून मी त्यांना पुढील माहिती दिली.

(१) पारशी लोक आपल्या अग्यारीत (देवळात) अहोरात्र अग्नि पेटत ठेवतात. अग्नि ही त्यांची प्रमुख देवता. ती काय करत नाही? आपण सारी माणसं अग्निदेवतेवरच अवलंबून असतो. तिच्या उबेशिवाय आपण जगूच शकणार नाही. साईबाबा आपल्या धुनीत लाकडं जाळीत. ही लाकडं पुरविण्याचं काम त्यांचा भक्त आप्पा भिल्ल करीत असे. लाकडं विकून उदरनिर्वाह चालविणं हा त्याचा धंदा. दोन मोळ्या विकल्या की बाबांना एक आणून द्यायची असा त्याचा नित्यक्रम होता. यात कधी खंड पडला नाही. ह्या लाकडांची राख ही अत्यंत पवित्र औषधी उदी. ह्या उदीनेच लोकांचे मनोरथं पूर्ण झालीत, आजार पळालेत. बाबा रोजच धुनीजवळ बसत असत. असेच एकदा ते धुनीजवळ बसले असता, एकाएकी उठून ते धुनीतील आग विझवल्यासारखे करू लागले. सभोवती जमलेल्या भक्तमंडळींना बाबांच्या ह्या वागण्याचे आश्चर्य वाटले. त्यांनी

विचारलं, 'बाबा, हे काय करताहात तुम्ही?' 'आग विझवतोय ताजुद्दीनच्या दर्याची!' बाबांनी उत्तर दिलं. त्याचे दर्याला एकाएकी आग लागली, सारी माणसं भेदरून गेली, काय करावं हे कुणालाच सुचेना. कारण जवळपास पाण्याचा ठावठिकाणा नव्हता. पण आश्चर्य हे की, जशी आग लागली, तशी ती विझलीही असे नमूद केले होते.

### (२) जळणारी मुलगी वाचविली

एके दिवशी धूनी धगधगत असता, त्या आगीत हात घालून बाबांनी काही ढवळल्या सारखं केलं. भक्तांना आश्चर्य वाटलं. तेव्हा बाबा म्हणाले, 'तो आपला नेहमीचा लोहार. त्याच्या बायकोनं भट्टी पेटवली. कमरेवर लहान मुलगी होती, ती चळवळ करीत असता धपकन् भट्टीत पडली. लोहार घाबरला. त्याने बाबांचा धावा केला आणि चिमूटभर उदी आगीत टाकून मुलीला हात धरून बाहेर काढला, अगदी कसलीच दुखापत न होता. ही आहे बाबांची कृपा. मात्र बाबांचा हात चांगलाच पोळला. तो आठ-दहा दिवसांनी डॉक्टरकडे न जाता तूप चोळून बरा झाला. असे होते बाबा त्रिकालज्ञानी नि त्रिकालस्पर्शी.

### (३) घालितो दंडवत शिरडीच्या बाबा साई । निरंतर नाम मुखी राही विनंती ही पायी ॥

दासगणू हे पूर्वाश्रमीचे श्री. गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे. पोलिस खात्यात जमादार. पण ते बाबांच्या नजरेला पडताच त्यांनी त्यांचं कवित्व, प्रासादिक वाणी लोकोद्धार्थ लाविली. खात्यात नोकरीला असताना ते गावोगावी कथाकिर्तनं करीत. त्यामुळं त्यांचं नोकरीकडे दुर्लक्ष होई. त्यावेळी पोलिस खात्यात वॉर्डन साहेब मुख्य अंमलदार होते. ते मोठे कडक नि रागीट स्वभावाचे होते. एकदा दासगणूंच्या स्वाधीन केलेला एक भिल्ल दरोडेखोर त्यांची नजर चुकवून पळून गेला. इतर पोलिसांचेही दुर्लक्ष झाले. ही बातमी वॉर्डन साहेबांना कळताच ते दासगणूंवर फारच संतापून त्यांना ताबडतोब पकडून माझ्यासमोर उभे करा असा त्यांनी हुकूम सोडला.

सबइन्स्पेक्टर पोलिस घेऊन दासगणूंना पकडून आणण्यासाठी रवाना झाले. त्यावेळी दासगणूंनी बाबांची किर्ति ऐकली होती. ते शिरडीस गेले नि बाबांच्या पायांवर डोकं ठेवून एकंदर घडलेलं सारं काही सांगितलं. बाबा म्हणाले, 'अरे गणू, नोकरी सोडून दे, असं तुला मी चार-पाच वेळा सांगितलं. पण तू ऐकलं नाहीस! अरे, आपण काय साहेबांचे बूट पुसायला जन्माला आलो?' त्यावेळी दासगणू सब-इन्स्पेक्टरच्या परिक्षेला बसून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. अन् जागा रिकामी होताच ते स्वतंत्र ऑफिसर होणार होते. त्यामुळे नोकरीचा लाभ सुटेना नि आता तर अब्रूवरच घाला पडला. दासगणूंनी भिल्ल कुठे आहे ते शोधून काढले. बाबांनीच त्या भिल्लाला त्या ठिकाणी जाण्याची बुद्धी दिली. भिल्ल दृष्टीस पडला. नि विशेष म्हणजे तोच आपणहून दासगणूंच्या स्वाधीन झाला. साहेबांपुढं भिल्लाला आणून उभं करताच साहेब दासगणूंवर खूष होऊन दासगणूंची त्यांनी सबइन्स्पेक्टरच्या जागी नेमणूकही करून टाकली. पण ही सारी बाबांची किमया जाणून गणेशपंत अखेरपर्यंत बाबांचे लाडके दासगणू जाहले.

### (४) जवळची गंगा सोडून दूर जा कशाला?

दासगणूंना अलाहाबादेस पर्वणी काळात गंगास्नानास जायचं होतं. तसं त्यांनी बाबांना

सांगितलं. बाबा म्हणाले, 'अरे गणू, बाहेरून गंगोदकानं अंग ओलं केलं, म्हणून माणूस कसा शुद्ध होतो? मन शुद्ध तर शरीर शुद्ध. माणसानं आपली वागणूक पवित्र ठेवली पाहिजे. पण तुझा हेकाच आहे तर जा बा बापडा!'

अखेर दासगणू जायला तयार झाले. पोषाख वगैरे करून बाबांचा निरोप घेण्यासाठी त्यांच्या पायाचे दोन्ही अंगठे हातात धरून डोकं नमविणार तो काय! अंगठ्यातून सळ सळ गंगामाई वाहू लागली. तेच पाणी अंगावर शिंपडून दासगणू म्हणाले, 'बाबा, मी नाही जात गंगास्नानाला! माझी गंगा इथंच आहे, हे न समजून मी हट्ट धरला होता.'

**(५) नानासाहेबांची कन्या मैनाताई बाबांच्या उदीनं नि आरतीनं मोकळी झाली.**

रामगीर बुवा गोसावी श्रीबाबांचा भक्त. तो खानदेशात आपल्या गावी जायला निघाला. जाण्यापूर्वी बाबांचा निरोप घेण्यास आला. तेव्हा बाबा त्याला म्हणाले, 'अरे बापूगीर, तू निघालास! आता वाटेत उतरून माझं एक काम कर. जामनेरला नानासाहेब चांदोरकराकडे जा!' बाबांनी शामाला (माधवराव देशपांडे) म्हटलं, 'शामा, ती आपल्या आडकराने केलेली आरती कुठं आहे? ती एका कागदावर लिहून याच्याकडं दे. ती आरती नि उदीची पुडी घेऊन तो नानाकडे जाईल.'

बापूगीर म्हणाला, 'मी जातो. पण उताराला पैसे नाहीत. अवघे दोन रूपये आहेत. तिकिटाला एक रुपया चौदा आणे, अन्....'

बाबा म्हणाले, 'तू फक्त जातो एवढं म्हणालास! आता बाकी सर्व सोय होईल!'

नानासाहेबांची मुलगी मैनाताई प्रसूतीच्या वेळी अडली होती. डॉक्टर आले. खूप उपाय झाले, शेवटी हरले. मग नानांनी बाबांचा धावा केला. बाबांना आत्मज्ञानानं हे कळलं, नि त्यांनी बापूगीरबरोबर वरील तजवीज केली.

रामगीर जामनेरला उतरला. तो तिथं शिरडीचा बापूगीर कोण आहे असं मोठमोठ्यानं ओरडत एक टांगेवाला शोधत आला. बापूगीर टांग्यात बसला. टांगा नानासाहेबांच्या कंपाऊंडमध्ये आला. टांगेवाला म्हणाला, 'रात्र झाली. आपण इथं फराळ करू या!'

बापूगीर म्हणाला, 'मी मुसलमान नाही. जातीचा हिंदू आहे.' तेव्हा टांगेवाला म्हणाला, 'हा डबा माझा नव्हे, मामलेदार साहेबांनी दिला आहे.'

बापूगीर नानासाहेबांच्या बंगल्यात गेला, नि म्हणाला, 'आपण पाठविलेला फराळही केला. फार भूक लागली होती. आपण टांगा पाठविलात म्हणून स्टेशनवरून इतका लौकर आलो.'

नानासाहेबांनी सारं ऐकून घेऊन मनात म्हटलं, 'टांगा, टांगेवाला, फराळाचा डबा ही सारी बाबांची किमया. रामगीर जवळचा आरतीचा कागद आणि उदी घेऊन ती मैनाताईला लावली, आरती म्हटली अन थोड्याच वेळात तिची व्यवस्थित सुटकाही झाली. हे सारं बाबांच्या त्रिकालज्ञानानं झटपट घडून आलं.

**(६) वर चढू नकोस, खाली उतर!**

बाबांचा प्रिय भक्त माधवराव देशपांडे-शामा — त्याच्या बोटाला सर्पानं दंश केला. शामाने बोट घट्ट धरून बाबांकडे चावडीत धाव घेतली. बाबा धुनीजवळ बसले होते. त्यांनी त्याला दुरून पाहिलं, नि ओरडून म्हणाले, 'शाम्या, वर चढू नको! खाली उतर!

घरी जा नि स्वस्थ पडून राहा!' शामाला वाईट वाटलं. तो मनात म्हणाला, 'मी बाबांकडे येत होतो, ते काही तरी इलाज करून माझं विष उतरतील. पण ते वागले वेगळंच!'

शामा घरी गेला नि स्वस्थ पडून राहिला. काही वेळानं बोटातील विषाची 'फुण् फूण' थांबली. दुखणं पळालं, नि बाबांच्या 'खाली उतर' बोलण्यातील मर्म कळलं.

शामा नंतर जेव्हा बाबांकडे गेला, तेव्हा बाबा म्हणाले, 'अरे शामा, तुला मी नाही म्हणालो, खाली उतर म्हणून ! मी त्या विषाला बोललो! तू बरा झालास ना? छान!'

### (७). पंचमहाभूतांवर विजय

एके वर्षी पावसाळ्याच्या आरंभी आकाश घनदाट ढगांनी व्यापून गेलं. सोसाट्याचे वारे सुटले. लोकांच्या घरावरची छपरं उडाली. मेघगर्जना इतकी भीषण होती की, कानठळे तर बसलेच, पण क्षणोक्षणी धरणीकंपाने जमिनीला हादरे बसत होते. यामुळं सारे शिरडीवासीय स्त्री-पुरुष मुलांना काखोटीला मारून द्वारकामाईत गर्दी करून आक्रंदू लागले. मुलांचा आक्रोश, स्त्रियांचा हंबरडा नि पुरुषांचा ओरडा यांनी बाबांचं अंतःकरण द्रवलं. त्यांनी हातात सोटा घेतला, नि जमिनीवर जोरजोराने आपटण्यास सुरुवात केली, आणि तोंडानं, 'थांब , पुरे कर हा धिंगाणा! चल, निघून जा!' असं दरडावणीनं बडबडत होते. नि काय आश्चर्य! हळुहळू वाऱ्याचा वेग कमी झाला. मेघगर्जना थांबली. वीजांचा चमचमाट बंद झाला. नि आकाशात गोळा झालेले मेघ इतस्ततः विखुरले.

सर्वांनी बाबांना साष्टांग नमस्कार केला, नि सच्चिदानंद सद्गुरू साईबाबांच्या जयजयकारात सारा आसंमत निनादून गेला.

### (८) पाणी पेटू लागलं — निसर्गावर विजय

श्री साईबाबा चांदपाटलाच्या मुलाच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर आले, ते शिरडीत एका मशिदीत उतरले. तरुण गोरापान मुलगा. अंगयष्टी मजबूत. मशिदीच्या बाजूला मोकळी जागा होती. ती झाडून, सारवून स्वच्छ केली. त्या जागेत ते विश्रांती घेत बसत असत. त्या जागेला त्यांनी 'द्वारकामाई' नाव दिलं. आत मशिदीत मुसलमान नमाज पडत, तर बाहेर द्वारकामाईत हिंदूचं भजन चाले. पण ना कधी भांडण की हाणामारी. सारं गुण्यागोविंदानं चालत असे. अन याला कारण बाबांचा दरारा!

बाबा, रोज सकाळी भिक्षेसाठी काही घरं फिरत. आणलेली भिक्षा एका पसरट दगडी वाडग्यात ठेवीत. तिथंच त्यांचं जेवण होई. व उरलेलं अन्न तसंच राही. कावळे, मांजर, कुत्री ते खात. त्यातून उरलेलं बाबा खात. लोकांना ते विक्षिप्त वाटे. तेव्हा बाबा म्हणत, 'सर्व प्राणीमात्रांचा आत्मा एक . तेव्हा उरलेलं खायला मला काहीच वेगळं वाटत नाही.'

त्यानंतर काही दिवसांनी त्यांनी पणत्या आणल्या. कापूस जमविला. आणि रोज सायंकाळी किराणामालाच्या दुकानासमोर उभे राहून हातातील भांड्यात तेल जमा करीत आणि कापसाच्या वाती करून त्या पणतीत घालून तेल ओतून पेटवीत. त्यामुळं द्वारकामाई उजेडात न्हाऊन निघे. असं रोज चाले. पुढे काही दिवसांनी व्यापाऱ्यांनी बाबांना, तेल द्यायचं बंद केलं. 'फुकटच नाही मिळणार!' असं बजावलं. बाबा तेलाचं रिकामं भांड घेऊन परत आले. कुणाला काही बोलले नाहीत की, हिरमुसले झाले नाहीत. त्यांनी

पणत्या चांगल्या पुसून त्यात पाणी ओतलं अन् वाती घालून नेहमी प्रमाणं त्या पेटविल्या. लख्ख प्रकाश पडला. कितीतरी वेळ त्या पेटत होत्या. हे अघटीत कृत्य पाहाण्यास लोकांच्या झुंडी तिथं गोळा झाल्या नि बाबांचं सामर्थ्य किती दांडगं आहे याची साक्ष साऱ्यांनाच पटली.

## (९) साधनाविना अग्नि निर्मिती

बाबा नेहमी चिलीम ओढीत असत. एकदा ते चिलीम भरीत असता समोर चांद पाटील शोधक दृष्टीने इकडे तिकडे फिरत होते. बाबा त्याला म्हणाले, 'पाटील, इकडे या! अगोदर ही भरलेली चिलीम ओढू या!'

'मी केव्हापासून शोधतोय माझं घोडं! अन् तुम्हाला आलीय चिलीम ओढण्याची हुक्की!' पाटील.

'अहो, कुठं जातंय घोडं? अगोदर चिलीम ओढू! काढा आगपेटी!' — बाबा.

'माझ्याजवळ पेटीही नाही अन् चिलीमची छापी भिजवण्यास पाणीही नाही.' — पाटील.

'एवढंच ना! हे घ्या पाणी!' बाबांनी चिमटा मातीत खुपसला तोच पाणी झुळझुळ वाहायला लागलं. अन् तोच चिमटा दगडावर आपटल्यावर निखारे तयार झाले. 'हं! करा पाहू सुरुवात!'

दोघे चिलिमीचे झुरके मारीत होते. इतक्यात बाबा म्हणाले, 'पाटील, तो बघा तुमचा घोडा! अन् म्हणताहात केव्हापासून मी शोधतोय त्याला! मिळाला ना?'

चांद पाटील आश्चर्यचकीत झाले. साईबाबा ही साधी व्यक्ती नसून प्रत्यक्ष अवतारी पुरुषच आहे, हे त्यांना मनोमन पटलं.

मित्रांकडे वळून मी म्हटलं, ऐकलंत, साईबाबा कोण होते ते!'

'आता यापुढे आम्ही तुझ्याप्रमाणं त्यांची उपासना, भजन, पूजन करणार नि इतरांनाही मार्गदर्शन करणार! त्यांची सेवा कधीच विफल होणार नाही हे पटलं, पटलं!' — मित्रांच्या सर्व शंकांचे निरसन झालं होतं हे त्यांच्या ह्या उत्तरावरून मी ताडलं आणि मीही समाधान पावलो.

अशी कितीतरी उदाहरणं देता येतील की ज्यात श्री बाबांचं देवत्व आढळून येतं. अन् शेवटी — श्री बाबांची सेवा करणे ध्येय जीवनी माझ्या। दयावंत ही कीर्ति ऐकिली मदत करावी काजा। करावे पावन हो मजला, येऊनि संकट समयाला ॥१ ॥

तव हस्ताचा काला गोड। पुरवी अमुचे इतुके कोड ॥आस लागली तव भक्तांना। नम्र प्रार्थना देई दर्शना॥ दत्तचिनीश्वर साईराजा। प्रकटे शांतवि भक्ता हृदया ॥२ ॥

# श्री साईनाथांचा शरणार्थी — २३

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

शिरडीत एकवीस दिवसांच्या तसेच मोतामधील वास्तव्यात असा अनुभव आला की जो विचार माझ्या मनात चाले तेच उद्गार सर्व माणसं त्या वेळेस काढत; उद्गार एकाच प्रकारच्या शब्दात — जणू काय दर एक उद्गाराचा अर्थ जो तो त्याचे कार्याला किंवा हेतुला अनुसरूनच करताना आढळून येई. माझ्या विचाराशी त्याचा काही संबंध नसे परंतु ज्या शब्दात माझा विचार चाले तेच शब्द सर्वजण आपापल्या अर्थाने आपापले हेतु पार पाडण्यास बोलताना दिसून येत. यावरून मला वाटते की त्या काळी मी आकाश समष्टिसह ऐक्य पावलो असेन. आणि त्यामुळेच मला बाबांनी दाखविले होते की आकाशाचा गुण शब्द आहे, तो एका वेळेस सर्वत्र निघताना प्रत्यक्ष दिसून येतो. समष्टि-एकता साधणाऱ्यास सर्वत्र शब्द उच्चारताना दिसून येत. यात नवल नाही हे तर जणु काय स्वाभाविक आहे. 'क्र अमोनित्येत दक्षरमिंद ॐ सर्व तस्योपव्याख्यान' चा हा प्रत्यक्ष अनुभव.

डॉ. त्र्यंबकलालचा पिता अग्निहोत्री होता. शिरडीत एकवीस दिवसांच्या दरम्यान आकाशात उंचावर कोणी अग्निहोत्री जाताना दिसला, तो त्याचा पिता सुद्धा कदाचित असेल, अशी कल्पना सुचली. डॉक्टरांच्या वारंवार आग्रहावरून त्यांच्याकडून केवळ पाणीच बाटलीतून भरून येई ते पाच-दहा दिवस घेतले असेल. इतक्यात माझ्या पूर्वीच्या रीतीप्रमाणे एक दिवस पहाटेस निर्गुण ध्यान केले त्या दिवशी डॉक्टर म्हणाले, "आज तुमची तबियत फार चांगली दिसते." मी समजलो की ध्यानाच्या मुळे माझी तबियत चांगली दिसत होती. म्हणून औषध बंद करून ध्यान नियमितपणे करण्याचे ठेवले.

सन १९१७ मधे अहमदाबाद येथे नवीन बिऱ्हाड केल्यावर पहिल्या दिवशी दिशा समजण्यात घोटाळा झाला, वैश्वदेव उलट्या दिशेस बसून केला. नंतर लवकरच डोळे दुखू लागले. त्यावरून मी चुकीच्या दिशेला बसून वैश्वदेव केल्याचे फळ ही डोळे दुखण्याची शिक्षा आहे असा मला संशय आला.

माझ्या धाकट्या बहिणीस माझी सर्व पुस्तके घेऊन मी अहमदाबादेस बोलाविले. तिचे येण्याचे अनिश्चित होते की काय ते आता विसरलो आहे. तिला स्टेशनवर आणायला जाण्यास जमले नाही. धाकट्या बहिणीला अहमदाबाद तसेच माझे राहण्याचे ठिकाण अपरिचित होते, म्हणून मला चिंता वाटत होती की ती एकटी पुस्तकांचा बोजा घेऊन कशी बिऱ्हाडावर सुरक्षितपणे येऊन पोचेल. इतक्यात एके रात्री ती एका मारवाडी मजुरास घेऊन पत्त्याच्या आधाराने बरोबर येऊन पोचली. मारवाडी फारच भला माणूस दिसला. मजुरी किती म्हणून विचारता म्हणाला, "मला मजुरी नको, तुम्हाला द्यायचे असेल तर थोडे तूप द्या." अनोळखी गावात, अपरिचित स्थळी एका सुंदर विधवा स्त्रीस रात्रीच्या समयी सुरक्षितपणे पोचविले मजुरीचा आग्रह नाही, थोडे तूप मागणे व ते मिळाल्यावर खूश होऊन बोलणे, "हे बघा शेट, परत काम पडले तर, सांगा बरं का,

आता जातो." असे सांगून निघून जाणे हे सर्व बघून मला निश्चित वाटले की हा कोणी साधारण मजूर नव्हे, पण बाबा स्वतःच आहेत. तुकारामांचे 'भोजना मागती तूप पावशेर' याची आठवण बाबांनी (वरील रीतीने) तूप मागून करून दिली. आणि शिवाय सांगून गेले, "हे बघ, मी जातो परंतु काम असेल तेव्हा बोलाव."

अहमदाबादमधील या वास्तव्यात, शाळेचे कपडे मी अलग ठेवी व घरी येताच डबल मांजरपाटाच्या एका कफनी शिवाय काही वापरत नसे. केवढीही थंडी असली तरी सुद्धा माझ्या अंगावर तेवढीच असे. अर्थात घरातील माणसं शेगडी ठेवून जात. फार थंडी पडे तेव्हा, उंबरठ्याजवळ जाजम-तक्क्या आंथरून बसत असे. संध्या-पूजा वगैरे खालच्या खोलीत पार पाडे. तेथे दोन-तीन तास माझी बैठक असे. त्या खोलीत एकदा माझ्या अनुपस्थीत एक मोठा साप निघाला. त्याचे सर्वांनी काय केले ते आता आठवत नाही. कदाचित तो येथून निघून गेला असेल. काहीही घडले तरी मी काही माझ्या खोलीत नित्यकर्मासाठी, त्या घरात मजजवळ चार वर्षे मी काढली त्या दरम्यान बसण्याचे बंद केले नाही. एक दिवस जेथे बसलो होतो तेथे टांगलेल्या कपड्यावर विंचू होता त्याने थोडासा दंश केला. माझ्या बसण्याच्या जागी एक-दोन वेळा विंचू निवांत बसलेला दिसला, परंतु मला माझी बैठक बदलण्याची जरूरी वाटली नाही.

सन १९१७ च्या दिवाळीत एक महिन्याची रजा पडली तेव्हा मी मुंबईला गेलो व तेथून शिरडीला गेलो. त्या वेळी बाबांनी विचारले, "काय करतोस?" किंवा मीच सांगितले असेल, "मी अहमदाबाद येथील एका शाळेचा प्रिन्सिपॉल आहे." बाबा म्हणाले, "आता तर ठीक आहे ना?" या उद्गारांनी बाबांनी माझ्या नोकरीबद्दल आपला संतोष व्यक्त केला. त्यावरून तसेच त्या अगोदर पण पब्लिक प्रॉसिक्युटरच्या व शिक्षकाच्या नोकरीमधून शिक्षकाचीच नोकरी माझ्यासाठी बाबांनी पसंत केली त्यामुळे मला अजून असेच वाटते की मी शिक्षकाचा धंदा करावा हे बाबांना पसंत होते. शिवाय हे शास्त्रसंमत सुद्धा आहे. कारण, ब्राह्मणाचा धर्म अध्यापकाचा व अध्यायनाचा मुख्यत्वे आहे.

एकदा मला राधाकृष्णआई म्हणाली, "वामन्या मला सवाशे (दोनशे?) रुपये दे म्हणजे बाबांच्या समोर फाटकाजवळ पणत्या ठेवण्यासाठी दीपमाळ बांधू. त्यावेळी माझ्याकडे देण्यासाठी पैसे नव्हते म्हणून असमर्थता व्यक्त केली, पण तिच्या देहांतानंतर ज्या वेळी मी शिरडीस गेलो तेव्हा बाबांना विचारले, "बाबा, येथे समोर दीपमाळ बांधू का?" तेव्हा बाबा म्हणाले, "आता काही गरज नाही." त्या योगे राधाकृष्णआई जीवंत असताना, तिने विचारले तेव्हाच हे कार्य झाले असते तर, या विचाराने मला पश्चात्ताप झाला- असे समजून की राधाकृष्णआई जेव्हा दीपमाळ बांधण्याचे म्हणाली तेव्हा बाबांच्या आदेशानेच ती तसे म्हणाली, आणि त्यावेळी तो आदेश न पाळता, मी असमर्थता दाखविली. बाबांनी नंतर दीपमाळ बांधण्यास अनुमती दिली नाही.

राधाकृष्णआईचा शब्द हाच बाबांचा, असे यावरून मला वाटले. आता असा सुद्धा विचार येतो की त्यानंतर बरोबर एक वर्षाने बाबा देहत्याग करणार होते त्यामुळे सुद्धा ते म्हणाले असावेत की आता काही जरूरी नाही.

साई महाराज समाधिस्त होण्याच्या अगोदर एकदा विलेपार्ल्याला मी खोलीत आरामखुर्चीवर बसलो होतो. दुपारची १२ ते १ दरम्यानची वेळ होती, घरी मी एकटाच होतो. बाबांची फारच आठवण झाली, त्यांच्याशिवाय जणुकाय दुनिया शुन्यासारखी भासत होती - फारच कंटाळा आला होता. इतक्यात धोतर नेसलेला व डोक्यावर टोपी घातलेला एक माणूस आला व टेबलाजवळच्या खुर्चीवर बसला. तो म्हणाला, ''तहान लागली आहे, पाणी द्या'' मी उठून त्याला पाणी दिले ते पियाला. नंतर त्या टेबलावर, १९१७ मध्ये प्रसिद्ध केलेले व अडीच रुपये किंमतीचे निर्णयसागर प्रेसचे 'ईशाद्यष्टोत्तरशतोपनिषद' होते. ते हातात घेऊन आणि त्याची पाने चाळून त्याने ते जागेवर ठेवले. व म्हणाला, ''वा, तुम्ही तर खूप ज्ञानाने भरलेले पुस्तक ठेवले आहे ना?'' असे म्हणून तो उठून निघून गेला. नंतर मला वाटले की कदाचित बाबांचे उत्कट स्मरण केल्याने ते स्वतः आले व उपनिषदांत खूप ज्ञान भरलेले आहे त्याचा अभ्यास कर, असे बाबा सुचवून गेले. बाहेर येऊन पाहता ते दिसले नाहीत, एवढेच नव्हे तर त्यानंतर त्या खोलीत आम्ही पुष्कळ काळ राहिलो पण ती आकृती त्या वेशात पुनः बघण्यास मिळाली नाही.

## शिरडी वृत्त फेब्रुवारी— ८७

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमी प्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

कीर्तन :- १) ह. भ. प. मधुकर गणेश सूर्यवंशी, पुजारी [गवई] कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.

२) ह. भ. प. व्यंकटेश मुरलीधर कुलकर्णी, दोग माहुली.

प्रवचनः— १) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी

२) ह. भ. प. वामनराव बाळकृष्ण भगत, माहीम, मुंबई

३) ह. भ. प. प्रताप एस परदेशी, आळंदी

भजन, गायन, वादन : १) सौ. सुलभा काशीनाथ श्रोत्री, वडाळा २) श्री. एम. एन. पदमाराव, सिकंदराबाद ३) महाराष्ट्र श्रीमंत भजनी मंडळ, इचलकरंजी ४) श्री. आय. जी. मेहता, चंदीगड ५) श्री. जयवंतराव कुलकर्णी, सिनेगायक, मुंबई ६) श्री. विजयसींग चव्हाण ७) श्री. अरविंद म्हात्रे ८) श्री. अशोक कदम ९) श्री. नितीन टिल्लू १०) श्री. किशोर म्हात्रे ११) श्री. सुरेश वराडकर १२) सौ. माधवी कदम १३) श्री. के. टी. टिकू १४) कु. जयश्री टिकू १५) श्रीमती रेणू १६) श्री. मोहनलाल टिकू १७) श्रीमती अलका डी. कोलु, बोरिवली १८) श्री. भागवत भगिनी, आंधण १९) श्री. बाळ चावरे २०) श्री. गिरीष अग्नीहोत्री, नागपूर २१) श्री भगवान सत्य साईबाबा सेवादल, मुंबई २२) सौ. संगीता जी. गोडबोले २३) श्री. के. राजेश्वरी हैदराबाद २४) श्री. के. रविशंकर २५) श्री. एम. एस. भावे २६) श्री. नारायण जी. कोष्टी, चेंबूर २७) श्री. के. व्ही. रमणमूर्ती, राजमहेंद्री २८) श्री साई गुरुदत्त, माहीम २९) श्री. मेहताबली शाह, मडगांव, गोवा ३०) श्री. हूसेन मजीत उल्ला ३१) श्री. विष्णू दयाल, मडगांव, गोवा.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd: No. MH/BYE/26
LICENCE No. 19

Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७" × २२" | ३-५० | ३-५० |
| २. | —"— | १४" × २०" | १-५० | ३-५० |
| ३. | —"— | ७" × १०" | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४" × २०" | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४" × २०" | १-५० | ३-५० |
| ६. | —"— | १०" × १४" | ०-९० | ३-५० |
| ७. | —"— | ७" × १०" | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक** : श्री. रा.द. बत्रे, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी.,दादर, मुंबई - ४०० ०१४.